नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत मराठी अभ्यास परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या भाषा आणि जीवन ह्या नियतकालिकाच्या (त्रैमासिक) अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून मराठी अभ्यास परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



मराठी अभ्यास परिषद पत्रिका

भाषा आणि जीवन

वर्ष २४
अंक 3
पावसाळा
२००६



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

संपादक : प्र.ना. परांजपे
संपादन-सल्लागार : अशोक रा. केळकर, गं.ना. जोगळेकर, मॅक्सीन बर्नसन, अंजली सोमण
संपादन-समिती : प्र.ना. परांजपे (प्रमुख), विजया देव, मृणालिनी शहा, नीलिमा गुंडी
संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके : प्र.ना. परांजपे, सी-१, सुरजबन सहनिवास, गणेशखिंड मार्ग, पुणे ४११ ००७. दूरध्वनी (०२०) २५६९४६१७
प्रकाशक, मुद्रक, व्यवस्थापकीय संपर्क व पैशांचा भरणा : नीलिमा गुंडी, कार्यवाह, 'मराठी अभ्यास परिषद' ३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलसमोर, पुणे ४११००२. दूरध्वनी (०२०) २४४८६०१५
मुद्रण-स्थळ : भंडारी मुद्रणालय, सिंहगड मार्ग, पुणे ५१.

प्रकाशन : त्रैमासिक; जानेवारी(हिवाळा), एप्रिल(उन्हाळा), जुलै(पावसाळा), ऑक्टोबर(दिवाळी)

या अंकाचे मूल्य रु. २५/-

संपादकीय

मराठीच्या विकासाच्या वाटा - ५ : चालायचंच !

भाषिक प्रदूषणाबद्दल कोणी पोटतिडिकीने बोलायला लागले की अनेकांची प्रतिक्रिया 'चालायचंच !' अशी असते. वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके यांतून वेगवेगळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या पातळ्यांवरील प्रदूषण सुजाण वाचकाला गुदमरवून टाकत असते. त्याबद्दल कुणाशी बोलायला गेले तर ऐकू येते : 'चालायचंच !' ही प्रतिक्रिया हतबलतेतून येते की अनास्थेतून हे सांगणे कठीण आहे. सर्वांच्या प्रतिक्रियेचा उगम एकाच भावनेतून असेल असेही नाही. काही वेळा या प्रदूषणाचे पितृत्व मुद्राराक्षसाकडे दिले जाते. हा राक्षस काही ठिकाणी आपले कर्तृत्व दाखवतो हे खरे; पण बहुतांश ठिकाणीं लेखक व संपादक यांची अनास्था, किंवा भाषाज्ञानाची उणीव किंवा 'चालायचंच !' ही वृत्ती भाषिक प्रदूषणाला जबाबदार असते.

वृत्तपत्रासाठीचे बरेचसे लेखन घाईत केले जाते व त्यामुळे त्यात दोष राहून जाऊ शकतात, हे मान्य; पण नियतकालिके व पुस्तके यांमधील लेखनाला ही सबब सांगता येणार नाही – त्यातही वैचारिक लेखनाला ! पण अनेक वेळा अशी शंका येते की वैचारिक लेखन करू पाहणाऱ्या बऱ्याच लेखकांचे वाचन वृत्तपत्रांपुरतेच मर्यादित असावे ! यात मराठी विषयात पीएच्.डी. केलेल्या, मराठीचे पदव्युत्तर पातळीपर्यंत अध्यापन करणाऱ्या अनेक लेखकांचा समावेश होतो. त्यामुळे वैचारिक लेखनाची पथ्ये, शिस्त अशा बाबींचा मराठीच्या अध्यापनात समावेश नसावा, अशी माझी समजूत होऊ लागली आहे.

पण यावरही उतारा असतो तो सहकारी, मित्र, समव्यावसायिक, वाचक यांच्या शंका, प्रतिक्रिया, चर्चा, वाद या गोष्टींचा. त्यांतून स्वतःच्या प्रगतीची आच असणारा लेखक अनेक लेखनविषयक नियम टिपकागदाप्रमाणे टिपून घेऊ शकतो. पण अलीकडे या संधींचाही संकोच झाला आहे तो 'चालायचंच !'मुळे. लेखनातील दोष दाखविल्यास त्यांचा विचार करून त्या दोषांचा स्वीकार किंवा प्रतिवाद करण्याऐवजी लेखक रागावतो, दोषदिग्दर्शकाला शत्रूपक्षात ढकलून मोकळा होतो; तसे केले की दोष दूर करण्याची आवश्यकता शिल्लक राहात नाही.

उदाहरण म्हणून लेखनातील दोन घटकांचा उल्लेख करता येईल. एक अगदी प्राथमिक पातळीवरील घटक म्हणजे विरामचिन्हांचा उपयोग; दुसरा अधिक प्रगत

पातळीवरचा घटक म्हणजे संदर्भ देण्याची शिस्त.

मराठीने विरामचिन्हांची उसनवारी इंग्रजीकडून केली आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. विरामचिन्हांमुळे अर्थ नेमकेपणाने व्यक्त करण्यास साहाय्य होते. पण मराठी व्याकरणाच्या चर्चेत विरामचिन्हांचा समावेश केला जात नाही. माझ्याकडे असलेल्या एक डझनभर व्याकरणांपैकी फक्त दोन पुस्तकांत विरामचिन्हे या विषयाचा समावेश आहे, आणि तोही शालेय व अध्यापन-पदविकेच्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या पुस्तकात. पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह, अवतरण-चिन्ह, अधोरेखा, संयोगचिन्ह, स्पष्टीकरण/निक्षेप चिन्ह व द्विबिंदुचिन्ह अशी दहा विरामचिन्हे मराठीत आहेत. त्यांपैकी एकेरी व दुहेरी अवतरणचिन्हांच्या वापराबाबत काही नियम नसावेत; लेखकही त्याबाबत काही तारतम्य बाळगताना दिसत नाहीत. पुस्तकाचे नाव असो, उद्‌गार असोत, अवतरण असो, उपरोध व्यक्त करायचा असो किंवा एखाद्या शब्दाकडे/शब्दसंहतीकडे लक्ष वेधून घ्यावयाचे असो – दुहेरी किंवा एकेरी अवतरणचिन्हे, त्यांच्यात फरक न करता, वापरली जातात आणि अर्थात् त्यामुळे अर्थाच्या नेमकेपणाला बाधा येते. एखादे प्रश्नवाक्य मोठ्या विधानार्थी वाक्यात समाविष्ट असेल तर त्या प्रश्नवाक्यानंतर प्रश्नचिन्ह वापरायचे की नाही, याबद्दलही अनिश्चिती दिसते. कोणते सामासिक शब्द जोडून लिहायचे, कोणते सुटे लिहायचे आणि कोणत्या सामासिक शब्दांना संयोगचिन्हाने जोडायचे यांतही एकवाक्यता आढळत नाही. स्पष्टीकरण व निक्षेप (पॅरेन्थसिस) यासाठी आडवी रेघ व कंस (गोल/चौकटी/महिरपी) या दोन्ही चिन्हांचा लेखकाच्या शैलीनुसार वापर झाल्याचे दिसते. एकूण विरामचिन्हांच्या उपयोगाबाबत निश्चित संकेत मराठीत रूढ झालेले दिसत नाहीत. त्यामुळे काही लेखक विरामचिन्हांचा (आणि त्यांतही उद्‌गारचिन्हासारख्या काही ठरावीक विरामचिन्हांचा) अतिरिक्त वापर करतात तर काही लेखक विरामचिन्हांच्या बाबतीत अत्यंत मितव्ययी असल्याचे आढळते.

संदर्भ देण्याच्या पद्धतीची बाब यापेक्षा भिन्न आहे. पूर्वी प्रत्येक संदर्भाला अंकचिन्ह देऊन त्याचे स्पष्टीकरण पानाच्या तळाशी किंवा लेखाच्या किंवा (पुस्तकातील) प्रकरणाच्या अखेरीस दिले जाई. शिवाय पुस्तकाच्या अखेरीस सर्व संदर्भ पुन्हा दिले जात. पुनरुक्ती टाळण्यासाठी 'पूर्वोक्त', 'तत्रैव' हे शब्द वापरले जात. यामुळे संदर्भांच्या संख्येला फुगवटा येई. लेखन वाचताना संदर्भ पाहाणे कटकटीचे व वेळखाऊपणाचे होई. शिवाय संदर्भटिपा व स्पष्टीकरण किंवा अधिक मजकुराच्या टिपा यांत फरक करता येत नसे. त्यामुळे ही पद्धत सुमारे पन्नास वर्षांपूर्वी इंग्रजीत कालबाह्य झाली. त्याऐवजी अधिक सोयीची, वेळ व जागा यांची बचत करणारी

पद्धती वापरात आली; संशोधनपद्धतींच्या पुस्तकांत तिचा समावेश झाला; त्या पद्धतीतील सूक्ष्म तपशील देणाऱ्या शैलीपुस्तिका तयार झाल्या. संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवल्या जाणाऱ्या प्राथमिक गोष्टींत त्या पद्धतीचा समावेश झाला. भौतिक विज्ञाने, सामाजिक विज्ञाने व शास्त्रे, साहित्य या विषयांतील इंग्रजीत लिहिल्या जाणाऱ्या प्रबंधांत नवीन पद्धतीचा उपयोग केला जातो. पण मराठीच्या प्रांतात या पद्धतीचा पाऊस काय, शिडकावाही झालेला दिसत नाही. इंग्रजीत प्रबंधलेखन केलेले काही लेखक (उदाहरणार्थ, डॉ. अशोक रा. केळकर, डॉ. मिलिंद मालशे) या पद्धतीचा आपल्या मराठी लेखनातही कटाक्षाने वापर करतात. ('भाषा आणि जीवन'मध्येही त्याच पद्धतीचा वापर करण्याचा प्रयत्न केला जातो. लेखकांना सूचना दिल्या जातात.) पण बरेच लेखक (फक्त मराठीतून लिहिणारे आणि इंग्रजीत लिहिताना नवीन पद्धतीचा वापर करणारे पण मराठीत लिहिताना) नवीन पद्धती मनावर घेत नाहीत किंवा 'चालायचंच !' असे म्हणून ती सोडून देतात. (नवीन पद्धतीचे काही आवश्यक तपशील 'भाषा आणि जीवन'मध्ये 'लेखकांना सूचना' या सदरात दिले जातात.)

मराठीच्या विकासासाठी या 'चालायचंच !' वृत्तीचा सर्व वाचक व लेखकांनी त्याग करून नेमकेपणाचा, अचूकतेचा आग्रह धरला पाहिजे. ■

— प्र. ना. परांजपे

लेखकांसाठी सूचना : १

लिखाण हस्तलिखित असो की टंकलिखित, ते कागदाच्या एकाच बाजूस सुवाच्य असावे. ओळींमध्ये व लिखाणाच्या चारही बाजूंना व्यवस्थित अंतर ठेवावे. लेखात इंग्रजी अवतरणे असल्यास त्यांचे मराठी भाषांतरही द्यावे. व्यक्तींची, ग्रंथांची नावे, लेखांची शीर्षके, पारिभाषिक संज्ञा इ० देवनागरी लिपीत लिहावे. अतिशय अपरिहार्य असेल अशाच ठिकाणी रोमन लिपीचा वापर करावा. लिखाणाच्या शीर्षकानंतर लेखकाने स्वतःचे नाव लिहावे. लिखाणाच्या शेवटी, थोडी जागा सोडून, पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहावा. नावातील आद्याक्षरे मराठी लेखनपद्धतीप्रमाणे द्यावीत. ('ए.आर.' नको; 'अ.रा.' हवे.) लिखाणाची भाषा शक्यतो सोपी व नेमकी असावी. पुनरुक्ती, अनावश्यक शब्दयोजना, क्लिष्ट वाक्यरचना टाळावी. लिखाणासोबत स्वतंत्र कागदावर स्वतःचा परिचय (शिक्षण, व्यवसाय, प्रकाशित लेखन इ०) थोडक्यात द्यावा. दूरध्वनी क्रमांक (संकेतक्रमांकासह) द्यावा.

अनुक्रमणिका

आदरांजली

शरच्चंद्र बडोदेकर

उज्ज्वला बर्वे

मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांच्या दृष्टीने दु:खद अशी घटना म्हणजे शरच्चंद्र बडोदेकर यांचे निधन. ते ६३ वर्षांचे होते. अपघातात जखमी झाल्याने त्यांना शुक्रवार, दि.२ जून २००६ रोजी मृत्यू आला. उत्तम भाषांतरकार, प्रकाशन-व्यवसायातील जाणकार, ग्रंथ-संपादनातील तज्ज्ञ आणि मराठीच्या विकासासाठी झटणारे ,शुद्धलेखन, मुद्रित-शोधन यांमधील अधिकारी व्यक्ती अशी त्यांची ओळख होती. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, ओरिएंट लाँगमन अशा प्रख्यात प्रकाशन संस्थांमध्ये संपादक म्हणून त्यांनी काम केले. भाषाशास्त्रातील किंवा किमान मराठी साहित्यातील एम्.ए. ही पदवी नसूनही स्वाध्याय व कष्ट यांच्या साहाय्याने त्यांनी तेवढा अधिकार मिळवला होता.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या स्थापनेपासून त्यांनी विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाची धुरा सांभाळली. तो विभाग कार्यक्षमतेने सांभाळल्यामुळे काही काळ बडोदेकर यांच्याकडे दृक्-श्राव्य विभागाची सूत्रेही सोपवण्यात आली होती.

मुक्त विद्यापीठातून निवृत्त झाल्यावर आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि पिंपरीच्या डी.वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात उपकुलसचिव या पदावर त्यांनी काम केले. इंग्रजीवरील प्रभुत्व, इंग्रजीतील औपचारिक पत्रव्यवहाराचे कसब आणि प्रशासकीय कामातील गती यांमुळे या दोन संस्थांमध्येही त्यांच्या कामाची प्रशंसा होत असे.

साहित्य, संगीत, रंगभूमी यांमध्ये ते रस घेत. जो विषय मनाला भावेल व इतरांना सांगावासा वाटेल त्यावर तातडीने पत्र/लेख लिहून तो वर्तमानपत्राकडे पाठवण्यात ते तत्पर असत. पुण्यात हनुमान आणि वेताळ या टेकड्यांवरचे आक्रमण रोखण्यासाठी सुमारे २५ वर्षांपूर्वी जी चळवळ उभी राहिली त्याचे प्रणेते बडोदेकर होते.

सहकाऱ्यांशी, कनिष्ठांशी त्यांचे संबंध सहज मैत्रीचे असत. ज्या कुटुंबांशी, संस्थांशी ओळख होईल त्यांच्याशीही ते जिव्हाळ्याचे नाते जोडत. ‘मराठी अभ्यास परिषदे’चे ते सभासद होते; संस्थेच्या, तसेच ‘भाषा आणि जीवन’च्या कार्यात ते चिकित्सकपणे रस घेत. ■

८, मनीषा पार्क, १६९, डहाणूकर कॉलनी, पुणे ४११०३८. फोन : २५३९४६३७

अनुक्रमणिका

शब्दभ्रम, अर्थभ्रम

द. भि. कुलकर्णी

माझ्या विद्यार्थ्यांना मी नेहमी सांगतो, ''बाबांनो, तुमचं अक्षर सुवाच्य नसलं तरी चालेल; ते वाच्य असू द्या.'' लेखनिकांना तर आणखी सांगतो, ''तुम्ही मुद्रकासाठी लिहीत आहात, हे लक्षात ठेवा. तो भाषेचा आणि वाङ्मयाचा जाणकार असेलच असे नाही; म्हणून त्याचा अक्षरभ्रम होईल असे अक्षर काढू नका. घ-ध, म-प, थ-य, क-फ, ख-र व, र-ट, क्ष-ज्ञ यांच्या प्रत्येक अवयवाकडे, वळणाकडे लक्ष द्या. मुद्रकाचा घोटाळा होऊ देऊ नका.'' ते ऐकतात आणि हळूहळू सुधारतात; पण मान्यवर लेखक लिहिताना ज्या चुका करतात, जो अर्थभ्रम वाचकाच्या मनात निर्माण करतात त्याचे काय ? त्यांचे ते अर्थभ्रम समाजात पसरत जातात आणि शास्त्रापेक्षा रूढी बलवान या सुभाषिताच्या आधारे मान्यता मिळवून बसतात. यावर एक इलाज, प्रत्येक मान्यवर संस्थेने 'मराठी मार्गदर्शन अधिकारी' नेमणे व आपली शैली-पुस्तिका तयार करणे हा आहे.

आता हे पाहा, संपादक-प्रकाशक सर्रास, 'काव्यसंग्रह', 'आवृत्ती चौदावी', 'मूल्य शंभर रुपये' अशी परिभाषा वापरतात; ती बरोबर आहे का ? 'काव्य' म्हणजे 'पोएट्री;' 'कविता' म्हणजे 'पोएम.' काव्य हा एक वाङ्मयप्रकार आहे. त्याचा संग्रह कसा होईल ? संग्रह कवितांचाच होईल; म्हणून 'काव्यसंग्रह' नव्हे 'कवितासंग्रह' म्हणावयास हवे. 'विशाखा' हा काव्यसंग्रह आहे असे म्हणणे बरोबर नाही. 'विशाखा' हा कवितासंग्रह आहे' किंवा 'विशाखा' हा काव्यग्रंथ आहे–'' असे म्हणा. तोच प्रकार 'आवृत्ती' या शब्दाचा. 'एडिशन' या शब्दाचा तो मराठी अवतार. मराठीत ग्रंथाच्या ज्या तथाकथित आवृत्त्या निघतात ती पुनर्मुद्रणे असतात. 'आवृत्ती'मध्ये बदल, परिष्करण, संक्षेप, विस्तार असे काहीतरी अभिप्रेत असते. 'किंमत' म्हणजे 'प्राईस' आणि 'मूल्य' म्हणजे 'व्हॅल्यू.' प्रकाशक ग्रंथाची किंमत ठरवितो की त्याचे मूल्य सांगतो ? ग्रंथाचे मूल्य ठरविण्याचा अधिकार जाणकार वाचकाचा; किंमत ठरविण्याचा अधिकार प्रकाशकाचा; नाही ?

अनुक्रमणिका

परवा एक विद्यार्थी म्हणाला, ''सर, तुमचे मत अगदी विवाद्य आहे.'' मी म्हटले, ''सांग बाबा, तुला ते का पटत नाही ते !'' त्यावर तो म्हणतो काय, ''नाही, नाही. काही बोलायलाच नको. ते अगदी विवाद्य आहे.'' 'वादातीत' आणि 'विवाद्य' या शब्दांच्या अर्थाबद्दलचा हा घोटाळा; मग 'अक्षुण्ण', 'मंथर', 'क्लिन्न', 'प्रच्छन्न' या अपरिचित संस्कृत शब्दांबद्दल बोलायलाच नको; चांगले चांगले लेखक, प्रकाशक हे शब्द भलत्याच अर्थाने वापरतात. बरे, आपण नेमक्या अर्थाने ते वापरले तर संपादक-प्रकाशक त्यात 'चुकीची दुरुस्ती' करणार ! एकदा मी 'लेखकद्वयाने' असे लिहिले तर प्रकाशकाने 'लेखकद्वयांनी' अशी दुरुस्ती केली ! भौतिक आणि आधिभौतिक हे विरुद्धार्थी शब्द आहेत असे समजणारे लेखक काही कमी नाहीत. बोला.

भाषा तंतुवाद्यासारखी असते. तिच्या तारा कसबी बोटांनी आणि तन्मय वृत्तीने छेडायच्या असतात – निदान भाषा हे ज्यांचे विशेष साधन किंवा माध्यम असते त्यांनी – ज्यांना भोपळेच इकडून तिकडे उचलून ठेवायचे असतात त्यांनाही त्या वाद्याची किमान काळजी घ्यावीच लागते !

भाषा वापरताना शब्द आणि वाक्य यांचा अर्थ, त्यांतील भावसूर (काकुस्वर), त्यांतील सूक्ष्म विराम-आघात-कंप-क्रम हे सारे आपण जेव्हा सांभाळू तेव्हाच आपला आशय अचूक अभिव्यक्त होईल व दुसऱ्यापर्यंत अचूक पोचेल; नाही ? सिंह, संसार, फार, फूल इत्यादी शब्दांचे चुकीचे उच्चार अलीकडे इतके रूढ झाले आहेत की बरोबर उच्चार लोकांना चूक वाटायला लागले आहेत !

शब्दकोश आणि व्याकरणाचे नियम पाठ करून ही दुरवस्था दूर होणार नाही; त्यासाठी आपल्याला आपली भाषिक संवेदनशीलताच वृद्धिंगत करावी लागेल – केवळ मातृभाषाच नव्हे, एकूण भाषासंस्थाच पवित्र, मूल्यवान आणि अलवार आहे हे स्वत:ला पटवून द्यावे लागेल; नहून बालकवी – बोरकर – सुरेश भट यांची नादमधुर रचना आपल्या कानाला कळेल, पण मनाला कळणार नाही; केशवसुत – कुसुमाग्रज – मुक्तिबोध यांची सामाजिक कविता आपल्या बुद्धीला कळेल, पण रसिकतेला कळणार नाही. एवढेच नव्हे तर भूकंपपीडित, जलपीडित, रोगपीडित यांचे आकडे कळतील पण त्यांची वेदना कळणार नाही; भाषिक कुपोषण आपणांस असे सर्वांगाने बधिर करीत जाईल. उलट, आश्चर्य म्हणजे भाषाभिन्न अंगाने येणारा बधिरपणा भाषावाद्य निरस्त करू शकते– या विधानाचा अर्थ कळतोय ना ? भाषाशक्तीने आपण इतर व्यवहारातील बधिरपणा दूर करू शकतो असे मला म्हणायचे आहे !

भाषा जितकी जाणकारीने वापरू आपण तितकी तिची अभिव्यक्तीची,

संप्रेषणाची, साठवणाची, नवनिर्मितीची शक्ती वाढत जाते. आपण आणि प्रतिभावंत साहित्यिकही भाषा समाजापासून एकमार्गी उसनी घेत नसतो; तिला अधिक शक्तिमान करून ती सव्याज समाजाला परत करीत असतो – तसे आज होताना दिसत नाही. आपले सोडा; प्रतिभावंतांनाही याचे पुरेसे भान नाही. हुळहुळते लोकप्रिय शब्द, बखरबोली किंवा लोकबोली यांचे बिंबप्रतिबिंबवत् अनुकरण यांतून भाषा, भाषिक संवेदनशीलता वा वाङ्मयकृती उन्नत होत नसते; त्यांतून भाषेची परतफेड होत नसते. त्यांतून नवे अर्थभ्रम मात्र निर्माण होतात. अक्षरभ्रम परवडले; ते दूर करता येतात; अर्थभ्रम मात्र समाजात चरत जातात. अर्थभ्रम हा भाषिक रोग नाही; रोग-प्रतिकारक्षमता नष्ट करणारी ती एक भाषिक अवस्था आहे.

■

'वसुधा', ई-००४, 'डीएसके विश्व', सिंहगड रोड पल्याड, धायरी, पुणे ४११०४१.
फोन : (०२०) २४३८०८९४

लेखकांसाठी सूचना : २

<u>संदर्भ देण्याची नवी, सोयीस्कर व जागेचा अपव्यय टाळणारी पद्धत पुढे दिली आहे. या पद्धतीचाच आपल्या लेखात उपयोग करावा :</u> लेखात ज्या ठिकाणी संदर्भ द्यावयाचा असेल तेथे कंसामध्ये संबंधित पुस्तक-लेखकाचे नाव द्यावे आणि त्यापुढे संदर्भित पुस्तक/लेखाचे प्रकाशनवर्ष द्यावे. त्यानंतर, आवश्यक असल्यास, स्वल्पविराम देऊन पृष्ठक्रमांक लिहावा व कंस पुरा करावा. लिखाणाच्या अखेरीस 'संदर्भसूची'मध्ये संदर्भातील सर्व तपशील द्यावेत.सूचीतील प्रत्येक नोंदीतील तपशीलांचा क्रम साधारणपणे असा ठेवावा : लेखकाचे आडनाव, स्वल्पविराम, नावांची आद्याक्षरे, प्रकाशनवर्ष, ग्रंथाचे शीर्षक, पूर्णविराम, प्रकाशनसंस्था, स्वल्पविराम, प्रकाशनस्थळ, पूर्णविराम. <u>संदर्भसूची मराठीच्या वर्णक्रमानुसार असावी.</u>

डावे-उजवे

मिलिंद मालशे

मानवी जीवनामध्ये डावे-उजवेपणाला फार मूलभूत असे स्थान आहे, हे बऱ्याचदा आपल्या लक्षात येत नाही. एखादे लहान मूल डाव्या हाताने काही क्रिया स्वाभाविकपणे करू लागले की बहुतेकांची प्रतिक्रिया नकारात्मक असते, आणि त्यातूनच मग उजव्या हाताने क्रिया करायला त्या मुलाला शिकवण्यात येऊ लागते. डावखुरेपणाविषयीच्या सामाजिक-सांस्कृतिक गैरसमजांमधून या प्रतिक्रिया होत असतात. आपल्याला येथे डावे-उजवेपणाच्या सांस्कृतिक, राजकीय आणि जैविक पैलूंची चर्चा करायची आहे.

सांस्कृतिक डावे-उजवे

बहुतेक सर्वच मानवी समाजांमध्ये डावी बाजू प्रबळ असणाऱ्या म्हणजेच डावखुऱ्या व्यक्तीविषयी काही समज-गैरसमज रूढ झालेले आढळतात.

आपण प्रथम भाषेच्या पातळीवर विचार करू. डाव्याला संस्कृत भाषेत 'वाम' असा शब्द आहे आणि त्याच्याशी निगडित असणारे अर्थ हे बव्हंशी नकारात्मक, अशुभवाचक आहेत; याउलट उजवी बाजू म्हणजे 'दक्षिण', आणि या शब्दाचा संबंध दक्ष वा कुशल असण्याशी आहे. वामाचार आणि दक्षिणाचार हे दोन्ही आचार शक्तिपूजेमध्ये आहेत, परंतु दक्षिणाचार हा उजव्या व सरळ वा योग्य मार्गाने केलेला आचार तर वामाचार हा डाव्या हाताने केलेला म्हणजे वाकड्या वा अयोग्य मार्गाने केलेला आचार, असा भेद आहे.

मराठीमध्येही एखादी गोष्ट 'उजवी ठरणे' म्हणजे दुसऱ्या गोष्टींशी तुलना करता अधिक चांगली ठरणे ! त्याचप्रमाणे 'डावे-उजवे करणे' म्हणजे कनिष्ठ-श्रेष्ठ याचा निवाडा करणे ! गुजरातीमध्ये उजव्या हातानेच जेवणे भाग असते; कारण उजवी बाजू म्हणजे 'जमणी' किंवा जेवण्याची बाजू !

लॅटिन आणि इंग्लिश या भाषांमध्ये तर हा विरोध अधिकच स्पष्ट आहे. लॅटिनमध्ये उजवी बाजू म्हणजे 'डेक्स्टर' (कौशल्याशी संबंधित) तर डावी म्हणजे 'सिनिस्टर' (अशुभ, घातक) ! लॅटिन आणि संस्कृत या दोन्ही भारतार्य भाषाकुलातील भाषा

असल्याने 'डेक्स्टर' आणि 'दक्षिण' यांच्यात नाते असणेही अशक्य नाही. इंग्लिशमध्ये डावी बाजू म्हणजे 'लेफ्ट' आणि जुन्या इंग्लिशमध्ये या शब्दाचा संबंध दुर्बलतेशी तर होताच; परंतु त्याचबरोबर अर्धांगवायूमुळे येणाऱ्या अपंगत्वाशीही होता; याउलट उजवी बाजू म्हणजे 'राइट', म्हणजेच योग्य, खरी, आदर्शवत् बाजू ! 'लेफ्ट-हँडिड कॉम्प्लिमंट' म्हणजे खोचकपणे किंवा तिरकसपणे केलेली प्रशंसा ! फ्रेंच, जर्मन, इटालिअन, स्पॅनिश या सर्वच युरोपीय भाषांमध्ये अशाच प्रकारचे संकेत रूढ असलेले आढळतात. भारतार्य भाषाकुलाशी संबंधित नसणाऱ्या अरेबिक, जपानी यांसारख्या अनेक भाषांमध्येसुद्धा डाव्या बाजूसाठी असणारे शब्द हे अशुभदर्शक, दुर्बलतादर्शक असलेले आढळतात.

डाव्या हाताने एखादा व्यवहार करणे हे बहुतेक संस्कृतींमध्ये अशुभ, अशिव समजले जाते. ग्रीक आणि रोमन संस्कृतींमध्ये डावी बाजू ही दुय्यम दर्जाची मानली जात असे आणि पाखंडाशी तिचा संबंध जोडला जात असे. त्यामुळेच लॅटिन भाषेत वर म्हटल्याप्रमाणे डाव्या बाजूसाठी 'सिनिस्टर' असा शब्द होता. मध्ययुगीन युरोपात डावेपणाचा संबंध जादूटोण्याशी जोडला जाई. डावखुरी माणसे ही सैतानाचे चाकर असतात असे कॅथलिक चर्च मानते. अरबांमध्ये आजही डाव्या बाजूचा संबंध घाणीशी व अस्वच्छतेशी जोडला जातो आणि डाव्या हाताचा स्पर्श अशुभ मानला जातो.

डावी बाजू प्रबळ असणारी माणसे, हा एक अल्पसंख्य, अपवादात्मक व्यक्तींचा गट आहे, ही जाणीव प्राचीन काळापासून बहुतेक सर्वच संस्कृतींमध्ये असलेली आढळते. मात्र हा वर्ग नक्की किती लहान वा मोठा आहे हे सांगता येणे कठीण आहे, कारण प्रारंभी म्हटल्याप्रमाणे बहुतेक सर्वच समाजांमध्ये डावखुरेपणा हा एक दोष मानून तो टाळण्यासाठी अगदी लहानपणापासून प्रयत्न केले जातात. अमेरिकेतील एका पाहणीमध्ये दहा टक्के व्यक्ती डावखुऱ्या असलेल्या आढळल्या. डावखुऱ्या व्यक्ती या अल्पसंख्य असल्या तरी डावखुरेपणा हा दोष नव्हे, आणि तो सुधारणे हे त्या व्यक्तीच्या दृष्टीने घातक ठरते, ही जाणीव फार अलीकडची आहे. अशा परिस्थितीमध्ये नक्की किती टक्के माणसांमध्ये निसर्गतःच डावी बाजू प्रबळ असते, याची गणना करता येणे जवळजवळ अशक्य आहे. मात्र, वाटते त्यापेक्षा ती बरीच मोठी असावी. साधारण दहा ते पंधरा टक्के मानव डावखुरे असावेत, असे म्हणता येईल. मातेच्या उदरात असणाऱ्या २७० गर्भांची वैज्ञानिक अल्ट्रा-साउंड तपासणी एका प्रयोगात केली असता ९२ टक्के गर्भ हे उजवा अंगठा चोखताना आढळले.

भारतीय अभिजात संगीताच्या प्रांतामध्ये तंबोरा छेडण्यासाठी फारशा उच्च दर्जाच्या कौशल्याची गरज नसल्याने तो नेहमी उजव्या हातानेच छेडला जातो; डावखुऱ्या व्यक्तींना डाव्या हाताने तानपुरा वाजवायची परवानगी नसते. मात्र तबला, पखावज,

मृदंग, हार्मोनियम इत्यादी वाद्ये डावखुरी माणसे डाव्या हातानेच वाजवतात. बासरी हे वाद्य बनविताना डावखुऱ्या वादकांसाठी वेगळ्या प्रकारे बनवावे लागते. ध्रुपद गायकीबरोबर उजव्या हाताने पखावज-वादन करणारा साथीदार हा गायकाच्या उजव्या बाजूला बसतो, मात्र डावखुरा पखावज-वादक साथ करीत असेल तर त्याला गायकाच्या डाव्या बाजूला बसावे लागते. ख्याल गायकीमध्ये मात्र साथीदार तबला-वादक व्यक्ती ही डावखुरी असली तरी ती गायकाच्या उजव्या बाजूलाच बसते.

स्पर्धात्मक खेळांमध्ये डावखुरेपणाला खूपच महत्त्व प्राप्त होते आणि नैसर्गिकपणे डावखुरे असणाऱ्यांना येथे खूपच वाव असतो. उजवी बाजू प्रबळ असणाऱ्या खेळाडूंना डावऱ्यांचा मुकाबला करणे खूपच जड जाते व त्यासाठी वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागते. टेनिसमध्ये ब्योर्ग, कॉनर्स, मॅकेन्रो, मार्टिना नवरातिलोवा यांसारखे दिग्गज खेळाडू डावखुरे होते. क्रिकेटमध्येही वसीम अक्रम याच्यासारखा श्रेष्ठ वेगवान गोलंदाज डावखुरा होता. डावखुरा ऑफ स्पिनर हा फिरकी गोलंदाजांचा एक वर्गच आहे. भारताचा बिशनसिंग बेदी हा त्याचे एक श्रेष्ठ उदाहरण आहे. शिवाय, गोलंदाजीसाठी एक बाजू तर फलंदाजीसाठी दुसरी, असा वापर करणारे खेळाडूही आढळतात. भारतीय क्रिकेटपटूंपैकी रवी शास्त्री हा डाव्या हाताने फिरकी गोलंदाजी करीत असे तर उजव्या हाताने फलंदाजी करीत असे; याउलट सौरभ गांगुली हा फलंदाजी डाव्या हाताने करतो तर मध्यमगती गोलंदाजी उजव्या हाताने करतो.

राजकीय डावे-उजवे

राजकीय संदर्भामध्ये डावे-उजवेपणाचा विचार विचारप्रणालींच्या पातळीवर आणि ऐतिहासिक संदर्भात करावा लागतो. उजवी व डावी विचारप्रणाली यांच्यातील भेद हा आधुनिकतेच्या संभाषितामधील एक महत्त्वाचा भेद आहे. युरोपीय प्रबोधनकाळामध्ये समाजाच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकशाही राज्यपद्धतीचा उदय हा होता. त्याचबरोबर आधुनिकीकरणा-विषयीचे चिंतन आणि संभाषितही सुरू झाले. लोकशाहीच्या उदयाच्या काळामध्ये उजवेपणा म्हणजे सामाजिक श्रेष्ठत्व तर डावेपणा म्हणजे कनिष्ठत्व, असे पारंपरिक विभाजन होते. १७८९च्या फ्रेंच घटना समितीमध्ये ३०० प्रतिनिधी सरंजामी वर्गाचे होते, ३०० प्रतिनिधी चर्चचे होते आणि ६०० प्रतिनिधी सर्वसामान्य जनतेचे होते. सरंजामी वर्गाच्या आणि चर्चच्या प्रतिनिधींना अर्थातच परंपरेमुळे मानाचे स्थान होते, व त्यामुळे असेंब्लीच्या अध्यक्षांच्या उजव्या हाताला ते स्थानापन्न झाले, तर सर्वसामान्य लोकांच्या प्रतिनिधींना अध्यक्षांच्या डाव्या हाताला स्थान मिळाले. युरोपीय राष्ट्रांच्या विधिसभांमधून हीच पद्धत रूढ झाली.

अनुक्रमणिका

अठराव्या शतकामध्ये लोकशाहीची राज्यव्यवस्था अधिकाधिक दृढ होऊ लागली. या प्रक्रियेमध्ये परंपरानिष्ठ, धर्मनिष्ठ, एकाधिकारनिष्ठ, उच्च वर्गाचे हितसंबंध जपणाऱ्या सनातनी विचारप्रणालीला उजवी प्रणाली, तर समाजाला सर्वसामान्य जनतेच्या इच्छा-आकांक्षांनुसार, शासनाच्या आधुनिक तत्त्वांनुसार नव्याने घडवू पाहणाऱ्या सुधारणावादी विचारप्रणालीला डावी प्रणाली, असे म्हणण्याचा प्रघात सुरू झाला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये मार्क्सने आपला क्रांतिकारी सिद्धांत मांडला. सामाजिक परिवर्तनाच्या व सुधारणेच्या अनेक प्रकारच्या चळवळींपैकी सर्वात वेधक व ठसा उमटविणारी चळवळ ही वर्गाधिष्ठित, विषमताधिष्ठित समाज संपवू पाहणारी मार्क्सवादी, साम्यवादी क्रांतीची चळवळ होती. मार्क्सवादी सिद्धांताच्या चौकटीमध्ये डावेपणा म्हणजे मार्क्सवादी क्रांतीवर विश्वास असणारी जहाल विचारप्रणाली, तर उजवेपणा म्हणजे सरंजामी वर्गाऐवजी आता नव्याने वर आलेल्या भांडवलदार वर्गाचे हितसंबंध जपणारी व विषमता टिकविणाऱ्या परंपरांना संरक्षण देऊ पाहणारी मवाळ विचारप्रणाली, असे समीकरण रूढ झाले.

सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतामध्ये रूपवाद व संरचनावाद या कलेला स्वायत्त स्थान देणाऱ्या सौंदर्यवादी व कलावादी भूमिका 'उजवी'कडे कल असणाऱ्या भूमिका मानल्या जातात; उलट इतिहास, समाज, संस्कृती या संकल्पनांच्या संदर्भात कलेचा विचार करणाऱ्या भूमिका 'डाव्या' किंवा 'जहाल' भूमिका मानल्या जातात. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये तरी डाव्या, वामपंथीय किंवा जहाल भूमिका म्हणजे मार्क्सवादी भूमिका, असे मानले जाई.

दुसरे महायुद्ध आणि त्यानंतरचे शीतयुद्ध या घटनांच्या अनुभवांमुळे परिस्थिती बदलू लागली. १९५० नंतर मार्क्सवादाची चिकित्सा सुरू होऊन नव-मार्क्सवादी किंवा नवीन डावी भूमिका उदयाला आली. मार्क्सच्या समोर एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक भांडवलशाहीचे प्रश्न होते, व त्यांना लागू पडेल असे आर्थिक विषमतेचे विश्लेषण त्याने मांडले; परंतु विसाव्या शतकातील ग्राहकवादी भांडवलशाहीचे प्रश्न वेगळेच आहेत, व त्यांना मार्क्सचे विश्लेषण लागू पडत नाही, अशी भूमिका पुढे येऊ लागली. चीनमध्ये माओने मांडलेले शेतकीकरण आणि ग्रामीण क्रांती यांच्यावर भर देणारे मार्क्सवादाचे नवे रूप व त्याने घडवून आणलेली 'सांस्कृतिक' क्रांती (१९६६-६९) यांमधून पारंपरिक मार्क्सवादाला मोठेच भगदाड पडलेले होते. औद्योगिक श्रमिक वर्गाने घडवून आणायच्या क्रांतीचे मार्क्सचे स्वप्न पार विरून गेलेले होते. जड आर्थिक पाया, आर्थिक वर्ग या पारंपरिक मार्क्सवादामधील महत्त्वाच्या संकल्पना वादग्रस्त ठरू लागल्या होत्या; मूलभूत असा आर्थिक वा भौतिक पाया

आणि त्यावर उभी असणारी सांस्कृतिक, वैचारिक इमारत, यांतील अंतर ग्रामची, रेमंड विल्यम्झ यांच्यासारख्या विचारवंतांनी कमी केले.

आर्थिक विषमता क्रांतीच्या द्वारे नष्ट केली की इतर सर्व प्रकारची विषमता आपोआपच दूर होईल, हे पारंपरिक मार्क्सवादी स्वप्नही पूर्णपणे विरून गेले होते. रशिया, पोलंड आणि कंबोडिया या देशांमध्ये मार्क्सवादी शासनाने केलेल्या शिरकाणांमुळे पारंपरिक मार्क्सवाद बदनाम झाला होता. शिवाय भांडवलशाही व्यवस्था असणाऱ्या समाजामध्ये सांस्कृतिक आविष्काराचे केंद्र हे अभिजनवादी राहू शकणार नाही; तेथे बहुजनवादी किंवा 'पॉप्युलर' संस्कृतीचे आविष्कार हेच महत्त्वाचे ठरू लागतात, ही जाणीवही निर्माण होऊ लागली.

हळूहळू मार्क्सवादाच्या सीमारेषेवरील किंवा त्याबाहेरील तत्त्वांवर आधारलेल्या, मार्क्सवादाशी अत्यंत क्षीण नाते असणाऱ्या, मार्क्सवादी संज्ञांचा सैलपणे उपयोग करणाऱ्या, आणि तरीही जहाल डाव्या म्हणविणाऱ्या भूमिका उदयाला आल्या. यांनाच काही वेळा 'उत्तर-मार्क्सवादी' भूमिका असे नाव दिले जाते. १९६० नंतर अमेरिका आणि इतर विकसित पाश्चात्य समाजांमध्ये जहाल व डाव्या चळवळींचे केंद्र आर्थिक विषमता व तिचे निराकरण हे राहिले नाही; इतर प्रकारची विषमता, अन्याय व शोषण (उदाहरणार्थ, लिंगभेदाधिष्ठित, वंशवादी, इ०) आणि त्यांचे निराकरण या गोष्टी केंद्रस्थानी येऊ पाहात होत्या. शिवाय जागतिक अशांतता आणि पर्यावरणात्मक असमतोल यांनी इतके उग्र रूप धारण केले की शांततावादी आणि पर्यावरणवादी जहाल चळवळींची आवश्यकता निर्माण झाली. उत्तर-वासाहतिक समाजांच्या उदयाच्या संदर्भातही मार्क्सवादी तत्त्वांचा पुनर्विचार सुरू झाला. थोडक्यात, जहाल, डाव्या चळवळीचे मार्क्सवादाशी असलेले नाते अत्यंत क्षीण झाले.

सौंदर्यशास्त्रीय व साहित्यशास्त्रीय सिद्धांतांचा विचार केला तर नव-इतिहासवाद, उत्तर-वसाहतवाद आणि सांस्कृतिक समीक्षा यांचे मार्क्सवादाशी असणारे नाते असेच क्षीण स्वरूपाचे आहे, किंबहुना काही बाबतीत ते मार्क्सवादविरोधीही आहे; परंतु तरीही या तीन भूमिकांना साहित्यसिद्धांतांच्या क्षेत्रामध्ये जहाल डाव्या भूमिका म्हणूनच ओळखले जाते, कारण वर म्हटल्याप्रमाणे या भूमिका साहित्याचा विचार रूपनिष्ठ स्वायत्त तत्त्वांच्या साहाय्याने न करता सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक तत्त्वांच्या साहाय्याने करू पाहतात. यालाच 'समीक्षेतील राजकारणवाद' म्हणता येईल. पारंपरिक मार्क्सवादाचा प्रभाव ओसरल्यानंतर एक प्रचंड बौद्धिक रितेपणा पाश्चात्य समाजांमध्ये निर्माण झाला व त्यातून इतर प्रकारच्या 'डाव्या' भूमिका निर्माण झाल्या, असे म्हटले पाहिजे.

जैविक डावे-उजवे

प्रारंभी आपण म्हटल्याप्रमाणे जवळजवळ सर्वच मानवी समाजांमध्ये डावखुरेपणाविषयी नकारात्मक दृष्टिकोण आढळण्याचे कारण काय असावे, हा एक गहन प्रश्न आहे. उत्क्रांतीच्या रेट्यात मानवाची उजवी बाजू प्रबळ झाली आणि त्यातून बहुतेक सर्वच मानवी समाजांमध्ये डावी बाजू प्रबळ असणाऱ्या म्हणजेच डावखुऱ्या व्यक्तींविषयी काही समजुती रूढ झाल्या किंवा काय, याविषयी नक्की काही सांगता येणे कठीण आहे. जैविक आणि सांस्कृतिक यांच्यात काही संबंध असू शकतो, एवढेच सध्या म्हणता येईल. जैविक दृष्टीने विचार करता मानवाच्या शरीरात डावी आणि उजवी अशा दोन बाजू असतात. हात, पाय, कान, डोळे, हे अवयव दोन-दोन असतातच; शिवाय, मेंदू, हृदय या अवयवांना उजवे आणि डावे कप्पे असतात. त्यामुळे संपूर्ण मज्जासंस्था हीच उजव्या आणि डाव्या अशा दोन बाजूंची बनलेली असते. मानवी मेंदूच्या द्विभाजनाचा थोडा अधिक विचार करू.

मेंदूच्या डाव्या आणि उजव्या अर्धभागांना जोडणाऱ्या 'कॉर्पस कलोसम' या भागामुळे दोन्ही अर्धभागांचा परस्परांशी संबंध राहतो. शरीराच्या डाव्या भागाचे नियंत्रण मेंदूच्या उजव्या अर्धभागातून होत असते, तर उजव्या भागाचे नियंत्रण मेंदूच्या डाव्या अर्धभागातून होत असते. म्हणजे असे की नाक खाजवायचे असेल तर डाव्या हाताला आज्ञा मिळते ती मेंदूच्या उजव्या अर्धभागातून. अर्धभागीय नियंत्रण किंवा 'लॅटरलायझेशन' हे मेंदूच्या कार्यपद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. **मेंदूच्या डाव्या व उजव्या अर्धभागांनी कोणत्या संवेदनांचे व क्रियांचे नियंत्रण होते याचे एक ढोबळ चित्र पुढीलप्रमाणे दाखविता येईल :**

डावा मेंदू	उजवा मेंदू
भाषिक ध्वनी, वाचा, हालचालींचे नियंत्रण, लेखन	अभाषिक ध्वनी, सांगीतिक स्वर आणि त्यांच्या रचना, स्पर्शसंवेदना
कालक्रमसंवेदना, वाचन	दृश्य व स्थल संवेदना
भाषा	अभाषिक विचार
कल्पनासाहचर्य	
आकडेमोड	
विश्लेषण	
उजव्या बाजूचे दृश्यक्षेत्र	डाव्या बाजूचे दृश्यक्षेत्र

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये पॉल ब्रोका या फ्रेंच शल्यविशारदाने त्याचप्रमाणे कार्ल वर्निके या जर्मन वैद्यकीय संशोधकाने केलेल्या संशोधनावरून असे आढळले की प्रत्यक्ष बोलणे, बोललेले समजणे या प्रक्रियांचे नियंत्रण डाव्या मेंदूमध्येच होत असते. पुढे डावखुऱ्या व्यक्तींचे संशोधन अधिक व्हायला लागल्यावर असे आढळले की उजव्या व्यक्तींपैकी ९९ टक्के व्यक्तींमध्ये बोलणे व बोललेले समजणे या क्रिया डाव्या मेंदूने नियंत्रित होतात, तर डावखुऱ्या व्यक्तींपैकी ६० टक्के व्यक्तींमध्येही त्या डाव्या मेंदूनेच नियंत्रित होतात.

महत्त्वाची गोष्ट अशी की मेंदूच्या डाव्या-उजव्या विभाजनामध्ये एक असमतोल असतो, म्हणजे असे की या दोन बाजूंपैकी एक बाजू अधिक प्रभावी असते. मानवाच्या उत्क्रांतीमध्ये उजवी बाजू (म्हणजे अर्थातच मेंदूचा डावा अर्धभाग) अधिक प्रभावी ठरून उजवेपणा ही सामान्य जैविक स्थिती तर डावरेपणा ही अपवादात्मक स्थिती अशी परिस्थिती निर्माण झाली असावी, असे काही वैज्ञानिक मानतात.

उजवा हात प्रबळ असणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींच्या बाबतीत उजवी बाजूच प्रबळ असते, म्हणजे उजवा डोळा, उजवा पाय, उजवा कान इत्यादी प्रबळ असतात. डावा हात प्रबळ असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत मात्र संपूर्ण डावी बाजूच प्रबळ असते असे नाही. त्यांच्या बाबतीत उजवा डोळा, कान, पाय इत्यादी प्रबळ असू शकतात.

वैज्ञानिकांनी मानवेतर प्राण्यांवर काही प्रयोग केलेले आहेत. वस्तूंना स्पर्श करणे वा त्या उचलणे, बिळांमध्ये शिरणे, दांड्या दाबणे वा ओढणे, डबे उघडणे यांसारख्या क्रिया करताना वेगवेगळे प्राणी व पक्षी कोणता पंजा प्रामुख्याने वापरतात, याचे संशोधन झालेले आहे. मांजरे आणि पोपट यांच्या बाबतीत डावा पंजा, तर उंदीर व माकडे यांच्या बाबतीत उजवा पंजा साधारणपणे जास्त कार्यरत असलेला आढळला आहे. परंतु मानवामध्ये उजव्या बाजूला जेवढे प्राधान्य मिळते तेवढ्या प्रमाणात मानवेतर जिवांच्या बाबतीत विशिष्ट बाजू इतक्या प्रमाणात प्रभावी ठरलेली आढळत नाही. मातेच्या उदरात असलेल्या गर्भाची अल्ट्रासाउंड चित्रे घेतल्यावर वैज्ञानिकांना असे आढळले की या नऊ महिन्यांत ९२ टक्के गर्भ हे उजवा अंगठा चोखत असतात.

मानवामध्ये उजव्या बाजूला प्राधान्य असते हे खरे असले तरी त्याचे निश्चित कारण मात्र अजूनही नेमकेपणे सांगता येत नाही. या संदर्भातील एक महत्त्वाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे : उत्क्रांतीच्या रेट्यामध्ये मानव (तसेच, मानवाला जवळ असणारी माकडे) दोन पायांवर चालू लागले तेव्हा त्यांच्या हाताला आणि विशेषत: हाताच्या बोटांना अधिक कार्य करावे लागले. शारीरिक हालचालींना नेमकेपणे नियंत्रित करण्याचे केंद्र मानवी मेंदूच्या डाव्या अर्धभागामध्ये असल्याने अश्मयुगामध्ये दगडाचा साधन म्हणून उपयोग व्हायला लागल्यानंतर मानवाच्या उजव्या बाजूला प्राधान्य मिळू

लागले असावे. उजव्या भागाने डाव्या शरीराला नियंत्रित करावे अशी आज्ञा मेंदूच्या डाव्या भागातून उजव्या भागाला जात असते. भाषेचे केंद्रही मेंदूच्या डाव्या भागातच असते. तेव्हा मेंदूचा डावा भाग, म्हणजेच शरीराची उजवी बाजू प्रबळ होण्यामागे ही कारणे असावीत. ■

मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान विभाग, आय.आय.टी., पवई, मुंबई ४०० ०७६
ई-मेल : malshe@hss.iitb.ac.in milindmalshe@yahoo.com

रंग-भाषेतील डावे-उजवे !

आपल्या भाषिक ज्ञानाचा परिणाम आपल्या दृष्टीवर होतो, असं कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी सप्रमाण दाखवून दिलंय. रंगांमधलं वेगळेपण किंवा त्याच्या वेगवेगळ्या छटा आपल्या किती चटकन् लक्षात येतात हे आपण कोणत्या बाजूनं पाहतो यावर अवलंबून असतं. म्हणूनच भाषेमुळे 'दृष्टी' बदलू शकते, असं ते म्हणतात.

भाषेवर आपली आकलनक्षमता अवलंबून असते. काही आदिवासी जमातींना मोजताच येत नाही; याचं कारण त्यांच्या भाषेत अंकांसाठी शब्दच नसतात.

डाव्या आणि उजव्या मेंदूमध्ये रंगांचं विश्लेषण कसं होतं, याचा अभ्यास केल्यास या प्रश्नाचं उत्तर मिळू शकेल, असं शास्त्रज्ञांना वाटलं. भाषेवरील प्रक्रिया प्रामुख्याने मेंदूच्या डाव्या भागात होते. याच भागात आपल्या डोळ्यांच्या पडद्याच्या डाव्या भागातील प्रतिमांचंही विश्लेषण केलं जातं. आपल्या उजव्या बाजूच्या वस्तूंकडून येणारे प्रकाशकिरण डोळ्याच्या पडद्याच्या डाव्या भागावर पडत असतात. म्हणून शास्त्रज्ञांनी असं गृहीत धरलं, की उजवीकडच्या रंगांवर भाषेचा परिणाम स्पष्टपणे दिसू शकेल आणि डावीकडच्या वस्तूंच्या प्रतिमा डोळ्याच्या उजव्या भागावर पडतात. त्यामुळे उजवीकडच्या रंगांवर भाषेचा परिणाम खूपच कमी असेल. मग या गृहितकाचा पडताळा घेण्यासाठी त्यांनी वर्तुळात मांडलेल्या हिरव्या रंगाच्या चौकोनांची चित्रं लोकांना दाखवायला सुरुवात केली. सर्वच चित्रांमध्ये वर्तुळातल्या एका चौकोनाचा रंग अगदी वेगळा (निळा) किंवा हिरव्यातल्याच वेगळ्या छटेचा होता. काही चित्रांत तो डावीकडे आणि काही चित्रांत उजवीकडे होता. हे वेगळे चौकोन ओळखायला लोकांना किती वेळ लागतो हे मोजलं, तेव्हा डाव्या बाजूचे चौकोन लगेच ओळखता येतात; पण उजव्या बाजूला असताना निळ्या चौकोनापेक्षा वेगळ्या हिरव्या छटेचा चौकोन ओळखायला जास्त वेळ लागतो, असं लक्षात आलं. निळ्या रंगासाठी स्वतंत्र शब्द आहे आणि हिरव्या छटांसाठी नाहीत म्हणून असं घडतं, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. त्यांनी मग चाचण्या चालू असताना लोकांना शब्द पाठ करायला दिले. मग दोन्ही बाजूंचे वेगळे चौकोन ओळखायला लोकांना सारखाच वेळ लागला. कारण शब्दांचे विश्लेषण करण्याच्या मेंदूच्या क्षमतेचा त्यात अडथळा नव्हता.

आता रंगांप्रमाणेच आपल्या दैनंदिन वापरातल्या गोष्टींकडे पाहण्याची आपली दृष्टीही त्या वस्तूंच्या स्थानानुसार किंवा त्यांच्या वर्णनासाठी वापरल्या जाणाऱ्या भाषेनुसार बदलते काय, हे पाहण्याचं शास्त्रज्ञांनी ठरवलं आहे. **- अभिजित मुळ्ये दै. सकाळ, ३०-१२-०५**

प्राध्यापक सुमित्र मंगेश कत्रे यांची कार्यशैली

अशोक रा. केळकर



प्रसंग जन्मशताब्दीचा

प्राध्यापक डॉ. सु.मं. कत्रे (१९०६-१९९८) हे डेकन कॉलेज हे संशोधन-संस्था म्हणून पुनरुज्जीवित झाल्यावरचे पहिले संचालक (१९४२-१९७१) होते. या दीर्घ कारकिर्दीत डेकन कॉलेजला एक संशोधन-संस्था आणि पदव्युत्तर शिक्षण-केंद्र म्हणून प्रथम अखिल भारतीय आणि नंतर आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा तर त्यांनी मिळवून दिलीच; पण शिवाय एकंदर भारतामधील भाषेच्या अभ्यासाला त्यांनी आधुनिकतेचे वळण मिळवून दिले आणि संस्कृत शब्दभांडाराच्या अभ्यासाला एक ऐतिहासिक आणि ज्ञानभाषीय वळण मिळवून दिले. कत्र्यांच्या जन्मशताब्दीचे निमित्त साधून डेकन कॉलेजने एक अखिल भारतीय चर्चासत्र (१९-२० जानेवारी २००६) आयोजित केले. त्याला सर्व भारतातून आदरपूर्वक प्रतिसाद मिळाला.

चर्चासत्राच्या उद्घाटनसत्रात त्यांचे सुरुवातीचे विद्यार्थी आणि नंतरचे सहकारी प्रा. डॉ. मधुकर अनंत मेहेंदळे यांनी आपल्या बीजभाषणात कत्र्यांच्या ह्या दुहेरी कामगिरीचा आढावा घेतला. **भाषा आणि जीवन**च्या वाचकांना तो मराठीत अगोदरच श्रद्धांजलीच्या रूपात उपलब्ध झालेला आहे. (१६:४ दिवाळी १९९८). त्याच अंकात जीवनपट आणि लेखनसूची दिलेली आहे. प्रस्तुत लेखकाने आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांना अभिवादन करण्याची संधी कत्र्यांच्या कार्यशैलीचे विवेचन करून घेतली. मूळ इंग्रजी भाषणाचा किंचित् वाढवलेला अनुवाद इथे दिला आहे.

अभिवादनपर भाषण

मित्रहो !

प्राध्यापक सुनीतिकुमार चटर्जी आणि प्राध्यापक सुमित्र मंगेश कत्रे म्हणजे आधुनिक भारतातील भाषाविज्ञानाच्या क्षेत्रातले दोन दिग्गज. चटर्जींनी आधुनिक भाषाविज्ञानाच्या जागतिक नकाशावर भारताला आपले स्थान मिळवून दिले, तर कत्र्यांनी भारताच्या आधुनिक विद्याक्षेत्राच्या नकाशात आधुनिक भाषाविज्ञान विषयाला आपले स्थान मिळवून दिले. माझे मोठे भाग्य असे की माझ्या विद्याक्षेत्रातील कारकीर्दीच्या सुरुवातीलाच हे दोघेजण अनुकरणीय आदर्श म्हणून लाभले. चटर्जींनी मला १९५४मध्ये शब्दोच्चाराचे शास्त्र शिकवले. खरे तर असे म्हणायला लागेल की 'ॲलिस इन वंडरलँड अँड थ्रू द लुकिंग ग्लास' पुस्तकातील पांढऱ्या सशाने या ॲलिसला हाताला धरून स्वनविज्ञानाच्या अद्‌भुत दुनियेत नेऊन सोडले. (नंतर पुढे १९५८ साली मी त्यांना आपला पदवीप्रबंध दाखवला तेव्हा त्यांनी मला एक वेगळ्या प्रकारे गुरूपदेश केला. आपल्या मोकळ्याढाकळ्या पद्धतीने ते म्हणाले– हे बघ, माझ्या या वयात मला भाषेचा अभ्यास करण्याचे हे नवे वळण आत्मसात् करवणार नाही. तू ते केलेस याचा मला नक्कीच आनंद आहे. पण त्याबरोबर या झंझावातात तू आपली वैचारिक स्वतंत्रता गमावून बसला नाहीस तर मला आणखी जास्त आनंद वाटेल.) कत्र्यांनी मला तसे थेट शिकवलेले नाही, पण डेकन कॉलेजमध्ये प्रथम विद्यार्थी म्हणून १९५४-५६ साली आणि पुढे अध्यापक म्हणून १९६२पासून काम करताना मला त्यांना एक आधुनिक विद्याक्षेत्रीय संचालक म्हणून काम करताना जवळून पाहण्याची संधी मिळाली. इथे जमलेल्या तरुण पिढीतील मंडळींना माझ्या भाग्यात वाटेकरी करून घ्यायचे मी योजिले आहे.

पहिली लक्षणीय गोष्ट म्हणजे कत्र्यांच्या दृष्टीने डेकन कॉलेज ही अक्ख्या भारताला उपलब्ध असलेली एक सुवर्ण-सुविधा ठरावी. सर्व भारतातून इथे विद्यार्थी आणि शिक्षक आकर्षित होतात आणि उलटपक्षी (त्यांच्या खुषीचा भाग म्हणजे) इथून भारतभर

आणि कधी तर भारताच्या सीमेपलीकडे देखील संशोधक आणि शिक्षक पुरवले जातात. कुणी 'अधिक हिरव्या कुरणाच्या' शोधात डेकन कॉलेज सोडायचे म्हटले तर ते कधीही त्याला-तिला रोखत नसत. सिंधी स्वातंत्र्यसैनिक जयरामदास दौलतराम यांनी जेव्हा काळजी व्यक्त केली की आपल्या भाषेला भारतीय विद्याक्षेत्रात फाळणीनंतर आता कुणी वाली उरला नाही तेव्हा कत्र्यांनी सिंधी भाषेच्या अभ्यासाला डेकन कॉलेजमध्ये स्थान दिले. न्यूयॉर्कच्या रॉकफेलर फाउंडेशनने लक्षात घेतले की भारताला आपल्या व्यामिश्र भाषिक गरजा निभावण्यासाठी प्रशिक्षित भाषावैज्ञानिकांची गरज आहे. जेव्हा त्यांनी या विषयाला चालना देण्यासाठी ठिकाण निवडण्यासाठी देशाची पाहणी केली तेव्हा त्यांच्या निधीतून चाललेला 'लँग्वेज प्रॉजेक्ट' (१९५४-५९) कार्यान्वित करण्यासाठी डेकन कॉलेजची निवड होणे क्रमप्राप्तच होते. भारतात इतर कुठेही असे केंद्र स्थापले असते तर स्थानिक मंडळींनी या मोठ्या निधीचा बराचसा हिस्सा आपल्यापुरताच वापरला असता अशी फाउंडेशनची धारणा असावी. अखेर जेव्हा अमेरिकेचे अनुदान संपले तेव्हा भारताच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. चिं.द्वा. देशमुख या योजनेच्या पाठीशी उभे राहिले आणि त्यांनी डेकन कॉलेज व इतरत्र भाषाविज्ञान विषयाचा योजनाबद्ध विकास करण्यासाठी अनुदान (१९५९-६४) उपलब्ध करून दिले.

विद्याक्षेत्रातील कुणाही संचालकाला मुबलक निधी कसा उपलब्ध होईल याची चिंता वहावी लागते, आणि विविध शासकीय आणि बिगरशासकीय वित्तस्रोतांकडून पैसा पैदा करावा लागतो. मात्र येणाऱ्या पैशाबरोबर गैरवाजवी नियंत्रणे लादली जाणार नाहीत ना हेही पहावे लागते. विद्याक्षेत्रीय स्वायत्ततेला कत्रे नित्य जपत. ही दुहेरी कसरत करताना ते या यंत्रणांपुढे कधीच गुडघे टेकत नसत आणि डेकन कॉलेजच्या व्यवस्थापन-मंडळाचा पाठिंबा या बाबतीत आपल्याला नेहमी मिळत राहील याची काळजी घेत.

कत्रे केवळ डेकन कॉलेजच्या स्वायत्ततेबद्दलच जागरूक नसत तर कॉलेजमधील विविध विभागांची स्वायत्तताही ते मानत. मात्र आपण पुऱ्या डेकन कॉलेजचे संचालक असल्यामुळे कॉलेजचे सर्वच विभाग फुलतील-फळतील, निदान आपली हिरवाई टिकवून राहतील हे पाहण्याची जबाबदारीही आपल्यावर असल्याचे ते मानत. त्यांनी कॉलेजमध्ये त्या काळी समाविष्ट असलेल्या भाषाविज्ञान व संस्कृत, पुरावशेषविद्या व सांस्कृतिक इतिहास, मानवविज्ञान व समाजविज्ञान, आणि मराठ्यांचा व मध्ययुगीन भारताचा इतिहास या विभागांमध्ये कधी पक्षपात केला नाही. इतर विभागांना मागे सारून स्वत:च्या विषयालाच पुढावा दिला नाही. एकदा तर त्यांनी संचालकपदाचे वजन खर्चून

एका विभागाला खुरटण्यापासून वाचवले – पदव्युत्तर विद्यार्थी तयार करण्याच्या ठोस कार्यक्रमाच्या अभावी आणि ना प्रपाठक वा अधिव्याख्याता केवळ संशोधन साहाय्यक एवढ्यावर काम रेटण्यामुळे त्या विभागाची कोंडी होत आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी ती कोंडी फोडली.

त्यांची तपशिलाकडे नजर असे आणि त्यांना उत्तम अभिरुची होती. नवीन बांधकाम करवून घेताना जुन्या देखण्या वारसाभूत इमारतींना ढळ पोचणार नाही याचे त्यांनी भान ठेवले. डेकन कॉलेजची प्रकाशने निगुतीने काढली जातील, मुद्राक्षर आणि चित्रांकनापासून बांधणी आणि आवरणांपर्यंत ती सुबक असतील यावर त्यांचा कटाक्ष असे. बटबटीतपणा किंवा भडकपणा याचे त्यांना वावडे होते. पण तपशिलावर नजर ठेवणे याचा अर्थ त्यांच्याबरोबर काम करणाऱ्यांना वैताग आणणे असा कधीच होत नसे. तुम्ही माझ्या'बरोबर' काम करता आहात, माझ्या हाता'खाली' नव्हे असे त्यांचे सांगणे असे. (माझे तत्कालीन सहकारी, समाजवैज्ञानिक डॉ. विद्याधर पुंडलीक मला एकदा म्हणतात– मी डॉ. कत्र्यांबरोबर कॉलेजच्या कोर्टावर अधूनमधून टेनिस खेळत असतो. माझ्यापेक्षा वयाने कितीतरी मोठे असून ते पुष्कळदा जिंकतात. ते कसे ? तर कोर्टाच्या मागच्या अंगाला एका छोट्या परीघात राहून केलेल्या कुशल पदन्यासाच्या जोरावर कमीत कमी श्रमात ते सबंध कोर्टावर हुकमत ठेवतात. संचालक म्हणून त्यांना मिळालेल्या यशाचे रहस्य या निरीक्षणामुळे माझ्या हातात आले !) जबाबदारी कुणाकुणावर सोपवून देण्याची त्यांची पद्धत होती – नंतर आपण 'बॉस' आहोत हे जाणवून देण्यासाठी तपशिलात ढवळाढवळ करत बसण्याची खोड त्यांना नव्हती. कुणी काही नवी क्लृप्ती सुचवली तर सामान्यपणे त्यांचा सकारात्मक प्रतिसाद असे – करून पहायला काय हरकत आहे ? जसे ते दीर्घ काळपर्यंत तरुणसदृश दिसत राहिले तसेच ते मनाने तरुण राहिले. मी त्यांना एकदा म्हणून पाहिले की स्वनविज्ञान (फोनेटिक्स) शिकवताना संबंधित शरीररचनेच्या त्रिमितियुक्त प्रतिकृती आणि तसेच काही शैक्षणिक चित्रपट मुलांना दाखवता आले तर ते कितीतरी परिणामकारी होईल. नोकरीत मी नवीनच होतो त्यामुळे मी येणाऱ्या खर्चाचा भीतभीतच उल्लेख केला. सगळ्यात उत्तम सामग्री देशात वा विदेशात कोणती मिळण्यासारखी आहे याची चौकशी करायला त्यांनी मला उत्तेजन दिले. किंचित् हसून ते म्हणतात– शिकवण्याचा दर्जा उत्तम ठेवण्याची जबाबदारी तुमची, त्यासाठी पैसे उपलब्ध करण्याची जबाबदारी माझी. जणू काही ते म्हणून गेले – काळजी कसली करता ? 'हम हैं न ?' उत्तम काम करण्याची प्रेरणा बरोबरच्या मंडळींना देण्याची त्यांची ही रीत होती. अगदी चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची निष्ठा त्यांना मिळत असे; ते आपली काळजी वाहतात

हे त्यांना जणू आपसूक कळून येत असे.

जगीं सर्वांगपरिपूर्ण असा कोण आहे ? संचालक म्हणून काम करताना कत्र्यांचेही काही प्रतिकूल पूर्वग्रह, काही अनुकूल पूर्वग्रह असत. त्यांनी काही चुकीचे निर्णय घेतल्याचे मान्य करायला पाहिजे. एक गोष्ट मात्र कबूल करायला पाहिजे की आपले काही चुकले आहे असे लक्षात आल्यावर तो कधी प्रतिष्ठेचा प्रश्न ते बनवीत नसत. चूक दुरुस्त करायचा आणि जमेल तेवढे झालेले नुकसान भरून काढण्याचा ते मनापासून प्रयत्न करत असत. त्यांच्यामध्ये दोन ठळक उणिवा होत्या. एक म्हणजे ते माणसावर नको इतका भरवसा ठेवत. एखाद्यावर जबाबदारी टाकताना ती व्यक्ती त्या लायकीची आहे याची कसून पारख करण्याची काळजी ते नेहमीच घेत असत असे नाही. दुसरा एक दोष म्हणजे दुसऱ्याशी संज्ञापन (कम्युनिकेशन) साधताना ते नेहमी खालची पट्टी लावत. संचालकाला आपली पसंती किंवा नापसंती कधीकधी ठणठणीतपणे जाहीर करावी लागते. मंद स्मित किंवा कपाळावरची सूक्ष्म आठी यांनी संबंधितांना उत्तेजन द्यायचे किंवा आवर घालायचे आवश्यक काम नेहमी होतेच असे नाही. किंबहुना भारतीय समाजात कामाची ही निवांत शैली परिणामकारी होतेच असे नाही हे कबूल करायला पाहिजे !

कत्र्यांचे डेकन कॉलेजबद्दलचे स्वप्नदर्शन आज पूर्णत: साकार करता आलेले नाही हे मान्य करावे लागेल, ते अपेश नाकारण्यात काही मतलब नाही. काही अंशी हे बहिर्गत कारणांमुळे घडले आहे. संचालकाच्या पूर्णत: हातात नसलेल्या गोष्टी याला कारण झालेल्या आहेत. कत्र्यांना ह्या बाह्य घटकांचा वास्तव अंदाज नेहमीच घेता आला असे म्हणवत नाही. उदाहरणार्थ, एक दैवदुर्विलास म्हणजे ज्या मराठी मातीत हे भाषाविज्ञान-केंद्र उभारले गेले त्याच्याकडे मराठीभाषक विद्यार्थी, अध्यापक, आणि पालक यांनी पाठ फिरवली. भाषाविज्ञान विषयाला भविष्य आहे याचा मराठी माणसाला अंदाज आला नाही; नव्या क्षेत्रात पडण्याचे धाडस त्याला जमले नाही; किंवा त्याचे सरळ दुर्लक्षच झाले. नंतर बऱ्याच वर्षांनी आपली चूक त्यांच्या लक्षात आली. तेव्हा मराठीजनांमधल्या प्रस्थापित राजकारणी आणि प्रशासक यांना याबद्दल वैषम्य वाटू लागले. पण अशा बर्हिगत कारणांबरोबर काही अंतर्गत कारणांची भर पडून अपेश पदरी पडायला मदतच झाली. ही अंतर्गत कारणे कोणती ?

अगदी खरे सांगायचे म्हणजे कत्रे नेमके काय करू पहात होते याचा त्यांच्या सहकाऱ्यांना आणि उत्तराधिकाऱ्यांना अंदाज आला नाही. विद्याक्षेत्रीय व्यवस्थापनाची एक अभिनव संकल्पना कत्रे राबवू पहात होते. 'अभिनव' संकल्पना अशासाठी म्हणायचे की तोपर्यंत भारतीय विद्याक्षेत्रात रूढ असलेल्या व्यवस्थापन-शैलींपेक्षा ती

अजिबात निराळी शैली होती. त्यांच्यापैकी पहिली म्हणजे पितृसत्ताक वळणाची (पॅटर्नलिस्टिक) शैली. प्रमुख सर्वज्ञ असतो आणि कुटुंबाचे वा कुटुंबातील सदस्यांचे हित त्याच्या मनी असते. जोपर्यंत इतर हे मानतात आणि सर्वज्ञ आणि सर्वहितैषी प्रमुखाचा निर्णय स्वीकारतात तोपर्यंत (आणि तोपर्यंतच) सगळे काही गोडीगुलाबीत चालते. दुसरी म्हणजे संरजामशाही वळणाची (फ्यूडलिस्टिक) शैली. प्रमुख हा स्वामी आणि इतरांनी आपली निष्ठा आणि सेवा त्याला अर्पायची आणि त्याच्या 'हाताखाली' काम करायचे. संस्था चालते ती प्रमुखाच्या महिम्यासाठी, तिची उद्दिष्टे आणि उद्दिष्टपूर्तीचा कार्यक्रम तोच ठरवणार. तिसरी नोकरशाही वळणाची (ब्यूरोक्रॅटिक) शैली. नियमांची अंमलबजावणी हे संस्थाप्रमुखाचे मुख्य कार्य. हे नियम अर्थातच अमूर्त आणि पूर्वनिश्चित असणार. गफलत कुठे होते ? माणसे नेहमीच नियमात बसत नाहीत आणि प्रसंग असे उद्‌भवतात की ज्यांची पूर्वकल्पना नियम बनवताना कुणी केलेली नसते. प्रमुखाला काय त्याचे ? तो नियम रेटतच राहतो, मग माणसांचे काहीही होऊ दे, आलेला प्रसंग निभावला जावो वा न जावो, त्याला त्याचे काही सोयरसुतक नसते. कत्र्यांची कार्यशैली आणि व्यवस्थापनशैली ना पितृसत्ताक वळणाची, ना सरंजामशाही वळणाची, ना नोकरशाही वळणाची. तिचे वर्णन कसे करायचे ? आपण कत्र्यांच्या शैलीला माणुसकीला जागणारी आणि जपणारी मानव्यलक्षी (ह्यूमेन-humane) व्यवस्थापनशैली म्हणून संबोधू. सर्जक विकास सुलभ करणारी ही कार्यशैली. त्यांच्या सहकाऱ्यांना आणि उत्तराधिकाऱ्यांना ती कशी कळणार ? त्यांना फक्त जुन्याच व्यवस्थापनशैली विद्याक्षेत्रात ठाऊक होत्या. किंबहुना त्यांच्यातच ते बुडलेले होते. या अवस्थेला काही अपवाद होते. प्रबोध पंडित हा एक; त्यांनी डेकन कॉलेजमध्ये उचललेली ही शैली दिल्ली विद्यापीठाच्या भाषा विज्ञान विभागाला लावून दाखवली आणि परिणाम चांगले झाले. दुसरा अपवाद प्राध्यापक मेहेंदळ्यांचा; पण त्यांना ही व्यवस्थापनशैली लावून दाखवायची कधी संधी मिळाली नाही. तिसराही एक अपवाद आहे, पण तो कोणता हे सांगायचे तर आत्मस्तुतीचा दोष कसा पत्करायचा ?

अभिवादन–प्रसंगानंतर

या भाषणात दोन महत्त्वाचे विचार ओझरते येऊन गेले. त्यांचा विस्तार त्याप्रसंगी नक्कीच अप्रस्तुत ठरला असता. कत्र्यांच्या जन्मशताब्दीचा सोहळा आटोपल्यानंतर या विचारांचा विस्तार करणे निश्चितच जरुरीचे आणि हिताचे ठरेल.

पहिला विचार म्हणजे विद्याक्षेत्रातील उपलब्ध व्यवस्थापनशैलींचा. तो प्रश्न केवळ डेकन कॉलेजपुरता मर्यादित नाही हे उघड आहे. आज केवळ विज्ञानाधिष्ठित नव्हे

तर ज्ञानाधिष्ठित समाजाच्या उभारणीची भाषा आपण करतो आहोत. त्यासाठी विविध विषयांतल्या विद्यावंतांची निरंतर उपलब्धता किती आवश्यक आहे याची जाणीव आता आता भारतीयांना, अर्थकारण आणि राजकारण क्षेत्रांतील त्यांच्या नेत्यांना होते आहे. आणि इथेच आपण कमी पडत आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर आणि नंतर काही वर्षे मोठ्या दूरदृष्टीने आणि उमेदीने निरनिराळ्या संस्था उभारल्या गेल्या – काही अखिल भारतीय पातळीवरच्या सुविधा म्हणून, काही प्रादेशिक पातळीवरच्या सुविधा म्हणून. मात्र त्यातल्या बऱ्याचशा विद्याक्षेत्रातील पितृसत्ताक, सरंजामशाही किंवा नोकरशाही अशा जुन्या वळणाच्या व्यवस्थापनशैलीनेच चालवल्या गेल्या. त्यामुळे त्यांचा व्हावा तितका सर्जक विकास झाला नाही आणि त्यांच्यामधून उपलब्ध होणाऱ्या विद्यावंतांची संख्या गुणवत्तेचा निकषावर असावी तितकी मोठी राहिली नाही. (काही संस्थांची तर चरायची कुरणे बनलेली आहेत, कसले व्यवस्थापन नि काय ?)

उदाहरणार्थ, माझ्यासमोर आज भारतातील भाषाविज्ञानाच्या शिक्षणाची आणि संशोधन-उपयोजनांची विविध केंद्रे आहेत. डॉ. चिं.द्वा. देशमुख यांचा सल्ला होता की सुरवातीच्या वर्षांत तरी खूप सारी केंद्रे न उघडता काही मोजकीच केंद्रे अशी उघडा की ज्यांची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय स्तराची असावी. जसजसे गुणवत्तापूर्ण प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल तसतसा अधिक केंद्रांचा विचार करता येईल. पण व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपोटी हा सल्ला धुडकावला गेला. परिणामी, गुणवत्तेबद्दलचे कत्रे-देशमुख द्वयीचे स्वप्न दूरच राहिले, पैशांची कमतरता तर जाणवत आहे, प्रवेशार्थींची गुणवत्ता घसरत आहे, काही केंद्रे तर बंद पडत आहेत. जुनाट व्यवस्थापनशैलींचे चित्रविचित्र नमुने मला दिसत आहेत. जन्मशताब्दीच्या चर्चासत्रात देखील या दारुण स्थितीचा ओझरता व अनौपचारिक उल्लेख झाला.

भारतात निर्माण झालेल्या या नव्याजुन्या सुविधांकडून जेवढी आकांक्षा आणि अपेक्षा होती, ज्या सर्जकतेच्या आणि विकासाच्या/शक्यता होत्या त्या काही वास्तवात येऊ शकलेल्या नाहीत. याची निश्चितच काही संस्थांच्या बाह्य परिस्थितीशी संबंधित कारणे आहेत तर काही संस्थांच्या अंतर्गत व्यवस्थापनाशी आणि कार्यशैलीशी संबंधित आहेत.

प्रस्तुत संदर्भात मला एवढेच लक्षात आणून द्यायचे आहे की ज्याप्रमाणे आज उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रांतील व्यवस्थापनतंत्राचा कसून विचार होतो आहे, नवनवीन व्यवस्थापनतंत्रे आत्मसात् करणे आणि विकसित करणे किंवा व्यवस्थापक होऊ पाहणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देणे या गोष्टींकडे लक्ष दिले जात आहे त्याप्रमाणे विद्याक्षेत्रातील व्यवस्थापनाविषयी थोडेही लक्ष दिले जात नाही. संचालक, कुलगुरू,

प्राचार्य, विभागप्रमुख यांसारखी पदे भरताना किंवा भरण्यापूर्वी संबंधितांना विद्याक्षेत्रीय व्यवस्थापनातील गरजा आणि उपाययोजना याबद्दल जाणीव करून देण्याची गरज आहे. अशा जाणीवेच्या आणि प्रशिक्षण-सुविधांच्या अभावी पारंपरिक शैलींची चलती राहिली आहे आणि विद्याक्षेत्राचे त्याच्या अध्यापन आणि संशोधन या दोन्ही अंगाने खूपच नुकसान होत आहे.

दुसरा विचार म्हणजे भाषाविज्ञानाच्या क्षेत्राची मराठी माणसाने केलेली दारुण उपेक्षा, किंबहुना दाखवलेला कर्मदरिद्रीपणा. (कत्र्यांच्या कार्याची उपेक्षा मग ओघानेच आली.) डेकन कॉलेजमधे या विषयाची गंगा वाहिली, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचे तरुण, कॅनडापासून फिलिपाइन्सपर्यंतचे अभ्यासक तिच्यात सुस्नात झाले, पण महाराष्ट्र कोरडाच राहिला, मराठी जनता आणि ओघानेच शासन-प्रशासन यांनी सापत्नभाव दाखवला.

माझ्या डेकन कॉलेजमधील अध्यापकीय कारकिर्दीत (१९६२-८९) कधीकधी एम्.ए.च्या वर्गात एकही मराठी विद्यार्थी नसायचा, कुणी मला विनंती केली की मराठी भाषा आणि भाषाविज्ञान या दोन्हींचे उत्तम ज्ञान असलेल्या तुमच्या डोळ्यासमोरच्या तरुण व्यक्तीचे नाव सुचवा तर माझी पुष्कळदा पंचाईत व्हायची, कुणा व्यक्तीचे नाव सुचवलेच तर ती व्यक्ती कधी कच खायची (इतक्या दूर जायचे ? तिथे मराठी जेवण मिळेल का ? इत्यादी). आता तरुण मंडळी वेगळ्या दिशेने विचार करत आहेत, त्यामुळे ही स्थिती संख्येच्या दृष्टीने सुधारते आहे असे ऐकतो, पण गुणवत्तेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह आहेच. काही गुणवत्तापूर्ण मराठी तरुण भाषावैज्ञानिक परदेशी जाऊन तिथेच स्थायिक होणे अधिक पसंत करतात.

मराठी माणसाच्या कर्मदरिद्रीपणाची कडवट भाषा मी का केली ते यावरून स्पष्ट होईल. आज मराठी तरुणाची दृष्टी बदलते आहे आणि क्षितिजे विस्तारत आहेत ही चांगली गोष्ट आहे. पण तेवढे पुरेसे नाही. आज डेकन कॉलेजच्या भाषाविज्ञान विभागाला एकदोन स्वदेशी 'रॉकफेलरां'ची सक्त जरूर आहे. रिकाम्या ठेवलेल्या जागांच्या ऐवजी नवीन देणगीवर आधारित पदे, ग्रंथालयासारखी वाढीव अनुदान, प्रयोगशाळा कायम कार्यक्षम राहण्यासाठी अनुदान... डेकन कॉलेजची विद्याक्षेत्रात अजूनही उत्तम पत आहे तोवरच हे सगळे व्हायला पाहिजे.

■

७ धनंजय, ७५९/८३ भांडारकर रस्ता, गल्ली ६ द्वारा, पुणे ४११००४

सुविहित गौरवग्रंथ

कल्याण काळे

[जोशी सु.ग. (संपादक) – डॉ. देवीसिंग चौहान गौरवग्रंथ, डॉ. देवीसिंग चौहान गौरव समिती, लातूर; मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर; मार्च १९९९; पृ.सं. ३६+४६८+४० = ५४४]

लातूरच्या डॉ. देवीसिंग चौहान गौरव समितीने हा गौरवग्रंथ तयार करण्याचा संकल्प १९८८ साली सोडला. सर्व लेखांची जमवाजमव करून त्यांच्यावर संपादकीय संस्कार आणि मुद्रणसंस्कार करून तो प्रसिद्ध करायला १९९९ साल उजाडले. हा ग्रंथ प्रकाशित होऊनही आता सात वर्षे उलटून गेली. दरम्यानच्या काळात डॉ. देवीसिंग चौहान यांचे निधन झाले (१० डिसें २००४) आणि गौरवग्रंथ स्मृतिग्रंथाच्या मालिकेत जमा झाला.

या ग्रंथाच्या निर्मितीसाठी संपादक सु.ग. जोशी यांनी बरेच परिश्रम घेतलेले दिसतात. त्यांना या प्रकारच्या संपादनांचा खूप अनुभव आहे. त्यांनी संशोधनपर लेखांना वाहिलेले 'मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक' १९७४ ते १९७७ अशी चार वर्षे चालविले आणि त्यातून उत्तमोत्तम संशोधनपर लेख प्रसिद्ध केले. त्यांनी मराठवाडा संशोधन मंडळ ही संस्था स्थापन करून गेली ३०-३२ वर्षे तिचा कार्यभार सांभाळला आहे. त्यांचा स्वत:चा संस्कृत वाङ्मयाचा चांगला व्यासंग आहे. महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील अनेक अभ्यासक विद्वानांशी त्यांचा जवळचा परिचय आहे. या पूर्वानुभवाची पार्श्वभूमी असल्याने या ग्रंथातही त्यांना उत्तमोत्तम संशोधनपर लेखांचा समावेश करता आला आहे. जोडीला डॉ. देवीसिंगजींच्या चौफेर व्यासंगाचा दबदबा होताच. त्यामुळे हा ग्रंथ भारदस्त झाला आहे, हे तो वरवर चाळतांनादेखील सहज लक्षात येते.

हा गौरवग्रंथ असल्यामुळे डॉ. देवीसिंग चौहान यांनाच तो अर्पण केला आहे. अर्पण पत्रिकेत ''हैद्राबाद स्टेटचे आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, व्यासंगी संशोधक, वैदिक साहित्याचे अभ्यासू, प्राचीन मराठी आणि दक्खिनी हिंदीचे ख्यातनाम

टीकाकार व ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक'' या बिरुदांनी त्यांचा गौरव केला आहे. तो अत्यंत समर्पक असून डॉ. देवीसिंग चौहान यांच्या जीवनभरातील कर्तृत्वाचे आणि त्याद्वारे त्यांनी संशोधनक्षेत्राला केलेल्या योगदानाचे दर्शन त्यातून घडते. या ग्रंथाची 'दोन शब्द' या शीर्षकाची प्रस्तावना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लिहिलेली आहे. तिच्यात त्यांनी डॉ. देवीसिंग चौहान यांच्या राजकीय, सामाजिक आणि विद्याक्षेत्रातील कामगिरीचा औचित्यपूर्ण शब्दात आढावा घेतला आहे. या ग्रंथातील श्री. नारायणराव लोहारेकर यांचा लेखही देवीसिंगजींचे जीवन व कार्य यांचा सामग्र्याने परिचय करून देणारा आहे. देवीसिंगजींच्या चरित्राशी संबंधित एवढा भाग सोडला तर या ग्रंथातील बाकीचे ३७ लेख निरनिराळ्या विद्याक्षेत्रांशी निगडित आहेत. ही सर्व क्षेत्रे देवीसिंगजींच्या व्यासंगाची आवडती क्षेत्रे होती.

या लेखांची विद्याक्षेत्रनिहाय वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे :

(१) वैदिक वाङ्मय - ६ (२) पौराणिक वाङ्मय - १
(३) ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास - ६ (४) इतिहासविषयक लेख - १०
(५) प्राचीन साहित्यविषयक लेख - ३ (६) ऐतिहासिक कोरीव लेख - १
(७) वीरशैव पंथाचे साहित्य - ४ (८) महानुभाव साहित्य - २
(९) लोकसाहित्य - १ (१०) भाषाविज्ञान - ३

हे सर्व विषय देवीसिंगजींच्या अभ्यासकक्षेतील होते, हे खरे असले तरी त्यांचे अभ्यासविषय एवढ्याच क्षेत्रांपुरते मर्यादित नव्हते. वरील विद्याक्षेत्रांखेरीज हिन्दी साहित्य, फारसी साहित्य, उर्दू साहित्य, व्युत्पत्तिशास्त्र, दार्दिक भाषा, भारतागमनपूर्व आर्यांचा इतिहास, भारोपीय भाषा, इ. अनेक विषय त्यांच्या अभ्यासाच्या कक्षेत येत होते. अर्थात गौरवग्रंथात सर्वच विषय यावेत, अशी अपेक्षा करणे चुकीचेच ठरेल. पण या ग्रंथात समाविष्ट झालेले सर्वच विषय नावीन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण आहेत, यात संशय नाही. तसेच मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विद्वानांची येथील उपस्थितीदेखील या गौरवग्रंथाचे वैशिष्ट्य ठरेल.

वैदिक वाङ्मयाच्या विभागात डॉ. रा.ना.दांडेकरांनी 'ऋग्वेदाचे भाष्यकार' या विषयावर माहितीपूर्ण लेख दिला आहे. या लेखात त्यांनी ऋग्वेदाच्या भाष्यकारांची पाच गटांत विभागणी केली आहे. ज्यांचे संपूर्ण भाष्य उपलब्ध आहे असे भाष्यकार, ज्यांनी ऋग्वेदाच्या काही भागांपुरतेच भाष्य लिहिले आहे असे भाष्यकार, ज्यांनी काही मंत्रांपुरतेच भाष्य लिहिले आहे, असे भाष्यकार; ज्यांचा भाष्यकार म्हणून निर्देश आढळतो, पण ज्यांचे भाष्यच उपलब्ध नाही असे भाष्यकार आणि आधुनिक पाश्चात्य

आणि पौर्वात्य भाष्यकार असे ते भाष्यकारांचे पाच गट होत. त्या सर्वांचा प्रा. डॉ. रा.ना. दांडेकर यांनी मोठ्या साक्षेपाने परिचय करून दिला आहे. डॉ. म.अ. मेहेंदळे यांच्या 'यास्काचे निरुक्त व दैवतशास्त्र' या निबंधात निरुक्तामध्ये यास्काने वैदिक दैवतांचा जो विचार केला आहे त्यावर प्रकाश टाकला आहे. वेदातील देवता कशा निश्चित केल्या जातात, त्यांची एकूण संख्या किती, त्यांचे वर्गीकरण किती प्रकारे करता येते, त्यांच्या आकारावर काही प्रकाश पडतो का यांचा विचार यास्काने केला आहे. आजच्या विचारव्यूहाच्या संदर्भात हे विवेचन गतार्थ वाटत असले तरी यास्काची विचारपद्धती त्या काळाच्या संदर्भात कशी शास्त्रीय होती हे या लेखावरून कळते. डॉ. त्रिं.ना. धर्माधिकारी यांनी मानव श्रौतसूत्रातील आसुरिगव्य या विधीची मनोरंजक माहिती दिली आहे. शत्रूच्या गाईंचे अपहरण व्हावे म्हणून त्याच्या गाईंना विज्रे, विक्षिपे, विधमे इ० नावांनी हाक मारावी असा हा विधी आहे. या विधीचे मूळ मैत्रायणी संहितेतील 'गो'नामिक प्रकरणात आहे. या प्रकरणात निरनिराळ्या लोकांनी गाईंना कोणकोणत्या नावांनी हाका माराव्यात यासंबंधीचे संकेत दिले आहेत. देवांनी 'काम्या', पितरांनी 'श्रव्या', मनुष्यांनी 'इलान्दा' अशी नावे वापरावीत. राक्षसांनी अथवा असुरांनी कोणती नावे वापरावीत त्या संकेताला आसुरिगव्य विधान म्हणतात. डॉ. चिं.ग. काशीकरांनी वेदातील श्रौत कर्मविषयक साहित्याची माहिती देऊन त्यासंबंधीच्या प्राचीन काळी झालेल्या आणि अर्वाचीन काळी होत असलेल्या संशोधनाची माहिती दिली आहे. यज्ञविधी होत नसल्यामुळे या क्षेत्रातील संशोधनही कसे थंडावत चालले आहे हेही त्यांनी त्यात स्पष्ट केले आहे. डॉ. सिंधू स. डांगे यांनी 'वैदिक यज्ञीय परंपरेतील काही कवने' या लेखात यज्ञीय परंपरेत वेळोवेळी वापरण्यात येणाऱ्या पण संहिताबद्ध नसलेल्या श्लोक, गाथा, नाराशंसी, कुंव्या इ० लोकसाहित्यसदृश कवनांचा परिचय करून दिला आहे. तर डॉ. सदाशिव अं.डांगे यांनी वैदिक यज्ञविधींतील वेदींचे प्रकार, त्यांच्या रचनांची पद्धती, त्यात झालेली परिवर्तने इ० विषयी उद्बोधक माहिती पुरविली आहे.

पुराणविषयक एकच लेख या संग्रहात आला आहे. पं. सिद्धराम बलराम महाराज यांचा 'पुराणवाङ्मय आणि श्रीमद्‌भागवत' या शीर्षकाचा हा लेख खूप महत्त्वाचा आहे. त्यांनी या लेखाच्या पूर्वार्धात प्रथम पुराण वाङ्मय, त्याची प्राचीनता, त्याचे स्वरूप, पुराणांची संख्या, त्यांचे विषय, त्यांची व्याप्ती इ० उद्बोधक माहिती सांगून नंतर श्रीमद्‌भागवत पुराणाची चर्चा केली आहे. भागवत हे सर्वात लोकप्रिय पुराण असून पूज्यपाद प्रभुपाद ब्रह्मचारी यांनी त्याची कीर्ती जगभर पसरवली आहे. हे पुराण अद्वैतमताच्या लोकांना जसे आवडते तसेच शुद्ध द्वैती, पुष्टिमार्गी, महानुभाव इ० अन्य

मतांच्या अनुयायांमध्येही लोकप्रिय आहे. त्याच्या कर्त्याबद्दल वाद आहेत. कोणी ते व्यासकृत मानतात तर कोणी त्याचे कर्तृत्व तेराव्या शतकातील बोपदेवाकडे देतात. त्याचे एकूण अध्याय ३३५ असून ते बारा स्कंदांत विभागले गेले आहेत. अनेक संवाद, रसाळ भक्तकथा, श्रीकृष्णाचे रसाळ चरित्र, अनेक मधुर स्तोत्रे, आणि पंडितांना आव्हान देणारी प्रौढ भाषा, गूढ कूटात्मक रचना इ० रचनावैशिष्ट्यांमुळे ते समाजातल्या सर्व लोकांमध्ये प्रिय आहे. याचे मुख्य आकर्षण म्हणजे समाजातल्या सर्व स्तरावरच्या सर्व लोकांना सामावून घेऊन सर्वांना सुलभ असे मोक्षोपाय त्यात सांगितले आहेत. या लेखातील सर्वच माहिती तर्कशुद्ध आणि उद्‌बोधक आहे. तो लेख मुळातूनच वाचला पाहिजे.

या ग्रंथात प्राचीन ऐतिहासिक स्थळांची माहिती देणारे सहा लेख समाविष्ट केले आहेत. डॉ. मधुकर ढवळीकरांनी कोकणातील कुडा या गावाबद्दल लिहिले आहे. ते प्राचीन काळी कोकणाच्या राजधानीचे शहर होते. डॉ. हरिहर ठोसर यांनी 'लातूर धाराशिव परिसरातील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास' या आपल्या लेखात उपरोक्त परिसरातील मुरूम, लातूर, अणदूर, मालखेड, औसा, तेर, माणकेश्वर, परांडा, धाराशिव, कुंथलगिरी, खरोसा, तुळजापूर, उदगीर, नळदुर्ग, इ० नगरांची ऐतिहासिक माहिती पुरविली आहे. प्रा. एम्.के. शाजली यांनी नांदेड जिल्ह्यातील कंधार या शहरासंबंधी लिहिले आहे. हे गाव एक हजार वर्षांपूर्वी एक पूर्ण विकसित नगर कसे होते हे सांगून संस्कृतमधील प्रसिद्ध नाटककार भवभूती याची ती कर्मभूमी होती हे सांगितले आहे. डॉ. शरद हेबाळकर यांनी 'कल्याण : ॲन इंटरनॅशनल पोर्ट ऑफ द हिस्टॉरिकल टाइम्स' या आपल्या इंग्रजी लेखात प्राचीन काळी बंदर म्हणून विख्यात असलेल्या कल्याण या नगराची माहिती दिली आहे. डॉ. अरुणचंद्र पाठक यांचा 'बारवस्थापत्य : एक आढावा' हा लेख महाराष्ट्रातील 'बारव' नावाने ओळखल्या जाणाऱ्या जलाशयांच्या स्थापत्याची माहिती देणारा एक सर्वांगसुंदर लेख आहे. तो प्रदीर्घ असून त्याने या ग्रंथाची १०४ पृष्ठे व्यापली आहेत. बारवशिल्पावरील तो एक लघुशोध-प्रबंधच म्हणावा लागेल. या शोधप्रबंधाच्या शेवटी बारवस्थापत्याच्या चौदा आकृत्या दिल्या आहेत. विहिरींचे निरनिराळे प्रकार, त्यांचे निरनिराळे आकार, त्यांच्याशी जोडलेली दैवते, त्यांच्या बांधकामातील शिल्प, त्यांच्या बांधकामातील सूक्ष्म भेद अशी कितीतरी सूक्ष्म माहिती या लेखात मिळते. डॉ. पाठकांनी या लेखावर खूपच मेहनत घेतली आहे, हे त्याच्या पानापानांतून लक्षात येते. बा.ना. मुंडी यांचा 'खरोशीकल्प आणि कल्पसमूह' हा लेख स्थलवर्णनाचा लेख नाही. 'कल्पसमूह' नावाच्या ग्रंथात अनेक सिद्धिकल्पांची माहिती दिली आहे. त्यामध्ये सुवर्ण तयार

करण्याच्या सिद्धिकल्पाचीही माहिती आहे. त्यातील खरोशीकल्प या नावाचा सिद्धिकल्प लातूरच्या परिसरातील खरोशी गावाशी संबद्ध आहे, अशी माहिती या लेखात मिळते. या गावाजवळ एक विवर असून त्यात लोहमृत्तिका आहे. तसेच या परिसरात गव्हाच्या आकाराचे पाषाणखडे आहेत. ते खरे परिस आहेत. त्यांच्या स्पर्शाने लोहमृत्तिकेचे सुवर्ण होते, अशी माहिती त्या 'कल्पसमूह' ग्रंथात मिळते. हा पाचसहाशे वर्षांपूर्वीचा ग्रंथ आहे. त्यामुळे या माहितीचा पडताळा पाहण्याची गरज असली तरी तांत्रिक अडचणींमुळे ते शक्य होत नाही, असा विचार मांडून त्यांनी हा लेख संपवला आहे.

या संग्रहातील इतिहासविषयक लेखांचा गट सर्वात मोठा म्हणजे अकरा लेखांचा आहे. डॉ. अ.रा. कुलकर्णी यांनी 'शिवाजीमहाराजांच्या राज्याच्या सीमा आणि उत्पन्न' हा लेख लिहिला आहे. डॉ. पी.व्ही. काटे यांनी शिवकालीन जीवनमूल्यांचा ऊहापोह केला आहे. डॉ. र.वि. हेरवाडकर यांनी बखरींच्या आधारे शिवकालाचे चित्र रेखाटले आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांनी शिवाजीमहाराजांनी वतनपद्धती नष्ट करून वेतनपद्धती सुरू केली. यातील त्यांच्या दूरदृष्टीबद्दल त्यांचा गौरव केला आहे. ही महाराजांची एक प्रकारची समाजक्रान्ती होती म्हणून 'शिवछत्रपतींचा समाजक्रान्तीचा एक महान प्रयत्न' अशा शब्दांत या त्यांच्या कृतीचा त्यांनी गौरव केला आहे. डॉ. स.शं. देसाई यांनी 'छत्रपती संभाजीमहाराज आणि गोव्याचे पोर्तुगीज' यांच्यातील संघर्षाचा ऐतिहासिक आढावा घेतला असून या संघर्षात संभाजीमहाराज पोर्तुगीजांच्या कारवायांना कसे पुरून उरले, हे त्यांनी चांगल्या प्रकारे सांगितले आहे. डॉ. मा.रा. कंटक यांनी इंग्रज आणि मराठे यांच्यामधील तब्बल दहा वर्षे चालत राहिलेल्या पहिल्या युद्धाची हकीकत नाना फडणीसांच्या मेणवली दप्तराच्या पुराव्यानिशी सादर केली आहे. हे युद्ध इ. सन १७७४ ते १७८३ या काळात झाले. ते तीन टप्प्यांत झाले. त्यातून दोन गोष्टींवर प्रकाश पडतो. एक म्हणजे इंग्रजांची रणनीती मराठ्यांपेक्षा उजवी होती व दुसरे म्हणजे मराठ्यांनी आपल्या चिकाटीने अखेर इंग्रजांचा डाव फिसकटून टाकला. डॉ. समुद्रगुप्त पाटील यांनी नांदेड जिल्ह्यातील बिलोलीचे सन १७२१मधील एक महजरपत्र प्रसिद्ध करून त्याचे विश्लेषण केले आहे. ऐतिहासिक कागदपत्र कसे अभ्यासायचे ह्याचा हा एक चांगला वस्तुपाठच आहे. महजरपत्र म्हणजे सरकारी सनद. ती मराठीत असली तरी तत्कालीन प्रशासन व्यवहारातील अनेक फारसी संज्ञा त्यात येतात, अनेक अधिकारपदांचे निर्देश येतात, ते समजून घ्यावे लागतात, कालगणनापद्धती, भूमापनपद्धती इ० सर्व समजून घ्यावे लागते, शिवाय तत्कालीन समाजव्यवस्थेचे, चालीरीतींचे, संकेतांचे भान असावे लागते. या दृष्टीने डॉ. पाटील

यांचा हा लेख अभ्यासण्यासारखा झाला आहे. या संग्रहातील डॉ. खोबरेकरांचा 'ऐतिहासिक दप्तरांचा अभ्यास' हा लेखही अभ्यसनीय झाला आहे. त्यात त्यांनी महाराष्ट्रात ऐतिहासिक दप्तरे कुठेकुठे उपलब्ध होतात, त्या त्या संग्रहांची वैशिष्ट्ये इ०ची तपशीलवार माहिती दिली आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी हा लेख अतिशय उपयुक्त आहे. सोलापूरचे इतिहास संशोधक श्री. आनंद कुंभार यांनी कल्याणी चालुक्य जयसिंह दुसरा याचा शके ९५३चा ताम्रपट यथामूल प्रसिद्ध करून त्याचे वाचन केले आहे. हाही लेख ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासाचा वस्तुपाठ आहे. डॉ. अजय मित्र शास्त्री यांनी इंग्रजीत लिहिलेल्या 'वाकाटक रूल इन नॉर्दर्न कर्नाटक' या लेखात वाकाटकांच्या राजवटीचा इतिहास वाचावयास मिळतो. त्यात वाकाटकांचे राज्य अगदी उत्तर कर्नाटकापर्यंत कसे पसरले होते हे दाखवणाऱ्या, बिदर येथे उपलब्ध झालेल्या एका लोहपटाचे विश्लेषण त्यांनी केले आहे. हेही विश्लेषण ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासाचा एक वस्तुपाठ या स्वरूपाचे आहे. गुलबर्ग्याचे प्रा. वि.पां. देऊळगावकर यांचा 'भूतपूर्व हैद्राबाद राज्यातील सामाजिक व राजकीय प्रबोधन' हा लेखही उद्बोधक आहे. त्यात शंभर वर्षांपूर्वी सुरू झालेल्या निजाम राजवटीतील रयतेच्या सामाजिक व राजकीय जागृतीचा इतिहास त्यांनी सांगितला आहे.

पंथीय साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात एकूण सात लेख या संग्रहात आढळतात. लिंगायत साहित्यावरील चार, महानुभाव साहित्यावरील दोन आणि भक्ति साहित्यावरील एक अशी त्यांची वर्गवारी करता येईल. लिंगायत साहित्याचे मराठी साहित्यसृष्टीला बरेच मोठे योगदान झालेले आहे. हा पंथ महाराष्ट्रात यादवांच्या काळापासून अस्तित्वात आहे. यादव राजवटीत लिंगायत पंथीयांना उच्चाधिकारपदे देण्यात आली होती. महादेव यादवाचा महाप्रधान देवराज आणि रामदेवरायाचा सेनापती चाउंडरस हे दोघे लिंगायतपंथीय होते. विसोबा खेचरांचा 'शडुस्थल' हा ग्रंथ लिंगायतपंथीय आहे. सोळाव्या शतकातील शांतलिंगस्वामी, मन्मथस्वामी यांची मराठी रचना उपलब्ध आहे. मन्मथस्वामींनी वीरशैव पंथास पुनरुज्जीवित केले. त्यांच्या अनेक ग्रंथांपैकी 'परमरहस्य' हा एक ग्रंथ आहे. 'परमरहस्य' या मूळ संस्कृत ग्रंथावरील ही मराठी टीका आहे. हा ग्रंथ बार्शीच्या पारलिंग प्रभु अय्यांनी सन १८८७ मध्ये प्रथम छापून प्रसिद्ध केला. त्यानंतर लातूरचे देशिकेंद्र महाराज यांनी सन १९३१ मध्ये तो पुन्हा छापला. त्यानंतर अहमदपूरच्या शिवाचार्य स्वामींनी १९६१, १९७४ आणि १९८१ साली या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध केल्या. त्यानंतर प्रभु पंडितराय माजलगावकर यांनी १९८३ मध्ये आणखी एक आवृत्ती प्रसिद्ध केली. या सर्वच आवृत्त्यांचे वैशिष्ट्य हे की या प्रत्येक आवृत्तीत संपादकांनी स्वत:चा मजकूर घुसवलेला

आहे. त्यामुळे अभ्यासकांचे समाधान होत नाही. म्हणून वीरशैव साहित्याचे ज्येष्ठ संशोधक डॉ. शे.दे.पसारकर यांनी या ग्रंथाची पाठशुद्ध संहिता तयार करण्याची आवश्यकता प्रस्तुत गौरवग्रंथात एका लेखात व्यक्त केली आहे. डॉ. पसारकरांनी या ग्रंथाच्या बऱ्याच हस्तलिखित प्रती जमा केल्या आहेत व स्वत:ची एक पाठचिकित्सित प्रतही सिद्ध केली आहे. ती अद्याप प्रकाशित झालेली नाही.

प्राचार्य डॉ. राम तोंडारे यांनी 'वीरशैव संत महादेव प्रभूंची कथात्मक रचना : एक आकलन' हा लेख या संग्रहासाठी दिला आहे. संत महादेव प्रभु हे अठराव्या शतकात होऊन गेले. त्यांनी शिवलीलामृतातील अनेक कथा आपल्या निरनिराळ्या रचनांमधून सांगितल्या आहेत. प्राचार्य डॉ. तोंडारे यांनी या कथांचा परिचय करून दिला आहे. त्यांनी श्रीधरस्वामींच्या शिवलीलामृतातील कथांशी या कथांची तुलना केली आहे आणि श्रीधरस्वामींच्या कथा पाल्हाळिक, पसरट ठरवून त्यांच्या तुलनेने या कथा उजव्या ठरवल्या आहेत. पण या तुलनेत स्वपक्ष आणि परपक्ष असा भेदभाव झाल्याचे जाणवते. तटस्थपणे पाहताना महादेव प्रभूंच्या रचना त्रोटक आणि नीरस वाटतात. श्रीधरस्वामींची रसनिष्पत्ती उजवी ठरते. डॉ. चंद्रकांत देऊळगावकरांनी 'वीरशैवांची मन्मथमाउली' या लेखात मन्मथस्वामींचे जीवन व कर्तृत्व यांचा परिचय करून दिला आहे. त्यांनी सुरुवातीला लिंगायत साहित्याचा सोळाव्या शतकापर्यंतचा आढावा घेतला असून त्या पार्श्वभूमीवर मन्मथलिंगस्वामींच्या कार्याचा परिचय करून दिला आहे. त्यांनी लिंगायत पंथाच्या प्रसाराचे कार्य केले. लिंगायत पंथाला ग्रंथनिर्मितीच्या द्वारे त्यांनी तत्त्वज्ञानाची बैसका प्राप्त करून दिली आणि ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणे शेवटी संजीवन समाधी घेतली. मन्मथलिंगांचे वैशिष्ट्य हे की नागेश संप्रदायाचे प्रवर्तक नागनाथ यांच्या प्रेरणेने ते लिंगायत पंथाच्या प्रचाराकडे वळले. पंथीय ग्रंथरचनेबरोबरच त्यांनी वेदान्तपर ग्रंथही लिहिले. त्यांचा 'अनुभवानंद' हा ग्रंथ तर एकनाथस्वामींच्या नावावर परवापरवापर्यंत प्रसिद्ध होत होता. त्यांनी लावणी-वाङ्मयदेखील रचले आहे. अशा तऱ्हेने सर्वांनीच त्यांच्यावर आपुलकीचा अधिकार सांगावा असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. डॉ. भि.शि. स्वामी यांनी वीरशैव परंपरेतील लक्ष्मण महाराजांनी रचलेल्या 'गंगा माहात्म्य' या ग्रंथाचा परिचय करून दिला आहे. त्यांनी केलेल्या गोदावरीच्या परिक्रमेचे हे वर्णन आहे. त्यात गोदावरीच्या तीरावरील पवित्र तीर्थे आणि महत्त्वाची गावे यांचा परिचय मिळतो.

महानुभाव पंथाशी संबंधित असे दोन लेख या संग्रहात आहेत. डॉ. मधुकर वाकोडे यांच्या लेखाचे शीर्षक 'लीळाचरित्रान्तर्गत अतिमानुष विश्वाचा म. चक्रधरांवरील प्रभाव' असे असून त्यांनी लीळाचरित्रातील चक्रधरांच्या चमत्कारांबरोबर इतरांच्याही संदर्भातील

अद्‌भुत घटनांची मीमांसा केली आहे. चक्रधरस्वामी बुद्धिवादी म्हणून त्यांचा अशा चमत्कारांवर विश्वास नसेल असे आपणांस वाटते. पण तेही विशिष्ट युगधर्मांनीच बांधील असल्यामुळे त्यांचाही अशा चमत्कारांवर दृढ विश्वास होता असे दिसून येते. डॉ. वाकोडे यांनी लीळाचरित्राच्या आधारे हे स्पष्ट केले आहे. दुसरा लेख प्रा. अरविंद कुरुंदकर यांचा असून 'राजमठविषयक वाद : काही दुरुस्ती, काही पुस्ती' असे त्याचे शीर्षक आहे. लीळाचरित्रात चक्रधर स्वामी उभय गंगातटी संचार करत असताना नृसिंहाच्या देवालयात राहात असत, असा उल्लेख आहे. या नृसिंह देवालयांना 'नृसिंहमठ' किंवा 'राजमठ' अशी संज्ञा आहे. या संदर्भात डॉ. रा.चिं. ढेरे यांचा 'राजमठाचे रहस्य' हा लेख 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'त प्रथम प्रसिद्ध झाला. त्यानंतर तो त्यांच्या 'लोकसंस्कृतीची क्षितिजे' या पुस्तकात समाविष्ट झाला. या लेखाचा प्रतिवाद डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी केला असून त्यांनी डॉ. ढेऱ्यांच्या काही विधानांना आक्षेप घेतले आहेत. प्रा. कुरुंदकर यांनी या वादात डॉ. देशपांडे यांच्या बाजूने आणखी काही दुरुस्त्या-पुस्त्या जोडल्या आहेत. डॉ. ढेरे यांनी सर्वच नृसिंहमंदिरांना राजमठ म्हणतात असे सरसकट विधान केले आहे. ते त्यांचे विधान अतिव्याप्त असून ते ऋद्धिपूर येथील नृसिंहमंदिराच्या काही भागापुरतेच मर्यादित आहे, असे डॉ. देशपांडे यांना वाटते. डॉ. ढेऱ्यांनी आपली माहिती ज्या डिंभ आणि भीष्माचार्य यांच्यापासून घेतली ती माहितीच संशयास्पद असल्याचे कुरुंदकरांनी सांगितले आहे. राजमठास नृसिंहमंदिर म्हणणे ही उत्तरकालीन प्रवृत्ती ठरते, कारण स्थानपोथीत सर्वच नृसिंहमंदिरांना राजमठ अशी संज्ञा नव्हती. पण स्थानपोथीच्या अनेक आवृत्त्या असून त्यात एकमेळ नाही. त्यामुळे यासंबंधी संशोधकांच्या संशोधनात घोटाळे निर्माण झाले आहेत, हा या लेखाचा अभिप्राय आहे. 'भारतात विविध साहित्यात आलेले भक्तीचे स्वरूप' या लेखात वैदिक, पौराणिक, बौद्ध, जैन, शैव, वैष्णव या सर्व प्रकारच्या साहित्यात भक्तीचा प्रचार आढळतो, असे डॉ. ह.धी. सांकलिया म्हणतात. बहुतेक सर्वच भक्तिपंथांत देवतार्चन, नामभक्ती आणि ध्यानधारणा यांवर भर आढळतो, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

साहित्यविषयक दोन लेख या संग्रहात आहेत. डॉ. यू.म. पठाण यांनी 'नांदेड परिसरातील साहित्यसोनियाच्या खाणी' या लेखात नांदेड परिसरातील साहित्यनिर्मितीचा चांगला आढावा घेतला आहे. या परिसरात अनेक कोरीव लेख आहेत आणि वीरशैव, जैन, नागेशसंप्रदाय, महानुभावपंथ, शीखधर्म, सूफीपंथ इ० अनेक धर्म आणि पंथांचे साहित्य निर्माण झाले आहे. मराठी पंडितकवींतील वामन पंडितांचे शेष घराणे इथलेच. श्री. वि.अं. तथा तात्यासाहेब कानोले यांनी अनेक

कागदपत्रांचा संग्रह जतन करून ठेवला आहे. इनिहासातील नेताजी पालकरांच्या घराण्याची कागदपत्रे त्यांच्या गोदातीर इतिहास संशोधक मंडळात आहेत. सूफी संतांचे दक्खिनीतील साहित्यही त्यांनी संग्रह करून ठेवले आहे. डॉ. पठाणांना चोंभाकविकृत उदाहरणाची प्रत याच परिसरात मिळाली, ती त्यांनी संपादित करून प्रसिद्ध केली. या परिसरातील गोपाळबावडीचा महानुभाव मठ, लिंबगाव येथील महानुभाव मठ, उमरीचा मठ, माहूरचा महानुभाव मठ, शेवाळे येथील राम शेवाळकरांचा वैयक्तिक संग्रह, कळमनुरी, अहमदपूर, चाकूर इ० ठिकाणी असलेले हस्तलिखितांचे संग्रह यांची माहिती डॉ. पठाणांनी दिली आहे. या माहितीबरोबरच येथील आधुनिक काळातील साहित्यिकांचीही माहिती मिळेल अशी अपेक्षा होती; ती त्यांनी या लेखात दिलेली नाही. पण त्यांनी दिलेली माहिती नवीन संशोधकांना उपयोगी पडेल अशीच आहे. डॉ. एस्.व्ही. सोहोनी यांनी कालिदासाच्या मदतीने वाकाटक राजा प्रवरसेनाने रचलेल्या 'सेतुबंध' या महाराष्ट्री प्राकृतात रचलेल्या महाकाव्याची जुजबी माहिती दिली आहे. त्यांचा लेख इंग्रजीत आहे.

लोकसाहित्याच्या संदर्भातील डॉ. व.दा. कुलकर्णी यांचा 'मराठी लोकधारा का हिन्दी स्रोत' हा या संग्रहातील एकमेव हिंदी लेख आहे. या लेखाचे दोन भाग होतात. प्रथम भागात त्यांनी दक्खिनी हिंदी या भाषेचा आणि या भाषेतील साहित्यनिर्मितीचा परिचय करून दिला आहे. ही हिंदी हा उत्तरेकडील हिंदी आणि महाराष्ट्रातील मराठी या दोन भाषाविश्वांना सांधणारा दुवा असून उत्तरेकडील लोककथांच्या प्रवाहाचा मराठी लोककथांवर प्रभाव पडण्यास ती कशी कारणीभूत झाली, हे 'डंगवै पुराण' या मराठीतील लोककथेच्या उदाहरणाने स्पष्ट केले आहे. डंगवै पुराणाची माहिती हा या लेखाचा उत्तरार्ध आहे. हा लेख अभ्यासपूर्ण असला तरी या दोन भागांची सांधेजोड नीट झाली आहे, असे वाटत नाही. वास्तविक पाहता हे दोन्ही भाग म्हणजे दोन स्वतंत्र लेखच आहेत.

भाषाविज्ञानपर लेखांत डॉ. माणिकराव धनपलवार, डॉ. अ.म. घाटगे आणि डॉ. जी.एम्. मोहोळकर या तिघांचे लेख आहेत. त्यामध्ये डॉ. माणिकराव धनपलवार यांनी लिहिलेला 'तेलुग वृत्तांचा मराठीतील आविष्कार' हा खरा छन्दःशास्त्रीय लेख आहे. त्यात तेलुगू छन्दःशास्त्रातील काही वैशिष्ट्यपूर्ण प्रकारांची माहिती दिली आहे. आद्याक्षरप्रास, द्वितीयाक्षरप्रास, अन्त्ययमकरहित रचना, यतिमैत्री (आद्याक्षर आणि यतीनंतरचे अक्षर एकच ठेवणे), चरणान्तीचा यती न पाळणे, भिन्न गणप्रकार, द्विपद इ० भिन्न गीतरचना अशी वैशिष्ट्ये मराठीला अज्ञात आहेत. पण तंजावर येथील काही साहित्यरचनांवर या तेलुगू वैशिष्ट्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. तेथील काही

कवींनी आपल्या मराठी रचनांमध्ये तेलुगूचे अनुकरण केलेले दिसते, हे डॉ. माणिकराव धनपलवारांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. डॉ. अ.म. घाटगे यांच्या 'लिंग्विस्टिक्स अँड प्रासोडी' या इंग्रजी लेखात छंद:शास्त्राचा भाषाविज्ञानाच्या अंगाने विचार मांडला आहे. भाषाविज्ञानाच्या अभ्यासकक्षेत भाषेच्या रूढ वर्णनाच्या जोडीला कितीतरी नवे नवे विषय आज येत आहेत. भाषाविज्ञानाने या सर्व विषयांच्या अभ्यासाचे पद्धतिशास्त्र विकसित केले आहे. डॉ.अ.म. घाटगे यांनी या लेखात भाषाशास्त्राच्या पद्धतीने छन्द:शास्त्राच्या अभ्यासाची दिशा दाखविली आहे. छंद:शास्त्र ही भाषेच्या एका स्वतंत्र अभिव्यक्ति–प्रकाराचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा असल्याने ती भाषाशास्त्रीय अभ्यासाचा विषय होऊ शकते. भाषेच्या पराखंडकीय बाबींचा अभ्यास करणारी एक शाखा म्हणून तिची ओळख सांगता येईल. भाषेशी निगडित अशा स्वनविज्ञान, स्वनिमविज्ञान या अभ्यासविषयांपेक्षा तिचे क्षेत्र व्यापक आहे. छंदोबद्ध भाषा ही व्यावहारिक भाषेपेक्षा वेगळी असते. तिचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य म्हणजे तिची तालबद्धता आणि लयबद्धता. छंदोबद्ध भाषेमुळे भाषेच्या मुक्त वापरावर बंधने येतात. याउलट भाषेच्या स्वरूपामुळे छंदाच्या निवडीवर बंधने येतात. छंदोबद्ध भाषेचे दृश्यरूप आणि तिचे श्राव्यरूप यांचे वेगवेगळे संकेत निर्माण झालेले असतात. भाषाभाषांच्या स्वरूपभिन्नतेमुळे त्यांच्या छंदोबद्ध रूपांचे संकेतही सारखे नसतात. छंदोबद्ध भाषांचे अनेक प्रकार त्यामुळे अस्तित्वात येतात. लोट्झ् या भाषावैज्ञानिकाने पुढील प्रकारांची नोंद केली आहे : (१) शुद्ध उच्चारणावयवप्रधान छंद (२) उच्चारणावयव + छंद:शास्त्राचे इतर संकेत यांवर आधारित छंद (३) उच्चारणावयवांच्या कालावधीवर आधारलेले छंद (४) उच्चारणावयवांच्या संख्येवर आधारलेले छंद (५) उच्चारणावयवांची संख्या + सर्व स्वर दीर्घ उच्चारण्याचा संकेत यावर आधारलेले छंद (६) उच्चारणावयवांची संख्या कायम ठेवून उच्चारणात भरपूर स्वातंत्र्य घेणारे छंद (७) ओळीतील यतींच्या स्थानावर अवलंबून असणारे छंद (८) आघातप्रधान छंद (९) सुरावलीप्रधान छंद (१०) उच्चारणावयवांच्या सीमासंधींवर आधारलेले छंद इ० छंद-प्रकारांतील व्यवच्छेदकता आणि भाषेशी सुसंगती या तत्त्वांवर भाषेतील छंद:शास्त्र निश्चित होते. कोणत्याही छंदातील ध्वनींच्या स्थिर गुणधर्मांपेक्षा त्यांच्या श्राव्य परिणामांवर भर हे छंदोबद्ध भाषेचे वैशिष्ट्य होय. डॉ. घाटग्यांची ही सर्व निरीक्षणे वाचताच छंद:-शास्त्राविषयी एक वेगळीच अन्तर्दृष्टी आपल्याला प्राप्त होते. दासोपंतांच्या 'गीतार्णवा'च्या अभ्यासाच्या आधारे डॉ.जी. एम्. मोहोळकरांनी 'मराठीतील संस्कृत तत्समीकरणाची प्रवृत्ती' दासोपंत-एकनाथांच्या काळात वाढल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. त्याचबरोबर तत्समीकरणामुळे मराठी भाषा समृद्ध कशी झाली, हेही त्यांनी

स्पष्ट केले आहे.

ग्रंथाच्या अखेरीस सु.ग. जोशी यांनी तयार केलेली डॉ. देवीसिंग चौहान यांच्या साहित्याची सूची आणि कु. जयश्री पाटील यांनी तयार केलेली निर्देश-सूची अशा दोन सूची जोडल्या आहेत. त्यांमध्ये निर्देश-सूचीवर अधिक मेहनत घेणे आवश्यक होते. ग्रंथाच्या आरंभीच्या भागात डॉ. देवीसिंगजींच्या आयुष्यातील महत्त्वाच्या व्यक्ती, प्रसंग, कर्तृत्व यांची स्मृतिचिन्हे असलेली १७ छायाचित्रे चांगल्या जाड आर्टपेपरवर छापलेली आहेत. ग्रंथाची निर्मितिमूल्ये चांगली आहेत. पण मुद्रणात अतोनात चुका झालेल्या आहेत. संपादकांनी मुद्रितशोधनाकडे अधिक लक्ष पुरवणे आवश्यक होते. त्या चुकांकडे दुर्लक्ष केले तर हा गौरवग्रंथ म्हणजे विविध ज्ञानविषयांचा खजिनाच झाला आहे.

■

ए-५, प्रज्ञानगड, नवश्या मारुती गल्ली, वीटभट्टी, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष २४३३५१३६

लेखकांसाठी सूचना : ३

पुढील विषयासंबंधीचे लेखन 'भाषा आणि जीवन'ला हवे आहे :
मराठी, अन्य देशीविदेशी भाषा, भाषांची तुलना (शब्दघटना, रचनावैशिष्ट्ये, इ०) भाषाविज्ञान, भाषांतर, शैली (व्यवहारातील व साहित्यातील), भाषिक व भाषाशिक्षणविषयक संशोधन, परिभाषा, भाषिक वर्तन, भाषाविषयक शैक्षणिक, शासकीय धोरणे, पुस्तक-परीक्षणे, पानपूरके, पत्रिकेतील प्रकाशित मजकुराबद्दल प्रतिक्रिया, आपली भाषिक प्रचीती, मराठीच्या प्रादेशिक, व्यवसायविशिष्ट, वयोगटविशिष्ट, लिंगविशिष्ट बोलींची वैशिष्ट्ये, मराठी भाषेवरील इतर भाषांचा परिणाम, कवितांचे शैलीवैज्ञानिक विश्लेषण, कवितेची भाषा, साहित्याची भाषा, परिभाषाकोशांचा परिचय/परीक्षणे.

तेलुगूशी थोडा सुखसंवाद

माणिक धनपलवार

प्रत्येक भाषेची प्रकृती व ठेवण भिन्न असते. यामुळे अन्य भाषेतील विविध शब्दरूपांशी, वाक्प्रयोगांशी आपण एकदम समरस होऊ शकत नाही. पण त्या भाषेच्या सहवासात काही काळ गेल्यावर तिच्या गुणवृत्तीशी थोडी जवळीक साधता येते. तेलुगुभाषेच्या सान्निध्यात बराच काळ व्यतीत झाल्यामुळे तिच्यातील शब्दप्रयोगांचे व अन्य घटकांचे मराठीपेक्षा वेगळेपण लक्षात येते, व त्यांचा मराठीशी तुलना करण्याचा मोह आपोआप होतो. ही तुलना करताना तशी कुठलीही शास्त्रीय दृष्टी मला अभिप्रेत नाही. थोड्या मुक्तमोकळ्या पातळीवर हा शब्दव्यवहार मी मांडीत आहे.

नातेवाचक शब्द

भाऊ-बहीण : तेलुगूत भाऊ वा बहीण या शब्दांसाठी एकच एक शब्द नाही. वडील भाऊ, धाकटा भाऊ, वडील बहीण धाकटी बहीण हे दोन्हीही सांगावे लागते. 'तुला किती भाऊ आहेत ?' या वाक्याचे तेलुगूत 'तुला किती वडील भाऊ व किती लहान भाऊ आहेत ?' असे भाषांतर करावे लागते. तसेच 'तुला किती बहिणी आहेत ?' यासाठी 'तुला किती मोठ्या बहिणी व लहान बहिणी आहेत' असे विचारावे लागते. इंग्रजीतील 'ब्रदर' याचे मोठा भाऊ व धाकटा भाऊ व 'सिस्टर' याचे 'मोठी बहीण व लहान बहीण' असे अर्थ द्यावे लागतात. हा 'भाऊ' व ही 'बहीण' असे एकशब्दी विधान तेलुगूत करताच येत नाही.

काका-काकू : या नातेसंबंधातही 'काका' किंवा 'काकू' हे अनुक्रमे वडिलांपेक्षा मोठे किंवा लहान, तसेच आईपेक्षा मोठी की लहान हे सांगावे लागते. 'पेद्दनायना' (वडिलांपेक्षा मोठे असलेले काका) व 'चिन्ननायना' (वडिलांपेक्षा लहान असलेले काका) असे काकासंबंधाने सांगावे लागते तर मोठी काकू (पेद्दम्मा), व लहान काकू (चिन्नम्मा) असे म्हणावे लागते. 'काकू' हा नातेवाचक शब्द मावशीसाठीही वापरला जातो. मराठीप्रमाणे 'मावशी'साठी वेगळा शब्द नाही. काकूसाठी एकच एक शब्द नाही.

भाचा-भाची : बहिणीचा मुलगा तो भाचा व बहिणीची मुलगी ती भाची. तेलुगूत 'भाचा' यासाठी मॅनं/मेन अल्लुडु म्हणजे 'जावई' म्हणून म्हटले जाते. जावई न होताही जावई म्हणून संबोधले जाते. मामाच्या मुलीला करून घेण्याच्या प्रथेचे प्रतिबिंब या शब्दप्रयोगातून आपणांस प्रतीत होते. तसेच भाचीस मॅन/मेनकोडलु म्हणजे 'सून' म्हटले जाते. सून म्हणून घरी येवो न येवो ती 'सून' या नात्याला पात्र होते. मामाची मुलगी ही हक्काची पत्नी होय असे मुलगा समजतो, व मामाही आपली मुलगी भाच्यास द्यावयास उत्सुक असतो. हे नाते एवढे बळकट व चिवट आहे की एखाद्या वेळेस मुलाने मामाच्या मुलीस करून घेण्यास नकार दिल्यास किंवा मुलास ती पसंत असून मामाने त्यास नकार दिल्यास कौटुंबिक संघर्षही उद्‌भवतात. (आता थोडा काळ बदलला आहे.) वास्तविक अल्लुडु म्हणजे 'जावई'; पण त्याला मॅन/मेन हा जो शब्द जोडला जातो तो रक्ताच्या नात्याशी संबंधित आहे. मॅन/मेन अल्लुडु म्हणजे रक्ताने संबंधित जावई व मॅन/मेन कोडलु म्हणजे रक्ताने संबंधित सून असे मानले जाते. यातून दाक्षिणात्यांच्या कौटुंबिक एकसंधत्वाची कल्पना येते. आर्यांनी मातुलकन्या विवाहास मान्यता दिली नाही. द्राविड भाषकांत ती पूर्वापार चालत आलेली आहे व ही प्रथा पुढे आर्यांनी स्वीकारली. ''मामयाची कन्या नोवरी / ऐसी रीती असे दक्षिणेसी'' असे सोळाव्या शतकातील एका काव्यात आले आहे.

मामा-बावा : पत्नीने पतीचे नाव घेण्याची हिंदूंत प्रथा नाही. (आताचा बदल सोडून द्या.) 'अहो, ऐकलं काय ?' असे वाक्य पतीला उद्देशून म्हटलेले ऐकू येते. तेलुगु भाषक स्त्रीही पतीचे नाव घेत नाही, पण त्याला 'मामा' म्हणून संबोधते. मामाशी विवाह करण्याचा रिवाज तेलुगु व कन्नड भाषकांत आहे. मराठी भाषक ते निषिद्ध मानतात. मामाशी विवाह करण्याच्या प्रथेला अनुसरून 'मामा' हा शब्दप्रयोग पतीसाठी होतो. तेलंगण हा विभाग सोडून उर्वरित आंध्रप्रदेशात तेलुगुभाषक स्त्रिया पतीला 'बावा' म्हणजे भाऊजी म्हणून संबोधतात. आत्याचा मुलगा हा भाऊजी. मातुलकन्या-विवाहाच्या प्रथेनुसार भाऊजी हा तिचा पुढे पती होतो. यामुळे पतीला भाऊजी म्हणून म्हटले जाते. नातेवाचक शब्दांना भाषेत व समाजव्यवहारात विशेष स्थान असते. त्यातून एखाद्या समाजाची कौटुंबिक घडण व आप्तेष्टांशी होणारे सोयरसंबंध यावर प्रकाश पडतो. समाजशास्त्रदृष्ट्या असा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. नातेवाचक शब्दांच्या बाबतीत द्रविड भाषाकुलात बरीच एकवाक्यता आहे.

तत्सम शब्द :

तेलुगु ही संस्कृतशब्दबहुल भाषा आहे. मराठीपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात तेलुगूत तत्सम शब्दांचा आढळ होतो. पण सर्वच ठिकाणी त्यांचा मूळ अर्थाने वापर

होतो असे नाही. बऱ्याच ठिकाणी त्यांच्या अर्थामध्ये परिवर्तन झालेले दिसेल. सर्व भारतीय भाषांतून असेच दृश्य दिसून येते. मराठीतही असेच आहे. येथे आपण तेलुगुतील तत्सम शब्दांच्या भिन्न अर्थाचा विचार करू.

व्यवसाय व उद्योग :

व्यवसाय व उद्योग हे दोन्ही तत्सम शब्द होत. मराठीत मुळानुसार त्यांचे अर्थ होतात; पण तेलुगूत तसे होत नाही. तेलुगूत 'व्यवसाय' म्हणजे शेती व 'उद्योग' म्हणजे नोकरी. 'माझे वडील व्यवसाय करतात' म्हणजे शेती करतात. त्याला 'उद्योग' नाही, म्हणजे कुठलीही नोकरी नाही. दोन्ही शब्दांचा अर्थसंकोच झाला आहे. आपण 'बेकारीची समस्या' म्हणतो तर तेलुगूत त्यास 'निरुद्योगीची समस्या' असे म्हटले जाते. निरुद्योगी म्हणजे कुठलेही काम न करणारा आळशी असा त्याचा अर्थ नाही. कन्नडमध्येही या शब्दांचे तेलुगुप्रमाणेच अर्थ होतात.

संताप :

हा शब्द मराठीत 'राग' या अर्थाने येतो; पण तेलुगूत 'दु:ख' या अर्थाचा वाचक आहे. एखाद्याच्या मृत्यूमुळे घ्यावयाच्या सभेस ते 'शोकसभा' म्हणत नाहीत, तर 'संतापसभा' म्हणतात. संस्कृतमध्ये 'शोकसंतप्त' म्हणजे दु:खाने तापणे. तेलुगूत 'राग' यासाठी 'कोपम्' हा शब्द नेहमी वापरला जातो. मराठीतही हा शब्द रूढ आहे.

अवसर :

अवसर म्हणजे वेळ असणे. कामामुळे एखाद्याला बोलण्याचा 'अवसर' मिळत नाही, असे आपण म्हणतो. पण तेलुगूत अवसर म्हणजे आवश्यकता, गरज हा अर्थ. मला या पुस्तकाचा आता अवसर नाही म्हणजे आवश्यकता नाही हा आशय.

अवकाश :

वेळ मिळणे, असणे. पण तेलुगूत 'अवकाश' म्हणजे शक्यता, संभवनीयता. 'आज रात्री पाऊस येण्याचा अवकाश आहे' म्हणजे शक्यता आहे.

श्रद्धा :

काही शब्दांच्या बाबतीत अर्थात बदल होत नसला तरी त्याला थोडी भिन्न छटा प्राप्त होते. मराठीत 'श्रद्धा' म्हणजे 'गाढ विश्वास' असाच केवळ अर्थ नाही तर त्याला पावित्र्याचा स्पर्श आहे. देवावर, गुरूवर श्रद्धा असते. एखाद्या उच्च ध्येयावर श्रद्धा वा निष्ठा असते. या शब्दार्थास मराठीत थोडी आध्यात्मिक छटा प्राप्त झाली आहे. तेलुगूत मात्र मनापासून, अंत:करणापासून, प्रेमाने असे अर्थ आहेत. 'तुम्ही श्रद्धेने' पाठवून दिलेल्या वस्तू मिळाल्या, 'तो तुझ्याशी श्रद्धेने बोलला की वरवर ?' यातून या शब्दास निराळी छटा प्राप्त झाल्याचे स्पष्ट दिसेल.

अनुक्रमणिका

भद्र :

भद्र म्हणजे पवित्र. यालाही मराठीत पावित्र्याचा स्पर्श आहे. पण यास तेलुगूत 'चांगला' असे व्यावहारिक पातळीवरचा अर्थही प्राप्त झालेला दिसेल. 'पुस्तकाला भद्रतेने वेष्टन लाव.' (प्रवासाला जाताना) 'पैसे भद्रतेने जवळ ठेव' म्हणजे 'सांभाळून ठेव, सुरक्षित ठेव.', यासाठी 'पैसेलु भद्रंगा पेटको' असे तेलुगूत म्हटले जाते. 'परिस्थिती भद्रंगा उन्नदि' म्हणजे परिस्थिती शांत आहे, असा अर्थ.

संप्रदाय :

याचा धार्मिक पंथ या अर्थी मराठीप्रमाणे तेलुगूतही वापर होतो. पण तेलुगूत तो परंपरा या अर्थाने विशेषतया योजतात. प्रत्येकाला आपल्या परंपरेने म्हणजे वहिवाटीनुसार वागण्याचा हक्क आहे, असे म्हटले जाते. तंजावरच्या मराठी साहित्यातही तेलुगु अर्थाने हा शब्द येतो. तेथील एका अप्रकाशित हस्तलिखितात– ''भूभार उतरवणेसही वैकुंठपति अवतार घेणे असा संप्रदाय आहे'' असे वाक्य आले आहे.

प्रसंग :

तेलुगूत 'प्रसंग' याचा अर्थ 'भाषण'. मुख्यमंत्री 'एका प्रसंगात... असे बोलले', असा या शब्दाचा सर्रास वापर होतो.

समावेश :

समावेश म्हणजे तेलुगूत 'सभा' (मीटिंग) हा अर्थ. अनेक लोकांच्या समावेशातून सभा सिद्ध होत असते, म्हणून सभेस समावेश म्हणत असावेत. 'सभा' हा शब्दही तेलुगूत मराठी अर्थाने रूढ आहे.

लांछन :

या शब्दास मराठीत (कीर्तीला, चारित्र्याला) डाग, काळिमा, कलंक असा अर्थ प्राप्त झाला असला तरी संस्कृतमध्ये त्याचा तसा अर्थ नाही. बहुमानदर्शक चिन्ह किंवा वस्तू असा त्याचा मूळ अर्थ आहे. तेलुगूत याच अर्थाचा तो वाचक आहे. ''त्या विद्वानास सर्व लांछनांसहित गौरविण्यात आले'' असे तेलुगूत म्हटले जाते.

प्रमाद :

प्रमाद म्हणजे चूक. संस्कृतमध्येही त्याचा हाच अर्थ आहे. तेलुगूत तो 'अपघात' या अर्थी येतो. मानवी चुकांमुळेच प्राय: प्रमाद घडतात.

अभ्यंतर :

तेलुगूत याचा 'आक्षेप' असा अर्थ होतो. हिंदीत 'आपत्ति' हा शब्द यासाठी येतो. असे करण्यात मला कुठलेही अभ्यंतरम् (आक्षेपार्ह) वाटत नाही.

ब्रह्मांड :

तेलुगूत 'ब्रह्मांड' हा एक सर्वोपयोगी असा जबरदस्त शब्द आहे. तेलुगु भाषकांच्या बोलण्यात हमखास येणारा हा शब्द. ज्याने हा शब्द त्यांच्या तोंडून ऐकला नाही, त्याने तेलुगु भाषाच ऐकिली नाही, असे म्हणावे लागेल. व्यवहारात आपण एखादी गोष्ट खूपच चांगली, अत्यंत उत्कृष्ट, अजोड किंवा अद्वितीय म्हणून संबोधतो, त्यांस तेलुगु भाषक 'ब्रह्मांड' या एका शब्दात आणतो. 'जेवण कसे होते ?' 'ब्रह्मांडंगा' (ब्रह्मांडासारखे), 'कादंबरी कशी आहे ?' 'ब्रह्मांडंगा', 'घर कसे आहे ?' 'ब्रह्मांडंगा'. 'ब्रह्मांडंगा' हा शब्द तेलुगु भाषेत व तेलुगु मानसिकतेत एवढा खोलवर रुजलेला आहे की त्याशिवाय त्यांना उत्कृष्टतेला व्यक्तच करता येणार नाही. मराठीत हा शब्द प्राय: तत्त्वचर्चेत येतो. किंवा एखाद्या दु:खाच्या वेळी आम्हांला ब्रह्मांड आठवते.

'शब्दानाम् गतिसूक्ष्म:' असे म्हटले जाते. शब्दांचे अर्थांतर का व कसे होते, हा संशोधनाचा विषय आहे. अर्थबदल हा अनेक गोष्टींवर अवलंबून असतो. एखाद्या शब्दाचा चुकीच्या अर्थाने अजाणता उपयोग होतो, मग तोच अर्थ रूढ होतो. लेखक/कवी अर्थ समजून न घेता एखाद्या शब्दाचा चुकीने वापर करतात. मराठीत 'परोक्ष' व 'अपरोक्ष' यांच्या अर्थात घोटाळा होण्याचे कारण 'अ'च्या नकारार्थात आहे. अमाप, अजाण, अमर्याद या शब्दप्रयोगांतील 'अ' नकारार्थदर्शक असल्यामुळे तोच नियम त्यांनी अज्ञानाने 'अपरोक्ष'ला लावला. म्हणजे जे प्रत्यक्ष आहे ते अप्रत्यक्ष झाले. शेती हाच प्रधान व्यवसाय आंध्रात असल्यामुळे 'व्यवसाय' याचा अर्थ 'शेती'पुरताच मर्यादित झाला. एका ठरावीक कक्षेतच अर्थपरिवर्तनाचा विचार करता येतो. अर्थांतराचा असा विचार शेजारील तेलुगु व कन्नड भाषांच्या संदर्भात लाभदायक ठरावा. तेलुगूत 'उचित' म्हणजे फुकट, विनामूल्य. वर्तमान मराठीत उचित म्हणजे 'योग्य' असा अर्थ होत असला तरी तेराव्या शतकातील महानुभाव ग्रंथातून तो 'विनामूल्य' या अर्थी वापरात आला आहे. 'मी उचिताचा पाईक होईन' असे ते वाक्य आहे. याच 'उचित' याचा 'बक्षीस' असा अर्थ होतो, व तो विनामूल्य या अर्थाशी जुळता आहे.

तेलुगूत 'खचित' हा शब्द मराठीप्रमाणे 'निश्चित' या अर्थी येतो. या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृतपासून लावता येत नाही. तेलुगु व संस्कृतचे अभ्यासकही असेच मानतात. मग खचित हा शब्द कोठून आला हा प्रश्न आहे. संस्कृतमध्ये 'खचित' म्हणजे सोन्यात जडवलेले, बसवलेले रत्नखचित अलंकार असाही शब्दप्रयोग आपण करतो. हा अर्थही मराठीप्रमाणे तेलुगूतही रूढ आहे. पण 'खचित' याला 'निश्चित' असा अर्थ कसा प्राप्त झाला हे मात्र सांगता येत नाही. ■

३-४-१०१३/१९, बरकतपुरा, हैदराबाद ५०० ०२७.

चमचा आणि चहा

मो. वि. भाटवडेकर

मराठीत 'च' चा उच्चार दोन प्रकारे होतो. चमच्यातल्या 'च' सारखा किंवा चहातल्या 'च' सारखा. हे सर्वांनाच ठाऊक आहे. पण 'च' चा उच्चार 'च' केव्हा करायचा ? या संदर्भात काही नियम आहेत का ? असा प्रश्न ललिताने निर्माण केला. (ती नुकतीच संगणक-क्षेत्रात पदवी घेऊन कामाला लागली होती आणि असे काही नियम असतील तर ते तिच्या कामात उपयोगी पडणार होते).

माझी पहिली प्रतिक्रिया असे काही नियम नाहीत व काढताही येणार नाहीत अशी होती. पण थोड्या विचारानंतर मी तिला म्हटले, ''काम करण्याची तयारी असेल तर काही हाती लागेल असे वाटते.'' तिने होकार दिला, आणि सांगितल्याप्रमाणे 'च' (बाराखडी)चे प्रयोग असणारे सुमारे २००० शब्द गोळा केले. गोळा केलेल्या शब्दांची आम्ही तीन गटात विभागणी केली.

(१) 'च' (बाराखडी) ने सुरुवात होणारे शब्द एका गटात घातले.

(२) 'च' (बाराखडी) हे अंत्याक्षर असणारे शब्द दुसऱ्या गटात घातले.

(३) आणि उरलेले शब्द तिसऱ्या गटात घातले.

अशा रीतीने विभागणी केल्यानंतर 'च'चा उच्चार 'च' कधी होतो हे पाहण्यासाठी सर्व शब्दांची छाननी केली. हाती लागलेले निष्कर्ष खाली दिले आहेत.

(अ) चि/ची याचा उच्चार निरपवाद चि । ची असा होतो.

उदा० चिरायु, सचिव, मिरची.

(आ) शब्दाचे आद्याक्षर अनुस्वारित 'चं' असेल तर त्याचा उच्चार 'चं' होतो

उदा० चंगळ, चंचल, चंट, चंडिका, चंपक, चंपाषष्ठी, चंबुगबाळे.

(इ) शब्दाचे आद्याक्षर 'चें' असेल तर त्याचा उच्चार 'चें' होतो.

उदा० चेंगराचेंगरी, चेंडू, चेंदामेंदा.

(ई) 'च' च्या आधीचे अक्षर अनुस्वारित असेल तर 'च' चा उच्चार 'च' होतो.

उदा० कांचन, चंचल, पंचतारांकित, पंचाईत, मंच, वंचना, टंचाई (अपवाद)

अनुक्रमणिका

(उ) ‘च’ च्या नंतरचे दुसरे किंवा तिसरे अक्षर जोडाक्षर असेल तर ‘च’ चा उच्चार ‘च’ होतो.

उदा० चक्षू, चर्चा, चतुर्भुज, चमत्कार.

(ऊ) शब्दात ‘च’ च्या पुढे ‘न’ किंवा ‘ना’ ही अक्षरे आली तर ‘च’ चा उच्चार ‘च’ होतो.

उदा० अर्चना, आलोचना, पचन, बचनाग, रचना,
लोचन, वचन, वाचन, विमोचन, सूचना.

वरील पाहणी आणि हाती लागलेले निष्कर्ष प्राथमिक स्वरूपाचे आहेत. त्यापासून नियम बनवण्यासाठी अधिक अभ्यासाची गरज़ आहे. ■

३, चैत्राली अपार्टमेंट्स, प्रभात मार्ग, गल्ली क्र. ७, पुणे ४११००४

प्रतिसाद

१. **स्नेहल तावरे**

श्री. केशव जाधव यांचे (दै. सकाळवरून उद्‌धृत केलेले) पत्र वाचले. ते उत्कृष्टपणे लिहिले आहे. संस्कृतपासून मराठीला दूर करण्याच्या प्रयत्नांचे हे फलित आहे. एम्.ए.च्या विद्यार्थ्यांनाही हल्ली बाराखडी शिकवावी लागते. उच्चार येत नाहीत. माझ्याच एका विद्यार्थ्याने एका शब्दाचा अर्थ विचारला होता, तो शब्द होता ‘प्रशुद्ध’. त्याला ‘प्रक्षुब्ध’ म्हणायचे होते ! ■

स्नेहवर्धन प्रकाशन, ८३३ सदाशिव पेठ, पुणे ३०

२. **माधवी कोल्हटकर**

‘भाषा आणि जीवन’च्या उन्हाळा २००६च्या अंकात ‘भाषेतील लिंगभेद’ या संपादकीयात म्हटले आहे, ‘‘आता ‘चेअरमन’ ऐवजी ‘चेअरपर्सन’ असा शब्द वापरला जातो.’’ एकोणिसशे सत्तर-पंच्याहत्तरच्या सुमारास या शब्दाविषयी चर्चा सुरू होऊन हळूहळू आता चेअरपर्सन हा शब्द चांगला रुळलासुद्धा. हळूहळू याच चालीवर ‘जर्मन’ला ‘जर्पर्सन’, ‘वुमन’ला ‘वुपर्सन’ आणि ‘ह्युमन’ला ‘ह्युपर्सन’ रूढ झाले तर आश्चर्य वाटायला नको ! ■

८८५/३, भांडारकर मार्ग, ६वी गल्ली, पुणे ४११ ००४.

प्रतिपद् कस्मात्

माधवी कोल्हटकर

भारतीय चांद्र पंचांगाने महिन्याची विभागणी दोन पक्षांत किंवा पंधरवड्यांत केलेली आहे. पंधरवड्याच्या पहिल्या दिवसाला किंवा तिथीला संस्कृतमध्ये आणि मराठीमध्ये प्रतिपद् किंवा प्रतिपदा म्हणतात. त्यापुढच्या दिवसांना किंवा तिथ्यांना मात्र द्वितीया, तृतीया, चतुर्थी... अशी चतुर्दशीपर्यंत क्रमवाचक संख्याविशेषणांची नावे दिलेली आहेत. पंधराव्या दिवसाला अमावास्या किंवा पौर्णिमा अशी नावे आहेत. आता इथे हे लक्षात येत नाही की इतर तिथ्यांप्रमाणेच पहिल्या दिवसालाही प्रथमा असे नाव का नाही ? तसेच जे नाव आहे म्हणजे प्रतिपद् किंवा प्रतिपदा त्याचा आणि पहिल्या दिवसाचा संबंध काय ? आणि प्रतिपद् किंवा प्रतिपदा या शब्दाची व्युत्पत्ती काय असावी ? (यास्काचार्यांच्या निरुक्त या ग्रंथात व्युत्पत्ती काय किंवा कशापासून यासाठी 'कस्मात्' या शब्दाचा वापर केलेला असतो. म्हणून 'प्रतिपद् कस्मात्' !)

प्रतिपद् हा शब्द पहिला दिवस या अर्थी रूढ होण्याची एक शक्यता अशी असावी : प्रतिपद् या शब्दात मूळ धातू आहे प्रति + पद्. त्याचे अनेक अर्थ आहेत, त्यापैकी प्रस्तुत संदर्भातील अर्थ आहे 'प्रवेश करणे', 'पाऊल ठेवणे', 'पदार्पण करणे'. त्यावरून नाम झाले प्रतिपद्. त्याचा अर्थ 'पदार्पण', 'प्रवेश', 'उदय' इ० अशा रीतीने क्रियापदापासून त्याच अर्थाने झालेली कितीतरी नामे आपल्याला आढळतात. उदा० वि + पद् पासून विपद्, आ + पद् पासून आपद्, सं + पद् पासून संपद्. या प्रतिपद्चेच प्रतिपदा असेही रूप झाले. हा प्रवेश किंवा पदार्पण कुणाचे तर चंद्राचे. म्हणजे खरेतर हा शब्द 'चंद्रप्रतिपद्' किंवा 'चंद्रप्रतिपदा' असा असायला हवा. पण यातला चंद्र हा शब्द गृहीत धरून फक्त 'प्रतिपद्' हा शब्द चंद्राचा प्रथम प्रवेश किंवा प्रथमपदार्पण या अर्थी राहिला आणि ज्या दिवशी तो होतो, तो दिवस म्हणजे महिन्याचा किंवा पंधरवड्याचा पहिला दिवस या अर्थाने तो रूढ झाला.

ही व्युत्पत्ती जर मान्य केली तर 'प्रतिपद्' हा शब्द अमावास्येनंतर येणाऱ्या प्रतिपदेला जास्त लागू पडतो. म्हणूनच ब्योत्‌लिंग आणि रोथ यांच्या कोशात त्याचा

अर्थ 'पंधरवड्याच्या सुरवातीचा, विशेषत: शुक्ल पक्षाच्या सुरवातीचा, दिवस' असा दिलेला आहे. म्हणजेच ज्या दिवशी चंद्र आकाशात प्रथम प्रवेश करतो (अर्थात् अमावास्येच्या पूर्ण अनुपस्थितीनंतर) तो दिवस म्हणजे प्रतिपद्. नंतर त्याचा पंधरवड्याचा पहिला दिवस असा विस्तार होऊन वद्य पक्षाच्या पहिल्या तिथीलाही ते नाव पडले असावे.

या अनुषंगाने इथे थोडे पौर्णिमेबद्दलही बोललेले अनुचित होणार नाही, असे वाटते. मराठीतला पौर्णिमा हा शब्द पूर्णिमा म्हणजे पूर्णता या शब्दावरून आला आहे. जिथे (चंद्राची) पूर्णता म्हणजे पूर्णिमा आहे, तो दिवस किंवा तिथी म्हणजे पौर्णिमा. पूर्णिमा या शब्दापासून बनलेले हे तद्धित रूप. संस्कृतमध्ये पौर्णिमेला शब्द आहे पूर्णमासी. ज्या दिवशी पूर्णमास असतो, ती पूर्णमासी. पूर्णमास शब्दाचा शब्दश: अर्थ आहे पूर्ण चंद्र. इथे मास म्हणजे महिना नसून चंद्र असा अर्थ आहे. ज्या दिवशी चंद्र पूर्ण वाटोळा असतो तो दिवस म्हणजे पूर्णमासी.

टीप : 'प्रतिपदा' हा शब्द असा आला असावा, अशी शक्यता वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे जपानी भाषेतली पहिल्या दहा तारखांची (आणि त्यातही विशेषत: पहिल्या तारखेचे) नावे. ही नावे त्या भाषेतल्या इतर तारखांच्या (अकरा ते एकतीस) नावांपेक्षा वेगळी आहेत. अकरा तारखेपासूनची पुढची नावे जूइचिनिचि, जूनिनिचि, सान्जूनिचि, सान्जूइचिनिचि म्हणजे अनुक्रमे अकरावा दिवस, बारावा दिवस... तिसावा दिवस, एकतिसावा दिवस अशी आहेत. पण एक ते दहा तारखांची नावे आहेत – त्सुइताचि, फुत्सुका, मिक्का, योका, इत्सुका, मुइका, नानोका, योऽका, कोकोनोका आणि तोऽका.

ही नावे अशी वेगळी का ? तर या रूढ अर्थाने दिनांक किंवा तारखा नाहीतच मुळी, तर त्या चक्क चांद्र महिन्यातल्या तिथ्या आहेत. आपल्यासारखीच तिथ्यांची नावे आहेत. जपानी लोक वरकरणी कितीही आधुनिक दिसले, पाश्चात्त्यांचे अनुकरण करताहेत, असे वाटले तरी प्रत्यक्षात अनेक बाबतीत आणि अनेकप्रकारे ते आपले जपानीपण टिकवून असतात, असे म्हणतात त्याचा हा आणखी एक पुरावा.

या नावांमधली फुत्सुका, मिक्का ही नावे आपल्या तिथ्यांसारखीच द्वितीया, तृतीया अशी क्रमवाचक संख्या-विशेषणे आहेत. पण त्सुइताची या पहिल्या तारखेला असलेल्या शब्दाचा अर्थ मात्र प्रथमा असा नाही. मग तो काय आहे ?

त्सुइताचि या सामासिक शब्दात दोन घटक शब्द आहेत – त्सुइ आणि ताचि. त्सुइ हा त्सुकी या चंद्रवाचक शब्दाचा पर्यायी किंवा जुना उच्चार. ताचि हे तात्सु या क्रियापदापासून तयार झालेले नाम. तात्सु म्हणजे उभे राहणे, उभे असणे, उगवणे,

अनुक्रमणिका

दिसू लागणे म्हणजेच त्सुइ आणि ताचि या दोन शब्दांचा मिळून अर्थ असा झाला – चंद्राचे आकाशात उभे राहणे, येणे किंवा दिसू लागणे, थोडक्यात चंद्राचा आकाशात प्रवेश. अर्थातच हा उल्लेखही अमावास्येनंतरच्या चंद्रालाच लागू पडतो. पर्यायाने अमावास्येनंतर जेव्हा परत आकाशात पहिल्यांदा चंद्र दिसायला लागतो, तो दिवस म्हणजे त्सुइताचि म्हणजेच प्रतिपद् किंवा प्रतिपदा.

जपानी भाषेत पौर्णिमेला शब्द आहे 'मानगेत्सु'. मान आणि गेत्सु या दोन घटकांनी बनलेला हा सामासिक शब्द. 'गेत्सु' या शब्दालाही आपल्या 'मास' शब्दासारखेच दोन अर्थ आहेत : चंद्र आणि महिना. प्रस्तुत शब्दात चंद्र हाच अर्थ अभिप्रेत आहे. मान या शब्दासाठी जे चिनी चित्र (कांजी) आहे त्याचा अर्थ आहे 'पूर्ण भरती', म्हणजे ज्यामुळे सागराला पूर्ण भरती येते, तो पूर्ण वाटोळा चंद्र ज्यादिवशी आकाशात दिसतो, तो दिवस : पौर्णिमा. ■

८८५/३ भांडारकर मार्ग, ६वी गल्ली, पुणे ४११ ००४.

---

३. **प्र. चिं. शेजवलकर**

'भाषा आणि जीवन'च्या एप्रिल ०६च्या अंकात प्रा. प्र.ना.परांजपे म्हणतात की 'चेअरमन' आणि 'प्रेसिंडेट' या दोन्हींसाठी आपण मराठीत 'अध्यक्ष' असा एकच शब्द वापरतो. माझ्या मते 'चेअरमन' शब्दासाठी आपण 'कार्याध्यक्ष' हा शब्द वापरतो आणि 'प्रेसिडेंट'साठी आपण 'अध्यक्ष' असा शब्द वापरतो. ज्या संस्थेत प्रेसिडेंट आणि चेअरमन हे एकच आहेत तेथे अध्यक्ष हा शब्द आपोआपच येईल. त्याचप्रमाणे एखादी महिला सभाप्रमुख असेल तर तिला 'सभाध्यक्ष' असेच म्हणावे लागेल. उद्या समजा एखादी महिला राष्ट्रपती पदावर आरूढ झाली तर तिला 'राष्ट्राध्यक्ष' असेच म्हणावे लागेल.

आपल्याकडे सरसकट आणखी एक चूक होते. महिला प्राचार्य - पदावर असेल तर किंवा संचालक असेल तर आपण 'प्राचार्या' किंवा 'संचालिका' असे संबोधितो. तेही बरोबर नाही. 'प्राचार्य' हे पद आहे; ते त्या व्यक्तीचे विशेषण असू शकत नाही. त्यामुळे मी तरी महिला व्यक्तीस प्राचार्य अमुक अमुक किंवा संचालक अमुक अमुक असेच म्हणत असतो. अर्थात एखादी महिला कविता करीत असेल तर त्यासाठी 'कवयित्री' असा शब्द आहे. जेथे असे शब्द आहेत, उदाहरणार्थ 'लेखिका', तेथे तसेच शब्द वापरावेत. ■

१०८/११, भारती निवास कॉलनी, एरंडवणे, प्रभात रस्ता, पुणे ४११ ००४

वाचनाचे बाळकडू

सुमन बेलवलकर

[परीक्षित पुस्तके : 'वाचू आनंदे' - चार पुस्तकांचा संच. संपादक : माधुरी पुरंदरे, साहाय्य : नंदिता वागळे. ज्योत्स्ना प्रकाशन + राज्य मराठी विकास संस्था. प्रथम प्रकाशन डिसेंबर २००१, पृष्ठसंख्या ७०४, किंमत प्रत्येकी ७५/-प्रमाणे एकूण रु. ३००/-]

डिसेंबर २००१च्या एका संध्याकाळी पत्रकारनगरमध्ये 'वाचू आनंदे'चा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता; तोही सुंदर बाग असलेल्या एका बंगलीच्या आवारात. ऐनवेळी त्यावर पावसाचं पाणी पडलं तरीही अपुऱ्या उजेडात अनेकांनी जागेवरच हे संच खरेदी केले होते. गेल्या चार वर्षांत खरे तर त्यांचा हातोहात खप झाला असेल असे वाटले होते. पण हॅरी पॉटरच्या प्रसिद्धीने 'आ' वासणारे आपण वाचक आपल्या भाषेत काही सुंदर घडते त्याचे मात्र जोरात स्वागत करत नाही.

'वाचनसंस्कृती लोप पावते आहे' या हाकाटीला सकारात्मक उत्तर देण्याच्या हेतूने ही निर्मिती झाली आहे, असे प्रथमदर्शनी म्हणता येते. तथापि त्यापेक्षाही बरेच काही या निर्मितीमागे आहे. बालगटासाठी दोन (५वी ते ७वी, वयोगट ९ ते ११) आणि कुमारगटासाठी दोन (८वी ते १०वी, वयोगट १२ ते १५) अशी ही चार अत्यंत आकर्षक पुस्तके आहेत. आज जे साहित्याचे जाणकार वाचक आहेत त्यांना साहित्याची गोडी साधारणपणे १० ते १५ या वयात एखाद्या कवितेमुळे, कथेमुळे किंवा मराठीच्या चांगल्या शिक्षकांमुळे लागल्याचे आठवेल. संपादकांनी याचसाठी हे वयोगट डोळ्यापुढे ठेवले आहेत.

या पुस्तकांचा पाहताक्षणी डोळ्यात भरणारा विशेष म्हणजे यातली चित्रे. पाठ्यपुस्तकातील अनाकर्षक मुखपृष्ठे आणि आई-वडील, मुलगा-मुलगी, झाडे-प्राणी इतकाच फरक ओळखता येईल या दर्जाची चित्रे पाहण्याची सवय झालेल्या डोळ्यांना मुखपृष्ठ-मलपृष्ठच नव्हे; तर पुस्तकातही पानोपानी निरनिराळ्या ख्यातकीर्त कलाकारांची, विविध शैलींची अभिजात चित्रे पाहून भुरळ पडते. उघडलेल्या प्रत्येक

पानावर लक्ष वेधून घेणारं चित्र किंवा शिल्प ''त्यासोबत असलेल्या कवितेसाठी किंवा उताऱ्यासाठी तयार केलेलं नाही'' असं जरी संपादकांनी म्हटलं आहे, तरी त्यामागचा शोध आणि समर्पक योजना निश्चितच वाचकाची जाण वाढवणारी आहे. या प्रकारचा हा पहिला प्रयोग आहे हे ओळखून चित्रकारांची, चित्रांच्या वेगवेगळ्या शैलींची माहिती प्रत्येक पुस्तकात शेवटी दिलेली आहे. त्यामुळे केवळ वाचनाचे संस्कार एवढेच साध्य न राहता वाचकाला चित्रकलेत किमान साक्षर करण्याचे श्रेयही संपादकांना मिळते.

समाज सुसंस्कृत होण्यासाठी कलांची जाणकारी असलेले रसिक वाचक, प्रेक्षक, श्रोते घडवणे आवश्यक असते. मुळात वाचकांची संख्याच मराठीत फारशी समाधानकारक नाही हे वास्तव असूनही वाचनाबरोबरच चित्रकलेचे रसज्ञ तयार करण्याचा हा प्रयोग संपादकांनी मोठ्या उमेदीने केला आहे. स्वत: माधुरी पुरंदरे यांची बहुविध कलांचा आविष्कार आणि आस्वाद या दोन्ही क्षेत्रांमधील गुणवत्ता सर्वश्रुत आहे. त्यांच्या अभिरुचीची अभिजातता चित्रांमधून ध्यानात येते. ही सर्व चित्रे मूळ रंगात देता आली असती तर – हा महत्त्वाकांक्षी विचार मनात डोकावतो. कधीकाळी मराठीला तेही बरे दिवस येतील असे मानू.

बाल-कुमारांना वाचनाची गोडी लावणारे, त्यांच्या आकलनाच्या कक्षा विस्तारणारे साहित्य संकलित करणे हे सोपे काम नाही, तेही एक विशिष्ट दर्जा डोळ्यापुढे ठेवून वेच्यांची निवड करण्यासाठी संपादकांनी किती कष्ट घेतले आहेत याची कल्पना अनुक्रमणिकांवरूनच येते. कविता, कथा, लोकसाहित्य, कादंबरी, ललित गद्य, आत्मकथन, खण्डकाव्य, संतकविता, नाटक, नाटिका, चरितकादंबरी असे अकरा साहित्यप्रकार बालगट १ या पुस्तकातच आहेत. पुढे त्यात प्रवासवर्णन, ऐतिहासिक दस्तऐवज, चरितकाव्य, बखर, धर्मग्रंथ, विडंबन, व्यक्तिचित्र असे अनेक साहित्यप्रकार वाचकांच्या ओळखीचे होतात. काही तुरळक रचना सोडल्या तर जुन्या उपलब्ध असलेल्या पाठ्यपुस्तकांमधून किंवा गद्यपद्यवेच्यांतून 'तयार' तुकडा उचलण्याचा सोपा मार्ग इथे अवलंबिलेला नाही. पहिल्या गटासाठी निसर्ग, प्राणिसृष्टी, बालपण, कुटुंब; दुसऱ्या गटासाठी घर, गाव-शहर-प्रदेश, रस्ते-प्रवास, शिक्षण, व्यवसाय-समाजजीवन, विज्ञान, चित्रादि कला, भाषा असे मोठे वर्तुळ दिसते.

केवळ आकडेवारी द्यायची म्हटले तरी तीनशे रुपयांच्या या संचात ७०४ पृष्ठांचा मजकूर आहे आणि गद्यपद्य असे ३०७ उतारे आहेत. हे उतारे वाचताना चांगल्या वाचकालाही काहीतरी नवीन दिसते. त्यांनाही थबकायला लावेल असे बरेच काही प्रत्येक पुस्तकात आढळते. उदा० 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही उक्ती सर्वांच्या तोंडी आढळते पण ती संपूर्ण कविता बालगट १ मध्ये आरंभीच आपल्याला भेटते.

अनुक्रमणिका

कवडसा पाहून छोट्या मनूला लागलेला 'शूलयाचं पिल्लू' हा शोध (पृ. ८) चेहऱ्यावर हसू उमटवतो. औदुंबर कवितेखाली असलेल्या कृष्णधवल चित्रामुळेही ते पान पाहणं हा केवल आनंद आहे. 'पहाड' या हत्तीचे राज्य जाणे आणि आयुष्य संपणे (पृ. ७४) वाचताना पोटात कालवाकालव होते. नामदेवांची 'कुत्ना थमाल ले' ही बोबडी रचना पूर्वी पाठ्यपुस्तकात असे. इथे ज्ञानेश्वरांची 'काय थांगु तूतें' (पृ. ८६) ही रचना आहे. हरि नारायणांच्या काळातील 'बाहुलीचे लग्न'ला सांस्कृतिक संदर्भ आहेत. विद्याधर पुंडलिकांच्या 'आजी शरण येते' या अफलातून कथेला जोडलेले चित्र, त्यातले आजीच्या पायाशी बसलेले आजोबा अप्रतिम !

बालगट दोनमध्ये 'घर' या शीर्षकाखाली वेगवेगळ्या सात रचना आहेत. गावाची संकल्पना खेड्यापासून विस्तारत व्हेनिसपर्यंत दर्शन घडवते. त्यात पृ. ३३ वरचे हळदणकरांचे चित्र डॉ. आनंदीबाईंच्या क्षितिजापार प्रवासाची दिशा दाखवते. शिक्षण-क्षेत्रात 'लक्ष्या' या पहिल्या भटक्या विमुक्ताचे पहिलीची परीक्षा पास होणे आहे आणि नारळीकरांनी घडवलेला २१ व्या शतकातील आलोकचा अवकाश-फेरफटका आहे. 'बहुरूप्याचे जेवणास निमंत्रण', 'लँडस्केप'चे मास्तर पेडणेकर, प्रतिभावंत अभिनेत्री हंसा वाडकर यांचे संत सखूविषयीचे आत्मकथन इ० मोठ्यांनाही या पुस्तकात रस वाटेल असे आहे. शंकर वैद्य यांची 'लेखणी' दृश्यरूपात सुंदर अक्षराचा वस्तुपाठ देणारी आहे.

कुमारगटात बदललेला वयोगट विषय, शैली, शब्दसंग्रह सर्वांवरून स्पष्ट होतो. त्यात 'पानिपत' लिहिणारे इतिहासकार त्र्यं.शं. शेजवलकर यांचा 'सवतकडा' थेट खानोलकरांची आठवण करून देतो. पाठोपाठ 'कोंडुरा' वाचताना हे विशेष जाणवते. या संकलनात माशी, म्हैस पासून जंगली वाघापर्यंत प्राणिसृष्टी सामोरी येते. 'सोबत' हा सुनीता देशपांडे यांचा लेख आणि रमेश राव यांचे 'तिची आजी' हे चित्र परस्पर अनुरूपतेचे आणखी एक सुंदर उदाहरण. कुमारवयातील वाचकांसाठी 'तारुण्य' हा शिवाजी सावंत यांचा कर्णाचे ते वय वर्णन करणारा उतारा हा एक झगझगीत प्रकाशकिरण आहे. श्रीरंग जोशींची 'आईची कविता' वडीलधाऱ्या माणसांना आपल्या आईची आठवण करून देईल तर व्यंकटेश माडगूळकरांचे 'दादा' त्याच पिढीतील काहींना आपले तीर्थरूप वाटतील. नरेंद्र जाधवांची 'मातोसरी' तळच्या मातीत घडलेली खणखणीत मूर्ती आहे.

कुमारगट दोनमध्ये मनात घर करते ते एलकुंचवारांचे 'वाडा' व्यक्तिमत्त्वाचे घर. स्वप्नातल्या बालपणात घेऊन जाणारे विंदा करंदीकरांचे 'मामाचे घर' आपल्यालाही हवेसे वाटते. 'जनानी जयपुरी' (पृ. २०) आणि पस्तीस वर्षांपूर्वीचे पुणे (पृ. २६)

चित्रांच्या अनुरूपतेमुळे लक्षणीय ठरतात. 'मुंबई ते ठाणे' या पहिल्या 'भुताटकीच्या गाडी'चा रेल्वेचा प्रवास, त्यासाठी लोकांची भीती मोडावी म्हणून मोफत प्रवास आणि वर ठेवलेले एक रुपयाचे इनाम वाचून आजच्या मुंबैकरांची करमणूक होईल, 'सासरची पाठवणी' हा जुन्या काळातला उपदेश आणि चित्रातली बालिकावधू दोन्ही लोभस आहेत (पृ. ५६). या पुस्तकातली कलाविषयांतर्गत असलेली संकलने खास आहेत. सर्व प्रकारे वाचकांची अभिरुची विकसित करणारी आहेत. हा प्रवास चोंभा कवीच्या उखाहरणापासून अमिताभ बच्चनपर्यंत आहे. भाषेबद्दलचे लेख विद्यार्थ्यांआधी भाषाशिक्षकांनी पाहून मूळ पुस्तके वाचावीत असे आहेत. एकूणच संचातील काही मासले निर्देशित करण्यामागे हेतू एवढाच की, संकलनकर्त्यांनी त्यासाठी किती कष्ट घेतले आहेत याची जाणीव व्हावी.

ही पुस्तके वाचताना एक गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे ही पहिल्या → दुसऱ्या → तिसऱ्या पिढ्यांना जोडणारी पुस्तके आहेत. यातून व्यक्त झालेला समाजजीवनाचा प्रवास, संस्कृतीचा प्रवाह आजोबाआजींच्या पिढीकडून नातवंडांनी समजून घ्यावा किंवा आईबाबांनी मुलांना उलगडून सांगावा. त्याअर्थाने ही कुटुंबाची पुस्तके आहेत. नात्यानात्यामध्ये अंतर पडत चाललेल्या काळात माणसं जोडणारा हा पूल आहे. याचं कारण बालगट असो की कुमारगट, एकेकटी गणितं सोडवल्यासारखी वाचायची ही पुस्तके नाहीत. त्यादृष्टीने त्यांचा दर्जा थोडा वेगळा आहे.

अशाप्रकारच्या संकलनात अमूक नाही – तमूक हवे होते असे एखाद्याला म्हणता येईल. परंतु ती दिशा शोधणारे हे पहिले स्तुत्य पाऊल आहे. एक सुचवावेसे वाटते की प्रत्येक पुस्तकाला जोडून काही लेखकांची खास पुस्तके अधिक वाचनासाठी सुचवली असती तर पाना-दोनपानांच्या पुरवणीने आणखी भर पडली असती. उदा० गोपालकृष्ण भोबे यांचे 'मासे आणि मी', अनिल अवचट – 'माणसे', श्रीनिवास कुलकर्णी– 'डोह', वि.द. घाटे– 'मनोगते', विंदा करंदीकर– 'आकाशाचा अर्थ', 'स्पर्शाची पालवी' आणि अशी कितीतरी ! अर्थात हा रस्ता कधीच संपणारा नसतो.

या पुस्तकांबद्दल काय करता येईल ? प्रत्येकाने, प्रत्येक प्रसंगी या वयोगटातील मुलाला ही संचरूपातच भेट देता येतील. शाळांना अगदी हाताळून फाटली तरी चालेल इतकी ती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येतील. समाजातल्या 'आहेरे' गटाने पुढे येऊन 'नाहीरे' गटातल्या मुलांसाठी ती घेऊन वाटावीत. पूर्वी प्रत्येक मुलाने 'श्यामची आई' वाचलेले असायचे; ते स्थान या पुस्तकांना मिळायला हवे. कारण हे वाचनाचे बाळकडू अभिरुचीचे उत्तम पोषण करणारे आहे आणि ते कडू नसून गोड आहे. ■

पश्चिम विभागीय भाषा केंद्र, डेक्कन कॉलेज, पुणे

वृत्तपत्र-विद्येच्या परिभाषेचा उपयुक्त कोश

प्रसन्नकुमार अकलुजकर

[परीक्षित ग्रंथ : वृत्तपत्र-विद्या परिभाषा कोश : महाराष्ट्र राज्य भाषासंचालनालय, मुंबई, पृष्ठे १६४, किंमत ७०/- रुपये]

महाराष्ट्र भाषा संचालनालयाने अलीकडेच 'वृत्तपत्र-विद्या परिभाषा कोश' प्रकाशित केला आहे. अशा तऱ्हेच्या कोशाची गरज व्यावसायिकांना जाणवत होती. या कोशामुळे काही प्रमाणात का होईना, ही गरज भागू शकेल. कोशाची आखणी १९८५ साली करण्यात आली. त्यासाठी ज्येष्ठ पत्रकार व 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकातील तत्कालीन सहसंपादक दि.वि. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची उपसमिती नेमण्यात आली. या उपसमितीत विद्यापीठांच्या वृत्तपत्र-विद्या विभागांचे प्रमुख व एक संस्कृतचे तज्ज्ञ प्राध्यापक अशा एकूण नऊ सदस्यांचा समावेश होता.

कोशाची रचना करताना काही चौकट आखण्यात आली. उपसमितीने वृत्तपत्र-विद्येशी निगडित सहा हजार शब्दांचे पर्याय निश्चित करण्याचे ठरविले. या कोशाच्या प्रस्तावनेत त्याचे उद्देश स्पष्ट करण्यात आले आहेत. गेल्या तीसपस्तीस वर्षांत वृत्तपत्र आणि प्रसारमाध्यमांच्या वाढीबरोबर विद्यापीठ-पातळीवर वृत्तपत्र-विद्येच्या शिक्षण व प्रशिक्षणाचाही प्रसार होतो आहे. शासनमान्य विद्यापीठांबरोबर अभिमत व मुक्त विद्यापीठांनीही वृत्तपत्रविद्येचे पदविका व पदवी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. याशिवाय खासगी/स्वायत्त शिक्षणसंस्थाही पत्रकारितेचे शिक्षण देणारे अभ्यासक्रम चालवताना दिसतात. सिद्धान्त वा शास्त्र म्हणून वृत्तपत्र-विद्येच्या अभ्यासाला सुरुवात होऊन महाराष्ट्रात पन्नास वर्षे लोटली आहेत. पुणे विद्यापीठ हे याबाबतीत अग्रेसर आहे. वृत्तपत्र-विद्येच्या पाश्चात्य अभ्यासक्रमांचे प्रतिरूप समोर ठेवून देशकालपरिस्थितीनुसार त्यात बदल करण्यात आले. हे सांगावयाचे कारण असे की, या अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेली बहुतांश पुस्तके ब्रिटिश वा अमेरिकन आहेत. वृत्तपत्र व प्रसारमाध्यमात व्यवसाय आणि प्रशिक्षण असे दोन भाग आहेत; म्हणजे सिद्धान्त आणि प्रात्यक्षिक ! या दोन्ही ठिकाणी एक परिभाषा वापरावी लागते. ही परिभाषा

मूळ इंग्रजी आहे; कारण त्यातील संकल्पनाच पाश्चात्य देशांतून आल्या आहेत. त्यामुळे वार्तांकन, संपादन, वृत्तलेख यांसारखे पत्रविद्येतील गाभ्याचे विषय शिकवितानाही ब्रिटिश वा अमेरिकी पुस्तकांचा आधार घेतला जातो. प्रश्न येतो तो मराठी माध्यमातील अध्ययन-अध्यापनाच्या पातळीवर. गेल्या तीस-चाळीस वर्षांत काही अनुभवी पत्रकार व पत्रकारिता शिकविणारे शिक्षक यांनी काही स्वतंत्र पुस्तके मराठीत लिहिली आहेत. मात्र त्या पुस्तकांत पारिभाषिक संज्ञा वा संकल्पना स्पष्ट करताना वेगवेगळे शब्द वापरले आहेत. साधे दोन शब्द घ्या. एक, 'कॉपी'. दोन, 'लीड' वा 'इंट्रो'.

'कॉपी' या शब्दाचा वृत्तपत्राच्या संदर्भातील अर्थ 'लेखन', 'हस्तलिखित', 'बातमी वा लेख लिहिलेला कागद' असा आहे. बा.द. सातोस्कर यांच्यासारख्या गोमंतकातील ज्येष्ठ पत्रकाराने सरसकट 'कॉपी' असाच मूळ शब्द वापरला आहे. प्रस्तुत परिभाषा-कोशात 'कॉपी' या शब्दापुढे 'मजकूर', 'मुद्रणप्रत' (हस्तलिखित) असे पर्यायी शब्द दिले आहेत. याशिवाय 'कॉपी' शब्दाने सुरू होणारे सत्तावीस शब्द व त्यांचे पारिभाषिक अर्थ दिले आहेत.

बातमीचा 'लीड' वा 'इंट्रो' हा शब्द मराठी पत्रकारितेत रूढ आहे. त्यासाठी सातोस्कर यांच्या पुस्तकात 'प्रारंभिक परिच्छेद' असा शब्द वापरला आहे. 'अग्रपरिच्छेद' असा शब्दही वापरण्यात येतो. प्रस्तुत कोशात 'अग्रसार' असा चपखल शब्द देण्यात आला आहे. कारण बातमीचा महत्त्वाचा भाग साररूपात प्रारंभी दिलेला असतो.

या कोशाचा उपयोग दोन प्रकारे होऊ शकेल. एक म्हणजे महाराष्ट्रात जेथे वृत्तपत्र-विद्येचे मराठी माध्यमातील अभ्यासक्रम चालविले जातात तेथे एक 'प्रमाण परिभाषा कोश' म्हणून या कोशाचा वापर अध्यापनात करता येईल. वृत्तपत्र-विद्येतील संकल्पना रूढ करताना या कोशातील शब्दांचा आधार घेता येईल. प्रादेशिक भाषेच्या विकासासाठी त्या त्या भाषेतील व्यवहार वाढणे गरजेचे असते. त्यासाठी परिभाषा-कोशांचे साहाय्य होऊ शकते. गेल्या दशकात वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांची वाढ विलक्षण वेगाने होते आहे. प्रादेशिक भाषांमधून संज्ञापन अधिक सुकर, सोपे आणि परिणामकारी करावयाचे असेल तर शब्दसंग्रहाची गरज असते. भाषा संचालनालयाने यापूर्वी प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशांतील अनेक पारिभाषिक संज्ञा आज व्यवहारात वापरल्या जातात. मराठी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांनाही त्यांचे साहाय्य होते. त्या दृष्टीने वृत्तपत्र-विद्या परिभाषा कोशही उपयुक्त ठरेल. प्रस्तुत कोश हा अध्यापनलक्ष्यी आहे. त्यामुळे सर्व अभ्यासक्रमांमध्ये एक समान परिभाषा वापरली

अनुक्रमणिका

जाण्याची शक्यता आहे.

वृत्तपत्र-विद्येप्रमाणे वृत्तपत्रात येणाऱ्या विविध बातम्यांच्या विषयांसंदर्भातही हा कोश मर्यादित स्वरूपात का होईना, उपयुक्त आहे. राजकारण, विज्ञान, समाजकरण, गुन्हेगारी, क्रीडा, न्याय, अर्थकारण, शेती, तंत्रज्ञान, व्यापार-उद्योग या क्षेत्रांसंबंधीच्या बातम्या मराठी वृत्तपत्रात प्रायः पी.टी.आय. किंवा यू.एन.आय. या वृत्तसंस्थांद्वारे घेतल्या जातात. या दोन्ही वृत्तसंस्थांचे वृत्तवितरणाचे देशव्यापी जाळे आहे. त्या त्या राज्यातील प्रादेशिक भाषांमधील वृत्तपत्रांमधील स्थानिक बातम्या वगळता अन्य बातम्यांसाठी वृत्तसंस्थांच्या बातम्या हाच आधार असतो. या बातम्यांचे मराठीत भाषांतर करताना नवागत उपसंपादकाला शब्दकोशाची गरज भासते. इंग्रजी-मराठी शब्दकोशाचा आधार अशा वेळी घेतला जातो. हे भाषांतर केवळ शब्दवाही होऊ नये याची दक्षता चांगला उपसंपादक नेहमीच घेतो.

अर्थवाही भाषांतर करताना कित्येकदा पारिभाषिक संज्ञा स्पष्ट कराव्या लागतात. अर्थात या कोशाची मर्यादा लक्षात घेता असे सर्वच शब्द यात समाविष्ट नाहीत. त्यासाठी भाषासंचालनालयाच्या अन्य कोशांचे साहाय्य होऊ शकेल.

वृत्तपत्र-प्रसारमाध्यमासंबंधीचा हा पहिलाच अधिकृत कोश आहे. मात्र यापूर्वी असे प्रयत्न झाले आहेत. 'केसरीने प्रसृत केलेली परिभाषा' हा इतिहाससंशोधक आबा चांदोरकर यांचा लेख 'केसरी प्रबोध' ग्रंथात प्रसिद्ध झाला आहे. त्यात विषयांच्या वर्गवारीनुसार तीन हजार शब्द देण्यात आले आहेत. अर्थात त्यात प्रत्यक्ष वृत्तपत्र-विद्येच्या पारिभाषिक शब्दांची संख्या अत्यल्प आहे; आणि ते साहजिक आहे. १९९०-९२च्या सुमारास पुण्यातील एक तरुण पत्रकार श्री. कामिल पारखे यांनी अशा तऱ्हेचा एक छोटा खिसा-कोश तयार केला होता. त्यात प्रामुख्याने वार्ताहर-उपसंपादकाला बातम्या लिहिताना वा अनुवादित करताना लागणाऱ्या शब्दांचे अर्थ मराठीत देण्यात आले होते. मात्र या कोशाची दखल फारशी घेतली गेली नाही.

वृत्तपत्रे आणि अन्य प्रसारमाध्यमांचे क्षेत्र झपाट्याने बदलते आहे. नव्या तंत्रज्ञानाबरोबर नव्या संकल्पना रूढ होत आहेत. प्रस्तुत कोशाचे काम सुरू झाले तेव्हा त्यासाठी सहा हजार शब्दांची मर्यादा निश्चित केली होती. त्यानंतर गेल्या दहा वर्षात नवनवीन पारिभाषिक संज्ञांची भर पडलेली आहे. त्यामुळे ते शब्द या कोशात समाविष्ट होऊ शकलेले नाहीत.

वृत्तपत्र व दृक्‌श्राव्य माध्यमात विशेषतः चित्रवाणीतही नवनवे शब्द व संकल्पनांचा वापर होतो आहे. उदाहरणार्थ, फ्लायर, कॉलरॲड, आर्टपूल, आर्टवर्क, डिस्प्ले-ॲड, रिस्पॉन्स डिपार्टमेंट इत्यादी. यातील 'फ्लायर' व 'कॉलर ॲड' या संकल्पना नवीन

आहेत. त्यामुळे त्यांचा कदाचित यात समावेश होऊ शकला नसेल. वृत्तपत्रात आठ स्तंभांतील मथळ्याच्या जागी आडवी जाहिरात छापली जाते. तिला 'कॉलरअॅड' म्हणतात. वृत्तपत्रातील आतील पानांकडे व त्यातील विषयांकडे लक्ष वेधण्यासाठी आठ स्तंभांतील मथळ्याच्या जागी आकर्षकरीत्या आडव्या चौकटीत मजकूर छापला जातो. हा मजकूर म्हणजे केवळ लेखविषयांचे मथळे, पान क्रमांक व छायाचित्र असे असते. मराठी वृत्तपत्रात 'केसरी'ने व इंग्रजी वृत्तपत्रात 'टेलिग्राफ'ने या 'फ्लायर' पद्धतीचा वापर १९९० पूर्वीच्या दशकात केला होता. आता सर्वच वृत्तपत्रे 'फ्लायर'ची संकल्पना राबविताना दिसतात. दूरचित्रवाणीच्या बातम्यांच्या संदर्भात 'बाइट', 'पीस टू कॅमेरा', 'व्हॉइस ओव्हर', 'फाइल शॉट', 'सुपर्स', 'ड्रायअँकर', 'ड्राय-रन', यांसारखे शब्द सतत वापरात येतात. त्यांतील काही शब्दांचा तरी समावेश व्हावयास हवा होता.

प्रस्तुत परिभाषा कोशाचे काम अतिशय नेटकेपणाने करण्यात आले आहे. कालमर्यादा निश्चित केल्यामुळे कदाचित वर उल्लेख केलेल्या संज्ञांचा समावेश झाला नसावा. ■

१२०१-अ/३, नीलकंठ, घोलेपथ छेद मार्ग, पुणे ४११ ००४.

मुद्रणदोषांची दुरुस्ती

मागील (एप्रिल - उन्हाळा २००६) अंकातील काही मुद्रणदोषांची दुरुस्ती :

पृष्ठ	ओळ	असे वाचावे
आवरणपृष्ठ २ (अनुक्रमणिका)	७	'स्मरणीय' ऐवजी 'स्मृतिशेष'
५	२३	'संख्येइतकेच' ऐवजी 'संज्ञेइतकेच'
५	शेवटची	'गोडी' ऐवजी ''गोठी'
६	शेवटची	'शास्त्रुपूत' ऐवजी 'शास्त्रपूत'
४७	१५	'अलिगड' ऐवजी 'अलिबाग'
५५	६	'ज्योत्सनाने' ऐवजी 'ज्योत्स्नाने'
५६	शेवटची	'शुक्र' ऐवजी 'शुक'
५७	१०	'शुक्राने' ऐवजी 'शुकाने'
६४	२	'सुवाच्च' ऐवजी 'सुवाच्य'
६४	१५	'पुस्तक/लेखकाचे' ऐवजी 'पुस्तक-लेखकाचे'

अनुक्रमणिका

पुस्तक-परीक्षण

सामाजिक भाषाविज्ञान

सोनल कुलकर्णी-जोशी

[परीक्षित पुस्तक : 'सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास', सं. डॉ. जयश्री पाटणकर, ससंदर्भ प्रकाशन, नाशिक, २००५, पृष्ठे ३३६, किंमत ३६०/- रु.]

२०व्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून अनेक स्थित्यंतरांतून जात-जात भाषाविज्ञानाने 'सामाजिक भाषाविज्ञान' (सा.भा.) ही विकसनाची अलीकडे गाठलेली पायरी आहे. सस्युर व चॉम्स्की प्रणीत भाषेच्या अमूर्त व्यवस्थेच्या संरचनावादी अभ्यासापलीकडे जाऊन सामाजिक, सांस्कृतिक आदी भाषातीत भवतालच्या संदर्भात भाषाकृतींचा अभ्यास झाला पाहिजे हा पाश्चात्य भाषाभ्यासकांनी सध्या प्रचलित केलेला दृष्टिकोण आहे. हा दृष्टिकोण मराठी भाषा-विज्ञानात प्रस्थापित करण्याचा स्तुत्य उपक्रम असे या ग्रंथाचे थोडक्यात वर्णन करता येईल. समाज आणि भाषा यांच्या परस्पर-संबंधांचे बरेच महत्त्वाचे पैलू प्रस्तुत संग्रहात उलगडून दाखविले आहेत. हे सर्व लेख 'सामाजिक भाषाविज्ञान' या शीर्षकाखाली एकत्र करता येतील का हा चर्चेचा विषय होऊ शकतो. या प्रश्नाला स्पर्श करण्यापूर्वी या पुस्तकाची निश्चित अशी जी बलस्थाने आहेत त्यांचा विचार करू.

सदर संग्रहात एकूण २४ लेखकांच्या ३० लेखांचा समावेश आहे. आशयानुसार या लेखांचे वर्गीकरण संपादिकेने आठ गटांत केलेले आहे. (पृ. ८) :

(१) सामाजिक भाषाविज्ञानाची व्याप्ती	– लेख क्र. १ ते ६
(२) भाषिक संज्ञापन	– लेख क्र. ७ ते ८
(३) भाषिक बदल	– लेख क्र. ९ ते १७
(४) बोली अभ्यास	– लेख क्र. १८ ते २२
(५) भाषांतर्गत भेद व सामाजिकता	– लेख क्र. २३ ते २४
(६) भाषाविज्ञान व इतर विद्याशाखा	– लेख क्र. २५
(७) भाषेचा वापर व आकलन	– लेख क्र. २६, २७
(८) भाषिक नियोजन व उपाय	– लेख क्र. २८ ते ३०

आशयाची व मांडणीची विविधता असतानाही लेखांचे सुव्यवस्थित संपादन करून ते एका मध्यसूत्रांतर्गत बांधलेले आहेत. 'आमुख'मध्ये या शोधनिबंधांकडे पाहण्याचा अपेक्षित दृष्टिकोण व त्यातून मिळणाऱ्या फलितांविषयी विवेचन आहे.

ग्रंथात समाविष्ट शोधनिबंधांची सैद्धान्तिक व उपयोजनात्मक अशी वर्गवारी करता येईल. या निबंधांतून भाषाविज्ञानाची संरचनावादापासून सुरू होऊन संदेशनिष्ठता, कार्यनिष्ठता, संदर्भनिष्ठता इ० टप्प्यांतून जात संहिताविश्लेषणापर्यंत येऊन ठेपलेली सैद्धान्तिक वाटचाल आपण पाहतो. सा.भा. विज्ञानाने निर्माण केलेल्या संकल्पनांचे व सिद्धांतांचे मराठी भाषेच्या संदर्भात उपयोजन करणाऱ्या लेखांत स्थलकालांची तसेच विषयांची विविधता आढळते. वेदकालीन व नंतरच्याही काळात संस्कृत-प्राकृत भाषांच्या वापरातील भेदांतून डोकावणाऱ्या तत्कालीन सामाजिक भेदांचा वेध घेण्यापासून ते २१ व्या शतकातील महाविद्यालयातील कट्टाबोलीकडे तारुण्यसुलभ ऊर्जेचे/मानसिकतेचे अभिव्यक्तिकरण म्हणून पाहण्यापर्यंत सा.भा.वैज्ञानिक अभ्यासांचे वैविध्य आहे. त्यात 'स्त्रीभाषा', 'जातीभाषा', 'व्यवसाय भाषा', 'कायदा व राजकारणाची भाषा' यांचा समावेश आहे; मराठीशी संबंधित 'पिजिन' व 'क्रिऑल' भाषांचा शोध आहे. तसेच शिक्षणक्रम, शिक्षणमाध्यम व भाषा नियोजन यांच्या संदर्भातील कळीच्या समस्यांची सा.भा. विज्ञानाधिष्ठित उकलही आहे.

'मराठीचा सा.भा. वैज्ञानिक शोध' या मध्यवर्ती संशोधनाला समांतरच अशा इंग्रजी संज्ञांसाठी मराठी पारिभाषिक संज्ञा निर्माण करण्याचा निरंतर सामूहिक प्रयत्न या पुस्तकातील निबंधांतून प्रतीत होतो. सा.भा. विज्ञानातील संकल्पना/सिद्धांत मराठीत आणताना घडून आलेली पारिभाषिक शब्दांची मांदियाळी हे या पुस्तकाने मराठी भाषेला दिलेले महत्त्वाचे योगदान आहे. नवीन भाषिक/सामाजिक कल्पनांचे/अनुभवांचे प्रकटीकरण करणाऱ्या अनेक सार्थ संज्ञांची निर्मिती व त्यांची एकत्रित उपलब्धता हा या पुस्तकाचा आनुषांगिक परिपाक ठरू शकतो. संज्ञाअनुवादाचे एखादे मार्गदर्शक तत्त्व प्रयत्नांच्या ओघात जन्माला येते किंवा अनुवाद-तंत्र टप्प्यातून विकसित होताना दिसते. इंग्रजी संज्ञाच (उदा० 'पिजिन' व 'क्रिऑल') जशाच्या तशाच वापरण्यापासून ते त्या संज्ञांपाठीमागचे सा.भा. वैज्ञानिक वास्तव जाणून घेऊन मराठी वर्णनात्मक संज्ञा-निर्मितीपर्यंत अनेक अनुवाद–प्रक्रिया आपण पाहतो. ग्रंथाच्या शेवटी दिलेली संज्ञासूची मराठी सा.भा. वैज्ञानिक संज्ञांचा एखादा स्वतंत्र कोष तयार करण्याच्या प्रकल्पाची नांदी ठरू शकेल.

'समाज आणि भाषा' या विषयावरील हा पहिलाच संदर्भग्रंथ असल्यामुळे पुढे अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही त्रुटींचाही उल्लेख करावासा वाटतो.

(१) समाज आणि भाषा यांच्या परस्पर संबंधांचे पैलू उलगडून दाखवणाऱ्या या पुस्तकात सा.भा.विज्ञान ते भाषेचे समाजशास्त्र व संहिता विश्लेषण (डिस्कोर्स विश्लेषण) अशा परस्परसंबंधित पण स्वतंत्र अभ्यासमार्गांचा समावेश आहे. हे सर्व अभ्यासमार्ग ढोबळ पद्धतीने 'सा.भा. विज्ञान' या स्थूल शीर्षकाखाली एकत्र आणले आहेत. वास्तविक पाहता यांतील प्रत्येकाचे उद्दिष्ट व परिणामत: अभ्यासपद्धती वेगळी आहे. यामुळे हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून वापरू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची थोडीफार दिशाभूल होऊ शकते.

(२) भाषाव्यवस्था व भाषावापर हा भेद १९व्या शतकापासून भाषा-अभ्यासकांनी मान्य केला आहे. सा.भा.शास्त्राचे वेगळेपण व प्रमुख योगदान आहे ते त्यांनी भाषावापराच्या अभ्यासासाठी विकसित केलेल्या *साधनभूत अभ्यासपद्धतींत*. या अभ्यासपद्धतींचे प्रात्यक्षिक म्हणून पुस्तकातील काही लेखांचा निर्देश करता येईल. उदा० डॉ. काळे (लेख क्र. १८) व डॉ. पाटणकर (लेख क्र. २७) यांच्या लेखांत या अभ्यास-पद्धतींचे विवरणही आहे. पण पदव्युत्तर मराठीचे विद्यार्थी हा लक्ष्य-वाचक-समूह लक्षात घेऊन अभ्यास पद्धतींवर एखादा स्वतंत्र लेख पुढील आवृत्तीत समाविष्ट करता येईल.

(३) समाविष्ट लेखांपैकी बहुतेक लेखांचा रोख सैद्धान्तिक चर्चेकडे आहे. सैद्धान्तिक चर्चेला पोषक अशी पुरेशी मराठी उदाहरणे (डेटा) गोळा करणे आवश्यक वाटते. भाषाबदल व भाषासंकर या कल्पना स्पष्ट करताना दिलेले भाषा-विश्लेषण बऱ्याचदा 'पद' पातळीशीच मर्यादित राहते. 'स्त्रीभाषा' व 'जातीभाषा' या कल्पनांशी संबंधित लेखांत स्त्रिया किंवा एखाद्या जातीचे लोक काही विशिष्ट 'शब्द' वापरतात म्हणून जातीभाषा व स्त्रीभाषा यांचे अस्तित्व सिद्ध होत नाही. त्यासाठी भाषेचे सर्व रचनात्मक पातळींवर (ध्वनिव्यवस्था, पदव्यवस्था, व्याकरणव्यवस्था आणि अर्थव्यवस्था) विश्लेषण होणे आवश्यक असते. हे न करता 'स्त्रीभाषा' व 'जातीभाषा' अशा संज्ञा वापरणे धोक्याचे ठरू शकते.

(३) पाश्चिमात्य सा.भा.वैज्ञानिकांना कळून चुकले आहे की तथाकथित 'स्त्रीभाषा' व 'जातीभाषा' यांचा संबंध शेवटी 'सत्ताधारी' व 'सत्ताविहीन' या कल्पनांशी येऊन ठेपतो. मराठी सा.भा.वैज्ञानिकांनीही 'स्त्री-भाषेचा' अभ्यास करताना 'सेक्स' आणि 'जेंडर' यांत फरक दाखविणाऱ्या पारिभाषिक संज्ञांचा शोध घेतला पाहिजे.

सा.भा. विज्ञानाचा अंतिम उद्देश सामाजिक व्यवहार व भाषिक व्यवहार यांमधील केवळ साहचर्यसंबंध दाखवणे हा नाही, तर सामाजिक व्यवहाराचा अंगभूत घटक म्हणून 'भाषिक' व्यवहाराचे अस्तित्व दर्शवणे हा आहे. केवळ अभ्यासाच्या सुलभतेसाठी

भाषा व समाज हे भिन्न घटक म्हणून मानले गेले तरी त्यांच्या अभिन्नतेचे भान ठेवणे सा.भा. वैज्ञानिकांना आवश्यक आहे. (याचे एक चांगले उदाहरण डॉ. माधवी कोल्हटकरांच्या लेखात दिसून येते.)

काही नजरचुका व मुद्रणदोष :

(१) पृ. ६ – लबव्ह या सा.भा. वैज्ञानिकाची राष्ट्रीयता रशियन अशी सांगितली आहे; ती अमेरिकन आहे.

(२) पृ. ५५ – संदर्भटीप ४ राहून गेलेली आहे.

(३) पृ. ६१ – संदर्भनिष्ठता (काँटेक्स्चुअॅलिटी) व कार्यनिष्ठता (फंक्शनॅलिटी) या अनुवादित संज्ञांची अदलाबदल.

(४) पृ. ९९ – हाइम्स, डेल (१९७२) संदर्भ अपूर्ण.

प्रस्तावनेमध्ये 'मराठीच्या पदव्युत्तर अभ्यासकांसाठी संदर्भग्रंथ' असे मर्यादित उद्दिष्ट या पुस्तकाच्या निर्मितीमागे असल्याचे सांगितले आहे. पण डॉ. माधवी आपटे यांनी आपल्या लेखात सुचविल्याप्रमाणे अंधानुकरण टाळून, मराठीचे विशिष्ट भाषिक स्वरूप व सामाजिक संदर्भ जाणून या विद्याशाखेचे उपयोजन केल्यास त्याचे अनेक व्यावहारिक परिणाम व उपयोग दिसून येतील - जसे की शहरीकरणाच्या / जागतिकीकरणाच्या रेट्यात विलीन होऊ पाहणाऱ्या बोलीभाषांची जपणूक, भाषाशिक्षणाची शास्त्रशुद्ध पायाबांधणी आणि राजकीय संधीसाधू वक्तव्यांकडे पाहण्याचा डोळस दृष्टिकोण तयार होणे. ■

डेक्कन कॉलेज, पुणे

थांबवायचे कसे !

(इंग्लंडची राणी पहिली) एलिझाबेथ हिने सेनेका या इटालियन नाटककराची काही नाटके भाषांतरित केली होती. सेनेका हा शेक्स्पियरलाही आदर्श म्हणून ठेवावासा वाटला हेता. एलिझाबेथला सहा भाषा येत असत. यासंबंधी बोलताना फ्रेंच राजदूताने स्त्री असून इतक्या भाषा कशा येतात, असा आश्चर्ययुक्त प्रश्न विचारला असता, एलिझाबेथ म्हणाली की, ''स्त्रीला बोलण्याच्या बाबतीत काही अडचण नसते. तिला थांबवायचे कसे हा प्रश्न असतो.''

प्रेषक : माधवी कोल्हटकर

गोविंद तळवलकर - 'इंग्लंडचे आमंत्रण' 'ललित' दिवाळी २००४, पृ. ११

पुस्तक-परीक्षण

अनुभवाचे बोल

मनीषा दीक्षित

[परीक्षित पुस्तक : 'वाचिक अभिनय' - श्रीराम लागू. राजहंस प्रकाशन, पुणे, पृष्ठे ९५, किंमत ६०/- रुपये, प्रकाशन वर्ष १९९८]

डॉ. श्रीराम लागू यांचे 'वाचिक अभिनय' हे छोटेखानी पुस्तक म्हणजे केवळ अभिनयाच्याच नव्हे; तर आवाज आणि वाणी यांचा वापर ज्यांना करावा लागतो अशा अनेक क्षेत्रांतल्या व्यक्तींसाठी एक मोलाचे मार्गदर्शन साधन आहे. नाशिकच्या 'प्रयोग-परिवार' या संस्थेच्या सभासदांसाठी डॉक्टरांनी दिलेल्या व्याख्यानांचा हा ऐवज आहे. त्या वेळी ध्वनिमुद्रित केलेल्या व्याख्यानांचे हे पुनर्लेखन आहे. डॉ. समीर कुलकर्णी या तरुण डॉक्टरांना दाखवून मगच त्याचे अंतिम रूप निश्चित केल्याचे डॉ. लागूंनी सांगितले आहे. स्वतः डॉ. लागू नाक-कान-घसा यांचे तज्ज्ञ आहेत; पण तरी ज्ञानाच्या क्षेत्रातल्या अद्ययावततेचा आग्रह त्यांनी धरला आहे.

डॉ. अशोक केळकर या सुप्रसिद्ध भाषातज्ज्ञांच्याही नजरेखालून आपले हे लेखन डॉक्टर लागूंनी घातले आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक ते बदलही केले. डॉ. केळकरांची प्रस्तावना या पुस्तकाच्या उपयुक्ततेवर नेमके भाष्य करणारीच आहे.

पुस्तकाच्या मनोगतात डॉक्टरांनी या लेखनाचा हेतू, त्यातल्या विषयाचा आवाका, लेखक म्हणून आपली भूमिका आणि आपल्याला अभिप्रेत असलेला वाचक (नव्हे, उपयोजक) या सर्व गोष्टी स्पष्टपणे नोंदवल्या आहेत. इथले सगळे विवेचन 'आधी केले, मग सांगितले' याप्रकारचे आहे, म्हणून त्याचे मोल अधिक.

वाचिक अभिनयात तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो : आवाजनिर्मिती, स्वर-व्यंजनांचे व मग अक्षर-शब्द-वाक्य यांचे उच्चारण आणि ते करताना ठेवावे लागणारे समग्र आशयाचे भान. नटाचे साधन म्हणजे त्याचे शरीर. तेच त्याचे माध्यम. (याच अर्थी हे पुस्तक ज्या शंभु मित्रांना अर्पण केले आहे, त्यांनी 'वाद्यही तूच आणि वाजवणाराही तूच' असे नटाला बजावून ठेवले आहे.) म्हणूनच वाचिक अभिनयाच्या या तिन्ही अंगांचा प्राथमिक संबंध नटाच्या शरीराशी, शरीररचनेशी येतो, शरीरशास्त्रीय तथ्यांशी

येतो. तो पक्केपणी लक्षात घेऊन अभिनेत्याने त्याच्याही पुढे पुष्कळ वाटचाल करायची असते. डॉक्टरांनी आपल्या सबंध विवेचनात या तीन अंगांचा परामर्श घेतला आहे.

सर्वप्रथम येते ती आवाज-निर्मिती. ही प्रक्रिया निसर्गदत्त आहे. त्यात श्वास, स्वरयंत्र, सबंध श्वसनसंस्था इत्यादी गोष्टी कार्यरत असतात. श्वासाचा थेट संबंध आवाजनिर्मितीशी येतो. म्हणूनच या सर्वांचे शरीरशास्त्रीय विवेचन, आकृत्यांसह इथे केलेले आहे. आणि मग निर्वेध व निर्दोष आवाजासाठी या सबंध यंत्रणेचा कसा उपयोग करून घ्यायचा हे सांगितले आहे. नटाला आपल्या आवाजाच्या मूलभूत गुणधर्मात फार लक्षणीय बदल करणे शक्य नसले तरी आवाजावरची बाह्य दडपणे दूर करून तो मुक्त, खुला आवाज कमावू शकतो, दीर्घकाळ आवाज वापरूनही थकवा येऊ नये यासाठी तयारी करू शकतो एवढे आश्वासन या पुस्तकात नक्की आहे.

आवाज-निर्मितीनंतरची पायरी उच्चारणाची. प्रथम स्वर-व्यंजनांचे उच्चार. मानवी शरीरात त्यांची विशिष्ट उच्चार-स्थाने आहेत; त्यांची माहिती व कार्ये नेमकी माहीत हवीत, म्हणजे निर्दोष उच्चार करता येतात. नसतील तर ते सुधारता येतात. पुस्तकात याही अंगांचा शरीरशास्त्रीय ऊहापोह आहे. तो तपशीलवार आहे. हे स्वर आणि व्यंजनेही मानवी आवाज-निर्मितीचीच रूपे आहेत. त्यांचा उपयोग करून आपण भाषा बनवतो. म्हणजेच आवाज-निर्मिती निसर्गदत्त असली तरी भाषा-निर्मिती ही संस्कारित गोष्ट आहे. भाषेमागे एक सांस्कृतिक पर्यावरण असते.

या मुद्यापर्यंत हे विवेचन आणतानाच लेखकाने वाचिक-अभिनयातले उच्चारण आशयानुसारी का असायला हवे याकडे लक्ष वेधले आहे. हा अभिनय भाषेचा वापर करतो आणि भाषा वापराची ही क्रिया शारीरिक, मानसिक व सांस्कृतिक अशा तिन्ही पातळ्यांवर चालते. मेंदू व मज्जासंस्था हे अवयव मानवी शरीरातल्या मन, बुद्धी, विचारशक्ती, विश्लेषणशक्ती यांसारख्या प्रक्रियांशी निगडित आहेत. अभिनयासाठी या सर्वांचा वापर करायचा असतो. आशयानुसारी भाषा-उच्चारणात हे अभिप्रेत असते. 'वाणी' या लहानशा प्रकरणात लेखकाने या महत्त्वाच्या मुद्यांचा उत्कृष्ट ऊहापोह केला आहे.

हे विषय म्हटले तर थोडे क्लिष्ट आहेत. पण डॉक्टर ते अतिशय साध्या-सरळ भाषेत सांगतात. शास्त्रीय परिभाषेला सोपे मराठी पर्याय देतात, बोली भाषेचा वापर तर सर्वत्र आहेच; कारण मुळात ही 'व्याख्याने' आहेत. समोर होतकरू रंगकर्मी आहेत याचे भान ठेवूनच केलेले हे विवेचन आहे.

शैलीच्या संदर्भात बोलायचे तर एक समजावून सांगणारी, कधी नाट्यमयता तर कधी नर्म विनोद यांची मिसळण करणारी आणि एकूणच समोरच्याला 'वाट अति

बिकट नाही' हे आश्वासन देणारी ही शैली आहे.

पुस्तकाच्या मध्यावर – म्हणजेच एका विशिष्ट टप्प्यापाशीच – 'शंका-निरसन' हे प्रकरण येते. इथे सांगितलेल्या गोष्टी केवळ पुस्तकी ज्ञानविषय म्हणून अभ्यासण्याच्या नसून 'करून बघण्याच्या' असल्यामुळे त्या मनात पक्क्या बसणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच पुनरावृत्ती पत्करूनही महत्त्वाचे मुद्दे लेखकाने साररूपात पुन्हा उल्लेखले आहेत; आणि काही प्रातिनिधिक प्रश्नांच्या आधारे शंकांचे निरसन केले आहे. अभिनय करू इच्छिणाऱ्यांना येणाऱ्या अडचणी-अडथळे विचारात घेतले आहेत व त्यावर मात करण्याचे उपायही सांगितले आहेत. तांत्रिकतेत अडकून न पडता आपण हे करू शकू हा विश्वास रंगकर्मींच्या मनात यामुळे निर्माण होऊ शकतो. प्रयोगाआधी भुकेची स्थिती नेमकी कशी हवी, स्वत:च्या आवाजाच्या नैसर्गिक मर्यादांचे भान कसे आवश्यक आहे; घातक व्यसनांपासून अभिनेत्याने दूर का रहायला हवे यांसारख्या अनेक व्यावहारिक सूचना इथे येतात. तसेच वेगवेगळे व्यायाम सांगून त्यांच्या नियमिततेचा आग्रहही येतो. पण त्याचबरोबर हे व्यायाम म्हणजे जादू नव्हे, ही साधना म्हणजे चमत्कारी किमया नव्हे याची जाणीवही करून दिली जाते. आवाजाच्या संदर्भातल्या गैरसमजांना दूर करणारे, पण आवाजातील दोष राहू नयेत म्हणून वैद्यकीय क्षेत्रातल्या अद्ययावततेचा आधार घ्यायला सांगणारे हे लेखन आहे. एकीकडे ज्ञानाधिष्ठित अधिकृतता आणि दुसरीकडे रंगकर्मींच्या भल्यासाठीची आस्था या लेखनात दिसते.

वाचिक अभिनयाचा अभ्यास प्रत्येकाने विचारपूर्वक करावा असा डॉक्टरांचा आग्रह आहे. अभिनय मूलतः प्रेक्षकांशी संवाद साधण्यासाठी, नाटकाचा आशय त्यांच्यापर्यंत पोचवण्यासाठी करायचा आहे. ते नटाचे अंतिम साध्य आहे. नाटकातील शब्द या आशयाने भरलेल्या कुप्या आहेत आणि रंगभूमीवर बोलल्या गेलेल्या शब्दांमधून आशयाचा गंध दरवळला पाहिजे. एरव्ही प्रेक्षकांवर बंद कुप्यांचा भडीमार केल्यासारखे होईल – अशा छानशा रूपकातून डॉक्टरांनी आशयाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

असा, आशय व्यक्त करणारा अभिनय हे तंत्राचा प्रांत मागे टाकून शैलीच्या प्रांतात टाकलेले पाऊल ! तंत्राचा व्यायाम करायचा आणि शैली कमावण्यासाठी व्यासंग करायचा. त्यासाठी बुद्धी, कल्पनाशक्ती, प्रतिभा या निसर्गदत्त गोष्टींना वाचन, मनन, चिंतन, विश्लेषणशक्ती यांची जोड द्यायची – हे चांगल्या वाचिक अभिनयाचे गमक आहे. एखाद्या सूत्रासारखे हे नेमके सांगणे आहे. एखाद्या व्यक्तिरेखेच्या अभिनयासाठीही सबंध नाटकाच्या आशयाचे भान कसे परिणामकारी ठरते हे डॉक्टरांनी 'नटसम्राट'मधल्या एका लहानशा संवादाने स्पष्ट केले आहे.

या पुस्तकाचा हेतू अभिनय-साधकांना 'उपयोजक साधन' उपलब्ध करून देण्याचा

असल्यामुळे शेवटी काही अभ्यास-उतारे दिलेले आहेत. देवलांच्या ‘शारदे’पासून मकरंद साठे यांच्या ‘ठोंब्या’ या नाटकापर्यंतचे. या उताऱ्यांचा उपयोग केल्याने वाचिक-अभिनयाच्या अनेक अंगांचा रियाज सहजी होऊ शकतो. शेवटी वाचनासाठी पुस्तके आणि ऐकण्यासाठी श्रव्य साधने यांच्या याद्याही डॉक्टरांनी दिल्या आहेत.

अवघ्या पंचाण्णव पानांच्या या पुस्तकात वाचिक अभिनयाशी निगडित सर्व महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्श आला आहे. अत्यंत सुसूत्रपणे मांडलेले, शास्त्रीय चौकट न सोडता नेमक्या शब्दात व्यक्त केलेले, एका श्रेष्ठ अभिनेत्याचे हे अनुभवाचे बोल आहेत. ■

४, जयश्री अपार्टमेंट, ७६९/५, पी.वाय.सी. कॉलनी, पुणे ४११ ००४.
दूरभाष २५६७८०६०

४.

उमाकांत रा. कामत

मागील अंकातील (२४.२, उन्हाळा, २००६) माझ्या लेखाच्या पृष्ठांक २० वर ‘विभक्ती म्हणजे विशेष भक्ती’ असे स्पष्टीकरण केले आहे. त्याला आधार म्हणून पुढील टीप देत आहे :

‘विभक्ती’ ही संज्ञा मूळ संस्कृत व्याकरणातून आलेली. वि+भक्त या धातूला ‘ति’-स्त्रीलिंगी नामवाचक प्रत्यय लागून मूळ ‘विभक्ति’ हा शब्द बनलेला. ‘भज्’ धातूला भजणे-पूजणे या चिरपरिचित अर्थाखेरीज आश्रय घेणे, आधार घेणे, अवलंबणे, आदरसंबंध ठेवणे, मान देणे, असेही अर्थ आहेत. वरील स्पष्टीकरणात सदर अर्थ अभिप्रेत आहेत. भक्ति/भक्ती म्हणजे आदर, निष्ठा, प्रेम, आवड इ० स्वरूपाचे अर्थसंबंध. ‘वि’ उपसर्गाला संस्कृतमध्ये तीन प्रमुख अर्थछटा असलेल्या दिसतात.

(१) वेगळे/अलग – उदा०. विभक्त, विकिरण, विच्छिन्न इ०
(२) विशेष – उदा० विख्यात, विद्वेष, विद्रोह, विजय, विज्ञान, विनाश, विनम्र इ०
(३) विरुद्ध/विरहित – उदा० वियोग, विगुण, विश्राम, विमल, विसंवाद इ०

त्यापैकी दुसरा अर्थ स्वीकारून येथे विवेचन केले आहे. संपूर्ण विभक्ती या शब्दाचा भावार्थ, अर्थाचा रोख, मतलब, तात्पर्य, असाही अर्थ डॉ. प्र.न. जोशी यांच्या ‘आदर्श मराठी शब्द कोशा’त कोशात दिलेला आहे. ■

१०२/४ एन्, अशोकनगर, परांजपे मार्ग, वझिरा; बोरीवली (प.) मुंबई ४०० ०९२.
दूरध्वनी - (०२२) २८३३५८०४

अनुक्रमणिका

पुस्तक-परीक्षण

उमेदीला सावरणारी 'आदिम प्रकाशचित्रे'

वंदना बोकील-कुलकर्णी

[परीक्षित पुस्तक : आदिम प्रकाशचित्रे : लखनसिंह कटरे, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर. पृष्ठे : ४०, किंमत रु. ४०/-, प्रकाशन वर्ष २००४]

'प्रमेय', 'जाणिवेतले कर्कदंश' हे कवितासंग्रह आणि 'शाश्वत मौनाचे स्वगत' या अभंग-संग्रहानंतरचा लखनसिंह कटरे यांचा 'आदिम प्रकाशचित्रे' हा नवा कवितासंग्रह. १६ ओळींच्या १६ प्रकाशचित्रांचा (आणि तेवढ्याच रेखाचित्रांचाही) हा संग्रह.

कवीचा दर बारा आण्याला पायली असा ठरवला जात असताना, भ्रष्टाचार, लाचलुचपत, अन्याय, फसवणूक, मूल्यहीनता यांचा संवेदनशील मनाला लागलेला काच ही 'प्रकाशचित्रे' उजेडात आणतात. 'पूर्वपक्ष' मांडताना कवीने म्हटल्याप्रमाणे 'एका कष्टपर्वाचा अनुभव' ह्या कविता देतात. त्यामुळेच 'दुर्बोध आणि कटकटीची' ठरण्याची शक्यता विचारात घेऊनही कवीने ह्या कविता समोर ठेवल्या आहेत.

कंदिलाच्या उजेडात शरमिंदा होऊन लपलेला सूर्य, शाळेच्या वाटेवरची रोडावलेली शिक्षकसंख्या, छताशिवायच्या झोपड्या, समयकात्रीच्या पात्यांत सापडलेली वर्तमानपत्रे, शहरांतले कातरलेले, त्याशिवाय पर्याय नसलेले मन, धान्यांचे त्रिशंकू भाव, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, आक्रस्ताळी वर्गणी-मागणी, ''झोपेचे सोंग घेतलेले लोकहितकारक'' असे वर्तमान वास्तवाचे ''क्षणतुकडे'' या प्रकाशचित्रांतून व्यक्त होताना संवेदनशील मनाचा तळ ढवळून टाकतात.

मूल्यभान हादरवून टाकणाऱ्या कितीतरी असंगत-विसंगत अशा घटनाप्रसंगांनी कवीपुढे अनेक प्रश्नचिन्हे उभी केली आहेत. श्रद्धा, विश्वास, तर्क यांचा कुठलाच भरवसा वाटू नये, ''अंधारलेल्या भयाण रात्रींना – आधार फक्त काजव्यांचा'' अशा परिस्थितीतही उरलेली – उजळलेली ही प्रकाशचित्रे आशावादी आहेत. ती 'राजमार्गावर संकेतचिन्हे होतात.' कवीलाही अश्रुमुक्त करतात !

महागर्दीतही माणसाच्या वाट्याला आलेले एकटेपण, पारखी झालेली आपुलकी,

खडतर, न संपणारा प्रवास आणि जीवघेणा थकवा यांतूनही अंधारशाहीला ठोकर मारण्याची कवीला आशा आहे, उमेद आहे हे या प्रकाशचित्रांचे बळ आहे. जगाची अगम्य रीत सांभाळताना आपल्या भूमिकेशी सुसंगत राहण्याचे सामर्थ्य त्यांनी कमावले आहे.

'आशावलेल्या', 'घुबडावतात', 'दगडतात', 'उपदेशताना', 'भूतावते', 'आव्हानिते', 'नवसाळते', असे नवे शब्द घडवणारी ही कविता कधीकधी समजते असे वाटतानाच हरवते. 'अंधाराच्या अंधारात... उजेडाच्या अंधारकथा' अशी काहीशी क्लिष्ट रचना, एकामागोमाग वेगाने येणाऱ्या प्रतिमा यांमुळे दुर्बोधतेकडे झुकते. गूढतेमध्ये आशय हरवून बसते.

क्रौर्याच्या परिसीमेत जगावेच लागण्यातले कारुण्य मुखपृष्ठातून सूचित होते. किरण पराते यांचे मुखपृष्ठ आणि आतील चित्रे स्वतंत्रपणेही आस्वाद्य आहेत. इथे कवितेचा आशय ती अधोरेखित करतात.

देखण्या प्रकाशनासाठी प्रकाशक मदन धनकर यांचे खास अभिनंदन केले पाहिजे. ■

ई-१, सेक्टर डी, वृंदावन हौ. कॉम्प्लेक्स, पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११०३८
दूरध्वनी - २५२८१६५७

निवेदन

संमत अभ्यासवृत्ती

भारतीय भाषा आणि संस्कृती यांचा संशोधनपर अभ्यास करण्यासाठी वीस ते अठ्ठावीस वयाच्या कोणत्याही शाखेतील पदवीधराला एक वर्ष मुदतीची पाच हजार रुपयांची अभ्यासवृत्ती द्यावयाची आहे. इच्छुक अभ्यासकाने स.ह.देशपांडे यांचे 'विश्वनाथ खैरे याचा संमतविचार आणि नवी भारतविद्या' (मौज प्रकाशन, २००५) हे पुस्तक वाचून ठोकळमानाने आपला विषय ठरवावा. विषयाच्या विवरणासह आपली माहिती ई-मेलने vakhaire@vsnl.com या पत्त्यावर ए४ कागदाच्या एका बाजूच्या मर्यादित पाठवावी. उत्तर ई-मेलनेच मिळेल. गरज वाटल्यास अभ्यासकाला प्रत्यक्ष भेटीसाठी बोलावले जाईल. दर महिन्याच्या अभ्यासाचा ए ४ - एकपानी अहवाल ई-मेलने मिळाल्यावर वृत्तीचे पाचशे रुपये अभ्यासकाला पाठवले जातील. अभ्यासाला मार्गदर्शन ईमेलने मिळत राहील. वर्षअखेर तयार झालेला ए४-चोवीस पानांचा शोधनिबंध अभ्यासकाच्या नावाने newindology.com या वेबसाईटवर टाकला जाईल. ■

'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' : चर्चावृत्त

महाराष्ट्र-दिनाचे औचित्य साधून दरवर्षी मराठी अभ्यास परिषदेतर्फे एखाद्या भाषाविषयक प्रश्नावर विचारमंथन घडविण्यात येते. या वर्षी १ मे २००६ रोजी मराठी अभ्यास परिषद व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी व्याकरणाचा पुनर्विचार' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली होती.

'भाषा आणि जीवन'च्या उन्हाळा (एप्रिल-मे-जून) २००६ या अंकातील प्रा. उमाकांत कामत यांच्या व्याकरणविषयक लेखाचा संदर्भ चर्चेला होता. चर्चेमध्ये प्रा. कृ.श्री. अर्जुनवाडकर, प्रा. उमाकांत कामत, डॉ. विनायक दुर्गे, डॉ. मिलिंद मालशे, डॉ. सुमन बेलवलकर यांचा सहभाग होता. अध्यक्षस्थानी डॉ. गं.ना. जोगळेकर होते.

प्रारंभी कार्यवाह, डॉ. नीलिमा गुंडी यांनी निमंत्रितांसह सर्वांचे स्वागत केले व पाहुण्यांचा परिचय करून दिला. मराठी भाषकांच्या तोंडी वर्षानुवर्षे रुळलेल्या (मूळच्या इंग्रजी) 'ॲ', 'ऑ' या स्वरांना अजूनही पाठ्यपुस्तकात स्थान मिळाले नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्र.ना. परांजपे यांनी प्रास्ताविक केले. शालेय, तसेच विद्यापीठीय स्तरावर असलेली व्याकरणविषयक अनास्था, भाषेच्या बदलत्या प्रवाहांकडे व्याकरण करीत असलेला काणाडोळा यावर त्यांनी नेमकेपणाने बोट ठेवले. कुठलेही व्याकरण अंतिम नसते असे सांगून त्यांनी सैद्धांतिक, वर्णनात्मक व अध्यापन पातळीवरील व्याकरण अशा सर्व अंगांनी चर्चा होण्याची गरज प्रतिपादन केली. (या चर्चेत सादर झालेले निबंध परिष्कृत स्वरूपात यथावकाश प्रसिद्ध होतील.)

काही श्रोत्यांनी या चर्चेच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. डॉ. मो.गो. धडफळे यांनी भाषा व भाषाविज्ञान यांबाबत आपण ७०-८० वर्षे मागे असून संस्कृत व्याकरणाचे दडपण न ठेवता भाषाशास्त्राच्या आधारावर व्याकरण शिकवले जाणे आवश्यक आहे असा विचार मांडला. श्रीमती सुषमा शाळीग्राम यांनी अमराठी व्यक्तींना व्याकरण शिकवताना बोली व लिखित मराठीतील फरकामुळे येणाऱ्या समस्यांबद्दल परिषदेने मार्गदर्शन करावे अशी सूचना केली. यावर डॉ. सुमन बेलवलकर

यांनी अमराठींना भाषा शिकवताना संभाषणात्मक भाषेकडून लिखित भाषेकडे प्रवास असावा असे सांगितले.श्री. मुकुंद देशपांडे यांनी इंग्रजी व हिंदी भाषांचे मराठीवर होणारे परिणाम लक्षात घेऊन व्याकरणाचा विचार व्हावा असे सांगितले. श्रीमती भारती पांडे यांनी इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांना मराठी शिकविण्याबाबत परिषदेने मार्गदर्शन करावे अशी सूचना केली.

आपल्या समारोपाच्या भाषणात डॉ. गं.ना. जोगळेकर यांनी अभ्यासकांपासून ते सामान्यांपर्यंत अनेक स्तरांवर येणारा भाषेचा संबंध लक्षात घेतला पाहिजे आणि मराठी व्याकरण संस्कृतच्या दडपणातून मुक्त करून आपल्या भाषिक जीवनाशी सुसंगत असे नवीन व्याकरण निर्माण केले पाहिजे असे सांगितले.

डॉ. कल्याणी दिवेकर यांनी केलेल्या आभारप्रदर्शने कार्यक्रमाची सांगता झाली. ■

विजया चौधरी

लेखक-परिचय

- **प्रसन्नकुमार अकलुजकर** - पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र-विद्या विभागात अधि-व्याख्याता. वृत्तपत्रे व साप्ताहिकांतून संगीत व नाटक या विषयांवर लेखन. 'मराठी वृत्तपत्रसृष्टीचे अंतरंग', 'वृत्तपत्र-विद्या' व 'तबकडी ते तबकडी' अशी तीन पुस्तके प्रकाशित.
- **डॉ. कल्याण काळे** - अंक २३:३ (पावसाळा २००५) पृ. ६४
- **डॉ. सोनल कुलकर्णी-जोशी** - डेक्कन कॉलेजमधून भाषाविमानात एम्.ए. रेडिंग विद्यापीठ (इंग्लंड) पीएच्.डी. सध्या डेक्कन कॉलेजात भाषाविज्ञानात प्रपाठक.
- **डॉ. माधवी कोल्हटकर** - सहसंपादक, संस्कृत कोश विभाग. संस्कृतमध्ये पीएच्.डी., पाली, जर्मन, रशियन, जपानी, फ्रेंच व तिबेटन या भाषांशी तोंडओळख, 'सिबिल'चा मराठी अनुवाद, 'सुरा, द लिकर अॅण्ड द वेदिक सॅक्रिफाइस', व 'एन्शण्ट इंडियन फायर रिच्युएल' ही पुस्तके प्रकाशित. 'डॉ.एम्.ए. मेंहेदळे गौरव अंक ('मधुविद्या')चे संपादन, अनेक शोधनिबंध प्रकाशित.
- **डॉ. मनीषा दीक्षित** - मराठी काव्यसमीक्षा या विषयात पीएच्.डी., महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरावर काही वर्षे अध्यापन. पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक संशोधन माध्यम केंद्रात तीन वर्षे निर्माता पदावर काम. दै. 'लोकसत्ता'च्या पुणे आवृत्तीसाठी ९ वर्षे नाट्यसमीक्षण. चित्रवाणीसाठी संहितालेखन. पुणे विद्यापीठाच्या ललितकला केंद्रामध्ये अध्यापन.
- **डॉ. माणिक धनपलवार** - उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद येथील मराठीचे (निवृत्त) प्राध्यापक.
- **डॉ. सुमन वासुदेव बेलवलकर** - अंक २३:४ (दिवाळी २००५) पृ. ६४
- **वंदना बोकील-कुलकर्णी** - एम्.ए.,एम्.फिल.(मराठी), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठांत अभ्यागत प्राध्यापक. 'ऊन वेचता वेचता' या कार्यक्रमाचे लेखन, दिग्दर्शन व सादरीकरण.
- **श्री. मो.वि. भाटवडेकर** - अंक २४:२ (उन्हाळा २००६) पृ. ५१
- **डॉ. मिलिंद मालशे** - अंक २३:४ (दिवाळी २००५) पृ. ८८

परीक्षणासाठी आलेली पुस्तके

- 'प्रकाशाचे अंग' – डॉ. नीलिमा गुंडी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००५
- 'आधुनिक बल्गेरियन कविता' – अनुवाद : भगवान ठग, महाराष्ट्र अनुवाद परिषद प्रकाशन, बुलढाणा, २००६
- 'समग्र डॉ. ना.गो. नांदापूरकर' (खंड १ व २) – संपादक : प्रा. द.पं. जोशी, डॉ. उषा जोशी, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबाद, २००६.
- 'पत्रांकित : द्वारकाभाई' – अनंत काळे, पृष्ठे ५९, किंमत ५०/- रु.
- 'शब्दपत्री' – संपादन : अनंत काळे, पृष्ठे १६८, किंमत १२०/- रु.
- 'लिहिती झाली लेखणी' – द्वारकाभाई पटेल, पृष्ठे ९५, किंमत ६०/- रु.

(वरील तिन्ही पुस्तकाचे प्रकाशक - प्रासंगिक प्रकाशन, औरंगाबाद)

---

(१) वार्षिक वर्गणी भरण्यासाठी पत्रिकेचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे आहे. वार्षिक वर्गणी - संस्थेला रु. १२५/-, पंचवार्षिक वर्गणी रु. ५५०/-, व्यक्तीला रु. १००/-, पंचवार्षिक वर्गणी रु.४५०/- परदेशात अंक पाठविण्यासाठी टपालखर्च रु. १००/- अधिक.

(२) मराठी अभ्यास परिषदेची **आजीव सदस्यत्व (फक्त व्यक्तींसाठी) वर्गणी रु. १,००० आणि नोंदणी शुल्क रु. १००/-.** आजीव सदस्यांना 'पत्रिकेचा'चा अंक पाठवला जातो.

(३) **पैसे भरण्याबद्दल सूचना :** वर्गणी प्रत्यक्ष, रोखीने, किंवा धनादेशाने देता येईल. **कृपया मनिऑर्डर पाठवू नये.** पाठवल्यास आपला पत्ता न विसरता लिहावा. धनादेश 'मराठी अभ्यास परिषद' या नावाने काढावा. **धनादेश पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत रुपये २०/- वटणावळ अधिक घालावी.** धनादेशासोबत आपले नाव, पत्ता, रक्कम, कोणत्या वर्षासाठी वर्गणी ते अवश्य लिहावे.

(४) **मागील अंक :** 'भाषा आणि जीवन' हे त्रैमासिक १९८३ पासून प्रसिद्ध होत आहे. (१९८३ या वर्षी मात्र दोनच अंक निघाले आहेत.) काही अंकांचा अपवाद वगळता सर्व वर्षांचे अंक उपलब्ध आहेत. १९८३ ते १९९० पर्यंतच्या प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. १०/-, १९९१ पासून पुढील वर्षातील प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. २०/- आणि २००२ पासून प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. २५/-.

(५) **जाहिरातीसाठी नवे दर :** पूर्ण पान रु.२,५००/-, अर्धे पान रु.१,५००/-, पाव पान रु.८००/-, शुभेच्छा रु.४००/-, आवरण पृष्ठ तीन रु. ३,०००/- जाहिरात मराठीत असल्यास उत्तम. हिंदीत, इंग्रजीत असल्यास चालेल.

मुखपृष्ठासंबंधी : दृक्कलेच्या रचनेसाठी अत्यावश्यक असणारा एक घटक : आकार या वर्षी मुखपृष्ठांसाठी वर्तुळ, त्रिकोण आणि चौरस,या तीन मूलभूत आकारांच्या रचनेत लिपीचा अविभाज्य घटक असलेल्या अक्षराच्या उपयोजनातून साकारलेली संकल्पना वापरली आहे. या रचनेतील अक्षरे भारताच्या समृद्ध लिपीसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी असून संपूर्णपणे संगणकसाह्याने घडलेली आहेत. प्राधान्य अर्थातच देवनागरीला असून अन्य रचनांमध्ये बंगाली, मल्याळम आणि गुजराती अक्षरांचा उपयोग केला आहे.

चित्रकल्पना व अक्षर-निर्मिती : विनय सायनेकर; दृश्य संकल्पना व संगणकसाहाय्य : सुप्रिया खारकर.

बुकपोस्ट - बुकपॅकेट - त्रैमासिक


R. N. I. नोंदणी क्रमांक : ०-४००४८/८३

प्रेषक

कार्यवाह, मराठी अभ्यास परिषद

३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, गल्ली क्र.५

वाडिया हॉस्पिटलसमोर, पुणे ४११ ००२. (दू. क्र. २४४८६०१५)



अनुक्रमणिका